
ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९






महाराष्ट्र साहित्य परिषदेला वास्तू उभारण्यासाठी टिळक रस्त्यावरील जागा उदार मनाने देणारे औंध संस्थानचे अधिपती राजा भवानराव तथा बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या तैलचित्राचे अनावरण संमेलनाध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते झाले. या वेळी कार्यकारी मंडळाचे सदस्य उपस्थित होते. हे तैलचित्र मसाप शाखा, चिपळूण आणि लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर, चिपळूण यांनी परिषदेला भेट दिले असून देवरूखचे चित्रकार विक्रम परांजपे यांनी ते साकारले आहे.



महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा धुळे आणि जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट संचालित झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय देवपूर, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समीक्षा संमेलनाचे उद्घाटन करताना माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, संमेलनाच्या अध्यक्ष ज्येष्ठ समीक्षक डॉ. रेखा इनामदार-साने आणि उपस्थित मान्यवर.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३६८, ऑक्टोबर-डिसेंबर २०१९

संपादक

**डॉ. पुरुषोत्तम काळे**

संपादन समिती

**डॉ. मनोहर जाधव । डॉ. नीलिमा गुंडी । डॉ. भास्कर ढोके**
**डॉ. रणधीर शिंदे । डॉ. वर्षा तोडमल**

प्रकाशक

**प्रकाश पायगुडे**

प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद

**महाराष्ट्र साहित्य परिषद**

टिळक रस्ता, पुणे ४११०३०. दूरभाष : ०२०-२४४७५९६३
संकेतस्थळ : www.masapapune.org
ई-मेल : masaparishad@gmail.com
(कार्यालयाची वेळ : स. ९.३० ते १२, दु. ४.३० ते रा. ८)

मुद्रक-प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

जाहिरात व्यवस्थापक
**वि. दा. पिंगळे**
९८८१२३५०३३

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**आर्ट ॲडव्हर्टायझिंग**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस.ए. प्रिंटर्स, एल.एल.पी.**
फ्लॅट नं.५, ३रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९.

मूल्य : **१५ रुपये**

प्रकाशन क्र. ३६८
ऑक्टोबर-डिसेंबर २०१९

या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.

# अं त रं ग


- संपादकीय : **पुरुषोत्तम काळे । ३**

भाषण :

- समीक्षा वाचण्याची जिज्ञासा साहित्यप्रेमींमध्ये वाढली तरी आपल्या सांस्कृतिक जाणिवा प्रगल्भ होतील!
  **रेखा इनामदार-साने । ११**

समीक्षा :

- लोकसंस्कृतीचे लोभस दर्शन व चिकित्सक चिंतन
  **डॉ. मथु सुरेश सावंत । १७**
- काळाच्या मूल्यऱ्हासाचे प्रतिबिंब : तणस
  **ऋषिकेश देशमुख । २२**
- 'धूळपेरा उसवता...' विष्णू थोरे यांच्या कविता
  **एकनाथ पगार । ३६**

लेख :

- ओॲसिसच्या शोधात सृजनयात्री **। डॉ. न. म. जोशी । ५**
- अनंत फंदी आणि समकालीन इतर प्रांतीय कवी
  **शिरीष गंधे । ४३**
- प्रभाकर भसे यांच्या 'महात्मा गौतम' कादंबरीतील बुद्धप्रतिमा : एक आकलन । **विराज मोरे । ४६**
- लेखकाची गोष्ट । **डॉ. राजेंद्र मलोसे । ५४**
- नामदेव ढसाळ : कवी नावाचा सैनिक
  **कल्याणी झा । २६**
- शब्दबीजांची जपणूक संवेदनशीलतेने करणारी लेखिका : कीर्ती मुळीक । **डॉ.सुजाता शेणई । ३१**

पुस्तक परीक्षण :

- काव्यातून टिळकदर्शन' टिळकयुगाचे काव्यात्म दस्तऐवज
  **डॉ. नीलिमा गुंडी । ९**
- कविताच...माझी कबर : अस्वस्थतेची बखर
  **मारुती कटकधोंड । ४१**
- कार्यवृत्त । **प्रकाश पायगुडे । ५७**

संपादकीय

डॉ. पुरुषोत्तम काळे

# डॉ. श्रीराम लागूंचे निधन : पुरोगामी विचारधारेचा पुरस्कर्ता 'नटसम्राट' गेला!

ख्यातकीर्त अभिनेते, पुरोगामी विचारवंत आणि आपल्या मतप्रतिपादनार्थ कोणतीही किंमत मोजण्यास तयार असणारे 'नटसम्राट' डॉ. श्रीराम लागू यांचे निधन हा महाराष्ट्रीय सांस्कृतिक विश्वावर झालेला मोठा आघात आहे. अभिनयावरील आपल्या अतोनात प्रेमामुळे निष्णात डॉक्टर असूनही वैद्यकीय व्यवसाय सोडणारे डॉ. लागू, त्यांच्या नितांतसुंदर अभिनयामुळे रसिकांच्या हृदयात विराजमान झाले आहेत. सामना, सिंहासन, मुक्ता, पिंजरा यांसारखे मराठी चित्रपट डॉ. लागूंच्या भारदस्त संवादफेकीने आणि प्रभावी अभिनयाने गाजले. हिंदी चित्रपटांपैकी लावारिस, मुकद्दर का सिकंदर, सौतन या चित्रपटांमधील भूमिका रसिकांना आवडल्या; पण डॉक्टर लागूंना रंगमंचावर रमणे जास्त भावत असावे. वि. वा. शिरवाडकरांच्या 'नटसम्राट'मधील गणपतराव बेलवलकर, इथे ओशाळला मृत्यू'मधील संभाजी या पात्रांपासून ते मकरंद साठेंच्या 'सूर्य पाहिलेला माणूस'मधील सॉक्रेटिसपर्यंत प्रत्येक भूमिका आपल्या कसदार अभिनयाने डॉक्टरांनी अजरामर केली. पाश्चात्त्य साहित्याचा व्यासंग, देशोदेशींच्या रंगभूमीवरील बदलांची सूक्ष्म जाण आणि लॉरेन्स ऑलिव्हिए, गिलवूड आदी दिग्गज अभिनेत्यांच्या अभिनयाचा अभ्यास ही डॉ. लागूंच्या अभिनयामागील चिंतनाची सामुग्री होती. प्रखर निरीश्वरवादी तार्किक पुरोगामी विचारसरणी हे डॉ. लागूंच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य. 'देवाला रिटायर केल्याशिवाय सर्वधर्म समभावाचे थोतांड नष्ट होणार नाही. धार्मिक वाद आणि समाजाचे धार्मिक विभाजन टाळायचे असेल, तर निधर्मी राज्यव्यवस्थाच देशात असली पाहिजे. डॉक्टरांच्या मतांमुळे त्यांच्यावर टिकेचे प्रहारही झाले. प्रसिद्धीच्या हारांप्रमाणेच हे टिकेचे प्रहारही त्यांनी स्थितप्रज्ञतेने झेलले. देवाला न मानणाऱ्या या देवमाणसाने अभिव्यक्तिस्वातंत्र्यासाठी वेळोवेळी झालेल्या आंदोलनात आपला सक्रिय सहभाग नोंदवला. स्वतःच्या मतप्रतिपादनार्थ कोणतेही मोल देण्याची डॉ. लागूंची तयारी असे. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या हत्येनंतरची निदर्शने असोत किंवा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंचे उपोषण असो डॉक्टर नेहमीच अग्रभागी असत. त्यांच्या मुलाखती आणि वक्तव्ये अंतर्मुख करणारी असत. अनेक सामाजिक संस्थाच्या समाजहितैषी कार्यक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असे. रूपवेध आणि लमाण या त्यांच्या ग्रंथांतून त्यांची प्रखर बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणी प्रत्ययाला येते. गो. ग. आगरकरांच्या परंपरेतील डॉ. श्रीराम लागूंचे निधन हा पुण्याच्याच नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक क्षेत्रावरील आघात आहे. 'सूर्य पाहिलेला माणूस' ही बिरुदावली सार्थ करणाऱ्या डॉ. श्रीराम लागू

यांना भावपूर्ण आदरांजली!

उस्मानाबाद येथे होणाऱ्या ९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी फादर फ्रांसिस दिब्रिटो यांची एकमताने निवड झाली. फादर दिब्रिटो यांचे म. सा. परिषद आणि म. सा. पत्रिकेतर्फे हार्दिक अभिनंदन. सृजनाचा मोहोर, ओॲसिसच्या शोधात, संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची आणि सुबोध बायबलसारखी ग्रंथनिर्मिती करणाऱ्या फादर दिब्रिटो यांनी नेहमीच पर्यावरणवादी आणि मानवतावादी विचार मांडले. निसर्ग आणि सामान्य माणसाला उद्ध्वस्त करणाऱ्या विकासाची प्रारूपे त्यांनी नाकारली. फादर हस्तिदंती मनोऱ्यात बसून साहित्यनिर्मिती करणारे साहित्यिक नाहीत. आपल्या विचारांसाठी आणि सामान्य व्यक्तींवरील दडपशाहीविरुद्ध प्रसंगी निकराचा संघर्ष फादर दिब्रिटो यांनी केला आहे. त्यांचे अ. भा. म. सा. संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी नाव महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी सुचविले आणि सर्वानुमते मान्य झाले याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. फादर दिब्रिटो यांची निवड झाल्यानंतर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांना धमक्यांचे दूरध्वनी व संदेश आले. या प्रकाराचा आम्ही निषेध करतो. विचारांचा प्रतिवाद हा विचारांनीच व्हावा ही आमची भूमिका आहे. फादर दिब्रिटो यांचे साहित्य हे मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारे आहे म्हणून त्यांचा सन्मान हा सर्वथैव योग्य आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेत परंपरेप्रमाणे त्यांचा पहिला सत्कार झाला. धमक्यांच्या पार्श्वभूमीवर पोलिस बंदोबस्त होता ही खेदजनक बाब होती; परंतु हा विरोध क्षीण ठरला आणि फादर फ्रांसिस दिब्रिटो यांच्या निवडीचे महाराष्ट्रातील रसिक साहित्यप्रेमींनी स्वागत केले, याचे समाधान आहे.

धुळे येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या धुळे शाखेने आयोजित केलेल्या समीक्षा संमेलनाच्या अध्यक्षपदावरून रेखा इनामदार-साने यांनी केलेल्या भाषणाचा पहिला भाग या अंकात प्रकाशित करीत आहोत. मराठी साहित्य समीक्षेचा विचक्षण आढावा घेणारे आणि चिंतनपर भाष्य करणारे हे भाषण क्रमशः पुढील अंकातही येईल. फादर दिब्रिटो यांच्या साहित्याचे आणि व्यक्तिमत्त्वाचे मार्मिक दर्शन घडविणारा डॉ. न. म. जोशी यांचा लेख 'काव्यातून टिळकदर्शन' टिळकयुगाचे काव्यात्म दस्तऐवज हा नीलिमा गुंडी यांचा लेख, डॉ. द. ता. भोसले यांच्या लोकसंस्कृती : दर्शन आणि चिंतन या ग्रंथावरील डॉ. मथु सावंत यांचा लेख, महेंद्र कदम यांच्या तणस कादंबरीवरील ऋषिकेश देशमुख यांचा लेख, कल्याणी झा यांचा नामदेव ढसाळांच्या काव्यावरील लेख आणि विश्राम गुप्तेंच्या 'लेखकाची गोष्ट' या आत्मचरित्रपर ग्रंथाचे डॉ. राजेंद्र मलोसे यांनी केलेले परीक्षण ही या अंकाची वैशिष्ट्ये आहेत. विष्णू थोरे यांच्या 'धूळपेरा उसवता...' या काव्यसंग्रहाची डॉ. एकनाथ पगार यांनी केलेली समीक्षा वाचनीय आहे. शाहीर अनंत फंदी यांच्या द्विशताब्दी स्मृतिवर्षाच्या सांगतेनिमित्त प्रा. डॉ. शिरीष गंधे यांनी लिहिलेला लेख फंदी आणि समकालीन इतर प्रांतीय कवींच्या काव्याचा चिकित्सक आढावा घेतो. कीर्ती मुळीक यांच्या साहित्यावरील प्रा. सुजाता शेणई यांचा लेख मुळीक यांच्या साहित्यिक कारकिर्दीविषयी भाष्य करणारा आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सावेडी (नगर) शाखेने प्रकाशित केलेला 'वारसा' हा दिवाळी अंक हा या शाखेचा अभिनंदनीय उपक्रम आहे. संपादक नरेंद्र फिरोदिया आणि कार्यकारी संपादक जयंत येलूलकर हे प्रशंसेस पात्र आहेत. त्यांचे अभिनंदन.


गेल्या काही काळात म. सा. परिषदेचे माजी कोषाध्यक्ष आणि म. सा. पत्रिकेचे माजी संपादक ह. ल. निपुणगे, ज्येष्ठ लेखिका शकुंतला क्षीरसागर, ज्येष्ठ लेखक-समीक्षक अनिल बळेल आणि ज्येष्ठ लेखिका गिरीजा कीर यांचे निधन झाले. या मान्यवरांना म. सा. परिषद आणि पत्रिकेतर्फे भावपूर्ण आदरांजली.

साहित्य अकादमीचे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले आहेत. 'कदाचित अजूनही' या काव्यसंग्रहासाठी ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील यांना पुरस्कार जाहीर झाला. म. सा. पत्रिकेच्या गेल्या अंकात या काव्यसंग्रहाची समीक्षा डॉ. विलास पाटील यांनी केली होती. अनुराधा पाटील यांचे अभिनंदन!

मुखपृष्ठासाठी फादर फ्रांसिस दिब्रिटो यांचे देखणे छायाचित्र श्री. मिलिंद ढेरे यांनी उपलब्ध करून दिले. श्री. मिलिंद ढेरे यांचे आम्ही आभारी आहोत.

◆

**डॉ. पुरुषोत्तम काळे**
चलभाष : ९४०४९३७७१०
purushottamdkale@gmail.com
(टीप : हा अंक मसापच्या www.masapapune.org या संकेतस्थळावर तसेच डेलीहंट या मोबाईल ॲपवरही उपलब्ध आहे.)



लेख

डॉ. न. म. जोशी

# ओॲसिसच्या शोधात सृजनयात्री

**उस्मानाबाद येथील ९३ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फा. फ्रांसिस दिब्रिटो यांच्या वाङ्मयीन सांस्कृतिक कार्यकर्तृत्वाचा शैलीदार लेखाजोखा मांडत आहेत त्यांचे ज्येष्ठ स्नेही व सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. न. म. जोशी.**



अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड हा साहित्यविश्वातील गाजावाजा असतो. आधी निवडणुकींमुळे आणि आता निवडीमुळे! या वेळी ही निवड त्या अर्थाने गाजली नाही. महाराष्ट्र साहित्य परिषद सूचित फादर फ्रांसिस दिब्रिटो यांच्या नावाला महामंडळाने एकमताने संमती दिली आणि उस्मानाबाद येथे होणाऱ्या साहित्यशारदेच्या दरबारात त्यांना मूर्धन्यस्थानी स्थापित करण्याचे निश्चित केले. फादर हे ख्रिस्ती धर्मगुरू आहेत म्हणून विरोधाचे वा नाराजीचे सूर कुठे कुठे उमटले; पण बहुसंख्य मराठी अभिजन व बहुजन यांनी या निवडीचे ज्या आनंदस्वरात स्वागत केले त्या स्वरकल्लोळात हे विरोधी सूर केव्हाच विरून गेले हे कुणाच्या ध्यानीही आले नाही.

'सृजनाचा मोहोर' हे त्यांचे एकच ललितलेखांचे पुस्तक वाचले तरी या धर्मगुरूच्या विचारविश्वाचा धर्म माणुसकी हा आहे आणि त्याच्या आविष्करणातील गुरुत्व लक्षणीय आहे हे रसिक वाचकाच्या सहजी लक्षात येईल.

'मनातला मोहोर' या आपल्या प्रस्तावनेत फादर लिहितात- 'जीवाचा थरकाप उडविणाऱ्या क्रौर्याच्या राशी माणूस का रचत आहे? कसा फुलणार आहे आपल्या मनात सृजनाचा मोहोर? सृजनाच्या मोहोराचं स्वप्न पृथ्वीच्या काळजात आहे. त्याच शाश्वत सत्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न हृदयातील दिवा पेटता ठेवून केलेला आहे. शेवटी माणूसपणासाठीचा हा अट्टाहास.' परिवर्तनासाठी धर्म (लेखसंग्रह तेजाची पाऊले (ललित लेखसंग्रह), ओॲसिसच्या शोधात (प्रवासानुभव), सृजनाचा मोहोर (ललितलेख), आनंदाचे अंतरंग (अनुवाद), पथिकाची नामयात्रा (अनुवाद), कृतघ्न (नाटक-अनुवाद), संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची (वैचारिक, प्रवासानुभव).

फादर स्टीफन्स, रेव्ह. ना. वा. टिळक, फादर लेदर्ले यांच्यासारख्या अनेक ख्रिस्ती साहित्यिकांनी मराठी भाषेत लेखन करून सुंदर साहित्य निर्माण केले आहे. तीच परंपरा फा. दिब्रिटो साक्षेपीपणाने पुढे नेत आहेत.

फादर यांची जडणघडण कशी झाली, त्यांचा साहित्यप्रवास कसा होत गेला याविषयी काही लिहिणे आवश्यक आहे. शाळेत असल्यापासूनच दिब्रिटो यांना मराठी साहित्याचे आकर्षण होते. प्रथम त्यांनी 'नवा करार' वाचला आणि मग हातात पुस्तक आलं, 'ययाती'. या दोन पुस्तकांनी त्यांचे विचारविश्व ढवळून निघालं. आयुष्य हे क्षणभंगुर आहे, हा विचार पिंगा घालू

लागला. केवळ संपन्नता आहे म्हणून सुख मिळत नाही. या दिशेने त्यांचे विचारचिंतन सखोल होत गेले. घरची परिस्थिती बेताचीच होती. वडील शेतकरी होते. मोठे भाऊही शेतीच करीत. अशा परिस्थितीत लोकसेवेत आयुष्य व्यतीत करावं हा विचार बळावला. चर्चच्या सेवेत जावं, असं वाटू लागलं. त्यासाठी किमान मॅट्रिक होणं आवश्यक होतं. गोरेगावच्या ट्रेनिंग कॉलेजमधून दिब्रिटो यांनी आपलं धर्मविषयक शिक्षण पूर्ण केलं, आणि बॅचलर ऑफ थिऑलॉजी हा शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी ते व्हॅटिकनला गेले. अनेक देशांचा दौरा करून मुंबईला परतले. वसईमध्ये त्यांनी आपल्या धार्मिक कामाचा प्रारंभ केला. मराठी साहित्याचे वाचन आणि बरोबरीने लेखनही सुरू होते. या लेखनाला अनुभवांचा विशाल पट लाभला तो त्यांनी जगभर केलेल्या डोळस प्रवासाने आणि त्यांच्या विवेकनिष्ठ चिंतनाने.

म्हणूनच दिब्रिटो यांच्या लेखनात येशूची करुणा, बुद्धाची क्षमा, महावीरांची शांती, विवेकानंदांची वैश्विकता, तुकारामांचा परखडपणा आणि ज्ञानदेवांची सहिष्णुता यांचा मधुर संगम झालेला आढळतो.

धार्मिक साधनेबद्दल दिब्रिटो यांची भूमिका व्यापक असल्यामुळेच ते स्पष्ट लिहितात, ''माझा साधनाधर्म ख्रिश्चन असला तरी माझा समाजधर्म येथील बहुसंख्यांकांचा असलेला हिंदूधर्म आहे.''

बालपणापासूनच मनन चिंतनाबरोबर कृतिशीलतेकडे त्यांचा ओढा होता, आणि मग अर्थातच चर्चमधील हा लेखक धर्मगुरू रस्त्यावरील चळवळीचा आदर्श ठरला. वसईतील बांधकाम व्यावसायिकांनी उच्छाद मांडला होता. जमिनी हडप करून पर्यावरणाची लचकेतोड होत होती. हरित वसईचं भगभगीत वाळवंटात रूपांतर होत होतं. तशातच धमक्या, लाचखोरी, आक्रमणे, बेकायदा बांधकामे यांमुळे वसईतील सामान्य जनता जेरीस आली होती. अन्यायाला वाचा कोण फोडणार? दबलेल्या आवाजांना वाट कोण करून देणार? फादर पुढे झाले. त्यांनी त्यांची लेखणी तर तलवारीसारखी चालवलीच; पण तेवढं करून मदांधांना सद्बुद्धी होणार नाही, असं लक्षात आलं आणि मग हा धर्मगुरू चर्चमधून बाहेर आला. लेखणीबरोबरच संघटनेचं सुदर्शनचक्र हाती घेऊन त्यानं खलनिर्दालनाची मोहीम सुरू केली. फादर दिब्रिटो यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कितीतरी पदर त्यांची साहित्यसंपदा आणि त्यांचे जीवनचरित्र अभ्यासले, तर लक्षात येतात.

धर्मगुरू फादर, लेखक दिब्रिटो, पर्यावरणप्रेमी फ्रांसिस, समाजचिंतक प्रवासी, संतसाहित्याशी सोयरीक असलेला साहित्यिक आणि प्रामुख्याने मराठीशी नाळ असलेला महाराष्ट्रीय मुंबईकर, असे कितीतरी पैलू लक्षात येतात.

'सुवार्ता' या नियतकालिकाचे संपादक असलेले दिब्रिटो हा आणखी एक अभ्यासाचा विषय आहे. सुवार्ता हे चर्चचे नियतकालिक असले तरी त्यांनी ते चर्चेचे नियतकालिक म्हणून आकारास आणले.

वृत्तविहार, लोभ असावा यांसारख्या सदरांमधून त्यांनी सर्वसामान्य वाचकांशी सुवार्ताच्या माध्यमातून स्नेहसंबंध सुधारले. सुवार्तामध्ये ख्रिस्ती धर्मातील अनिष्ट रूढींवरही कठोर प्रहार केले. दिब्रिटो यांच्या कार्यकाळात सुवार्तानं बाळसं धरलं- सभोवतालच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक समस्यांचा वेध घेता घेता राष्ट्रीय प्रवाहात सुवार्तानं आपलं एक स्वतंत्र स्थान निर्माण केलं. मराठी नियतकालिकांची दशा उताराला लागलेली असताना सुवार्ता मात्र 'वाढता वाढता वाढे' अशा दिशेला प्रगत होत होती.

दिब्रिटो हे ख्रिस्ती धर्मगुरू असले तरी 'ख्रिस्ताचा अखेरचा मोह' अशा शीर्षकाची एक प्रक्षोभक ठरलेली कादंबरी त्यांनी तटस्थपणे अभ्यासली आणि तरीही या पुस्तकावर बंदी आणण्याचा विचार माध्यमांद्वारे पुढे येताच दिब्रिटो आपले परखड मत व्यक्त करतात की, 'भाविकांच्या भावनेला तडा देणारे हे पुस्तक आहे तरीही पुस्तकावर बंदी आणण्याने प्रश्न सुटणार नाही.'

अशातऱ्हेने अशा आव्हानात्मक प्रसंगी त्यांनी अभिव्यक्तीस्वातंत्र्यालाच पुरस्कृत केले आहे, हे जाणवते. याच वेळी त्यांच्यामधील मूल्यविचारही ते विसरलेले नाहीत, हेही जाणवते.

दिब्रिटो यांच्या वाङ्मयीन कार्यकर्तृत्वाचा सखोल समीक्षणात्मक साक्षेपी आढावा घेता येईल. स्थळाअभावी एवढा दीर्घ लेख लिहिणे शक्य नाही; पण अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची जी निवड झाली त्या निवडीच्या दृष्टिकोनातून त्यांचं मराठीविषयीचं कार्य मात्र एकत्रित स्वरूपात समोर आलं पाहिजे. 'मराठी भाषा व साहित्य' यासंबंधी त्यांच्या कार्याला केंद्रस्थानी मानून विचार केला, तर काही मुद्दे अत्यंत महत्त्वाचे असे मांडता येतील. सारांशरूपाने ते असे -



**“ फादर दिब्रिटो हे नुसता विचार मांडून थांबत नाहीत. तो कृतीत आणण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. याचं एकच ठळक उदाहरण असं... एकदा ते जेरुसलेमला गेले होते. तेथील मंदिरात भव्य शिलालेखावर अनेक भाषांमध्ये येशूची विश्वप्रार्थना कोरून ठेवलेली त्यांनी पाहिली; पण त्यात मराठी नव्हती. अथक प्रयत्न करून दिब्रिटो यांनी तेथे मराठीतील शिलालेख करवून घेतला आणि कोणी 'मराठी' माणूस जेरूसलेमला गेला, तर अभिमानाने त्या मराठी शिलालेखासोबत स्वतःची छबी काढून घेतो. ”**

**दिब्रिटो यांची नाळ मराठी आहे :**

जन्म मराठी कुटुंबात. शिक्षण मराठीत. मराठी माध्यमात आणि पुढील सर्व लेखन प्रवास मराठी भाषेच्या वाटेनेच. ते संपादक झाले ते मराठी सुवार्ताचेच. त्यांची भाषणे मराठीत असतात. संवाद मराठीत असतात. पत्रव्यवहार मराठीत असतो. या अर्थाने त्यांची नाळ मराठी आहे हे न सांगताही लक्षात येते.

दिब्रिटो हे मराठीचे उत्तम वाचक आणि अभ्यासक आहेत. साहित्य परिषदेच्या साहित्य प्राज्ञ, साहित्य विशारद या परीक्षा ते विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.

त्यांचा साहित्य प्रवास ययाती (वि.स. खांडेकर) कादंबरीच्या वाचनाने आणि तदुपरांत चिंतनाने झाला आहे, मागे सांगितलेच आहे. मराठीतील निवडक अस्सल मराठी कलाकृती तर त्यांनी वाचल्या आहेतच; पण मराठीतील नवकाव्यासह अनेक साहित्यप्रवाहांचे त्यांनी डोळसपणे वाचन केले आहे. त्यामुळेच त्यांच्या लेखनात जागोजागी मराठी संतसाहित्यातील आणि ख्यातनाम साहित्यिकांच्या साहित्यातील सुवचने आणि सुविचार पेरलेले असतात. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' किंवा 'सहनाववतु, सहनौभुनक्तु यांसारखे गीर्वाणवाणीतील संदर्भ त्यांच्या लेखनात येतात. या ख्रिस्ती धर्मगुरूच्या उजव्या हाती ज्ञानेश्वरी आहे. डाव्या हातात तुकोबांची गाथा आहे. त्यांच्या जिभेवर रामदास आहेत तसे त्यांच्या दैनंदिन संग्रहात म. फुले, डॉ. आंबेडकरही आहेत.

**कृतिशील मराठी भाषा संवर्धक :**

फादर दिब्रिटो हे नुसता विचार मांडून थांबत नाहीत. तो कृतीत आणण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. याचं एकच ठळक उदाहरण असं... एकदा ते जेरुसलेमला गेले होते. तेथील मंदिरात भव्य शिलालेखावर अनेक भाषांमध्ये येशूची विश्वप्रार्थना कोरून ठेवलेली त्यांनी पाहिली; पण त्यात मराठी नव्हती. अथक प्रयत्न करून दिब्रिटो यांनी तेथे मराठीतील शिलालेख करवून घेतला आणि कोणी 'मराठी' माणूस जेरूसलेमला गेला, तर अभिमानाने त्या मराठी शिलालेखासोबत स्वतःची छबी काढून घेतो.

'मराठी सुबोध बायबल' हा तर दिब्रिटो यांच्या मराठी लेखनमंदिराचा कळस आहे. सुबोध बायबलच्या भाषांतराला खास मराठीचा चंदनगंध आहे. मोगऱ्याचा सुवास आहे आणि संतवाणीचा सम्यक आधार आहे.

**वाचकप्रिय मराठी लेखक (समीक्षांसह) :**

मराठीतील निवडक लेखकांना जसा वाचकांचा प्रतिसाद लाभतो तसाच उदंड प्रतिसाद दिब्रिटो यांच्या लेखनाला लाभलेला आहे. वाड्यापाड्यापासून इमले-हवेल्यापर्यंत त्यांचे वाचक सर्वत्र आहेत. राजा कांदळकर हे दिब्रिटोंना 'बाप माणूस' म्हणतात, तर बाळ राणे त्यांना व्रतस्थ जीवनाचे वारकरी म्हणतात. सौ. आसावरी जोशी दिब्रिटोंनी लिहिलेले 'प्रिय येशूस पत्र' वाचून प्रभावित होतात आणि लिहितात,

''तुमच्या पत्रातील ऑलिव्हच्या डोंगरावर आता जावंच लागेल; जेकबच्या विहिरीचं पाणी आता चाखावंच लागेल; जेरुसलेमच्या टेकडीवरही एकदा फिरून येईन म्हणते.'' अ. र. कुलक यांनी नवभारतामध्ये दिब्रिटो यांच्या पुस्तकांविषयी लिहितांना म्हटले आहे, ''प्रवासात स्थळापेक्षा माणूस शोधण्याच्या प्रयत्नात दिब्रिटोंना विविध वृत्तिप्रवृत्तींची जी माणसे भेटतात त्यांचे वर्णन जिवंतशैलीत मांडले आहे.'' राजा जाधव यांना त्यांचे निर्भीड व्यक्तिमत्त्व अधिक भावते. विश्व हिंदू परिषदेच्या वनवासी कल्याण आश्रमाचे कै. माधवराव काणे यांचे पुतणे कल्याणचे दिलीप काणे यांना दिब्रिटो

**फादर दिब्रिटो यांना मी ओळखत होतो; पण ते मला ओळखतात हे त्यांनीच मला जागतिक मराठी परिषदेत मुंबईला भेटल्यावर सांगितले. वृत्तपत्रांतील माझ्या बोधकथा ते आवर्जून वाचतात हे ऐकून मलाच आश्चर्य वाटले. सुबोध बायबलची एक मुद्रणप्रत घेऊन एकदा ते माझ्याकडे आले आणि म्हणाले, ''हे वाचून तुमची टिपणी लिहा.''**

**''फादर, बायबलचा आणि माझा संबंध फारच थोडा. केवळ वाचक म्हणून! मी काय सांगणार?''**

**''मला एका रसिक वाचकाचीच प्रतिक्रिया हवी. शिवाय तुम्ही मराठीचे नामवंत शिक्षक. त्या दृष्टीनेही वाचा.'' मी बायबल वाचले आणि पारिभाषिक संज्ञांसंबंधी टीपा द्याव्यात ही सूचना केली. आणखीही किरकोळ सूचना केल्या. त्या अंमलात आणलेल्या दिसल्या. खूप दिवसांनी मी घरी नसताना ते आले होते. एक पाकीट ठेवून गेले. ते सार्थ पाकीट होते. मी फोनवरून ते स्वीकारण्यास नकार दिला. तेव्हा ते जिव्हाळ्यानं म्हणाले, ''मानधन म्हणून स्वीकारायचे नसले तरी धर्मगुरूचा प्रसाद म्हणून ठेवा.'' मी धार्मिक नसलो तरी धर्म मानणारा असल्यामुळे मी तो प्रसाद भाविकतेने ठेवून घेतला.**

यांचे शब्द म्हणजे 'ईश्वराच्या उपासनेचे पूजाद्रव्य' वाटते. सोलापूरचे ल. सि. जाधव यांना सुबोध बायबल वाचून गदिमा यांच्या गीतरामायणाची आठवण होते. बिशप एडविन कोलासो दिब्रिटो यांना अमृतमहोत्सवी शुभेच्छा देताना लिहितात, 'तेजाची पाऊले समोर ठेवून चिंतन करणे आणि चालणे याबाबत शहाणपण आम्हाला लाभलं.'

**राजमान्य व लोकमान्य मराठी लेखक, कार्यकर्ता :**

महाराष्ट्र शासन, साहित्य अकादमी यांच्यासह अनेक संस्थांचे बहुमानाचे पुरस्कार फा. दिब्रिटो यांना मिळाले आहेत. ही राजमान्यता तर मिळालीच; पण त्यांच्या पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघून त्यांना सर्वदूर लोकमान्यताही मिळालेली आहे. एवढी लोकप्रियता लाभलेली असली तरी त्यांच्यातील अभ्यासू संशोधक कार्यकर्ता म्हणून विविध अशा संस्थांवर काम करीत असतो. कुसुमाग्रज प्रतिष्ठान, राज्य मराठी विकास संस्था आणि शासनाच्या विविध समित्यांवर दिब्रिटो यांनी मराठी तज्ज्ञ म्हणून निष्ठेने काम केले आहे. ते करताना त्यांनी मूल्यविचार, तटस्थता आणि निःस्पृह दृष्टी यांची साथ कधीही सोडलेली नाही. नुकतेच समता पुरस्कार स्वीकारताना त्यांनी 'प्रजा भिकारी आणि राजा शिकारी' असे परखड बोल सुनावले.

दिब्रिटो यांच्या लोभस मराठी व्यक्तिमत्त्वाचे हे असे अनेक पैलू आहेत.

''जगात जे जे सुविचार वारे
मदीय भाषेत भरोत सारे''

असं साने गुरुजी यांनी आपलं लेखनवांछित व्यक्त केलं आहे. फा. दिब्रिटो यांची लेखणीही सुविचार - सुस्नात आहे.

'संग, संगीत आणि संस्कार' या तीन सकारांनी आपलं जीवन कृतार्थ होईल अशा शेकडो उपनिषदीय समान सुवचने लिहिणाऱ्या कविमनाचे फादर फ्रांसिस यांच्याविषयी तीन शब्दांत सांगायचं तर मी म्हणेन...

फा. दिब्रिटो हे 'ओॲसिसच्या शोधातील सृजनयात्री' आहेत.

फा. दिब्रिटो यांचे मूळ घराणे सामवेदी हिंदू ब्राह्मणाचे. त्यांच्या पूर्वजांनी चारशे वर्षांपूर्वी पोर्तुगीज कालखंडात धर्मांतर केले; पण त्या घराण्यात मराठीपण जपले आहे.

*मराठीचा हा ख्रिस्ती सुपुत्र कसा आहे...*
*मूळ मराठी, नाळ मराठी*
*देश मराठी, वेष मराठी*
*शाळा मराठी, बोल मराठी*
*वाणी मराठी, राहणी मराठी*
*विचार मराठी, आचार मराठी*
*मायमराठीचा हा पुत्र मराठी*

●

**न. म. जोशी**
चलभाष : ९२२६५७५२९०

पुस्तक परीक्षण

**डॉ. नीलिमा गुंडी**

# ‘काव्यातून टिळकदर्शन’ टिळकयुगाचे काव्यात्म दस्तऐवज

**वेगवेगळ्या वयोगटातल्या, विविध कालखंडातल्या, विविध भाषांमधल्या, विविध जातिधर्माच्या कवींच्या विविध प्रकारच्या काव्यरचनांचा आविष्कार टिळकांवरच्या यातील कवितांमधून घडतो. टिळक हे कवितांचे केवळ ‘विषय’ नव्हते, तर युगस्पंदनांचा ‘आशय’ लोकांपर्यंत पोहोचवणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. जनमानसाच्या या प्रभावाचे आणि तत्कालीन घटनांचे दर्शन या पुस्तकातून येत असल्यामुळे हे पुस्तक एकप्रकारे टिळकयुगाचे काव्यात्म दस्तऐवज ठरते.**



**लो**कमान्य टिळकांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त प्रकाशित झालेले स्वप्नील पोरे यांचे ‘काव्यातून टिळकदर्शन’ हे पुस्तक म्हणजे टिळकयुगाचे काव्यात्म दस्तऐवज ठरते. लो. बाळ गंगाधर टिळक हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रणी व्यक्तिमत्त्व होते. ‘भारतीय असंतोषाचे जनक’, ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच’ असा जनतेला मंत्र देणारे झुंझार नेते ही त्यांची रूपे आपल्या मनावर आजही प्रभाव टाकतात. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते. त्यांचे जीवनकार्य राष्ट्रभक्तीने उजळून निघाले होते, तसेच ‘गीतारहस्य’ या भगवद्‌गीतेवरील भाष्यग्रंथाची तुरुंगात केलेली निर्मिती, त्यांच्या प्रगाढ बुद्धिमत्तेने, जनसामान्यांना स्तिमित करून टाकणारी होती. त्यामुळेच टिळकयुग हे केवळ त्यांच्या हयातीपुरते उरले नाही. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा प्रभावी झंकार कविमनातून उमटत राहिला. अशाप्रकारचा सन्मान फार कमी व्यक्तींना मिळतो. वेगवेगळ्या वयोगटातल्या, विविध कालखंडातल्या, विविध भाषांमधल्या, विविध जातिधर्माच्या कवींच्या विविध प्रकारच्या काव्यरचनांचा आविष्कार टिळकांवरच्या यातील कवितांमधून घडतो. टिळक हे कवितांचे केवळ ‘विषय’ नव्हते, तर युगस्पंदनांचा ‘आशय’ लोकांपर्यंत पोहोचवणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. जनमानसाच्या या प्रभावाचे आणि तत्कालीन घटनांचे दर्शन या पुस्तकातून येत असल्यामुळे हे पुस्तक एकप्रकारे टिळकयुगाचे काव्यात्म दस्तऐवज ठरते.

प्रस्तुत पुस्तकात टिळकांविषयीच्या अनेक कवींच्या कवितांचे मार्मिक रसग्रहण वाचायला मिळते. यात कवी गोविंद, गोविंदाग्रज, सावरकर, भा. रा. तांबे, यशवंत, अज्ञातवासी, केशवकुमार, ग. दि. माडगूळकर, वा. रा. कान्त, कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, संजीवनी मराठे आदी नामांकित कवींच्या कविता समाविष्ट आहेत. त्याबरोबर इतरही अनेक कवींच्या निवडक कवितांचा नेमका संदर्भ देत त्यातील काही ओळींचा समावेश केल्यामुळे या विषयाची व्याप्ती किती मोठी आहे, याचा अंदाज यायला मदत झाली आहे. भूपाळी, पोवाडा, पदे,



'काव्यातून टिळकदर्शन'
स्वप्नील पोरे,
केसरी मराठा ट्रस्ट, पुणे.
मुखपृष्ठ - अरुण सूर्यवंशी,
पृष्ठसंख्या १४४,
किंमत २०० रु.

**"भूपाळी, पोवाडा, पदे, वृत्तबद्ध रचना, शोकगीत, दीर्घकाव्य, स्तोत्र, आरती आणि मुक्तशैलीतल्या कविता असे रचनेचे विविध घाटही यात पाहायला मिळतात. 'दख्खनचा दिनमणी गेला लोकांतरी' ही ग. त्र्यं माडखोलकरांची कविता, 'सूर्याची लाल पगडी, मस्तकी धारण केलेला' ही मधुकर कुलकर्णी यांची कविता, सन्मित्र समाज मेळ्याची पदे अशा वेगळ्या रचनाही लक्षवेधी आहेत. विशेष म्हणजे ग. रा. करमळकर लिखित 'लोकमान्यालंकारः' ही संस्कृत काव्यरचना, 'लोकमान्यांचे राष्ट्रगीत' ही एका मुस्लीम टिळकभक्ताची रचना, ज्योत्स्ना शिवदे यांचा 'तेजोनिधी' हा टिळकचरित्रपर काव्यसंग्रह, मौलाना हसरत मोहानी यांची उर्दू कविता, सुब्रह्मण्यम भारती आणि सरोजिनी नायडू यांच्या इंग्रजी कविता, विनोद, जया पांडे आदींच्या हिंदी कविता, तसेच हुँदराज दुखायल यांची सिंधी कविता यांच्याविषयीच्या माहितीमुळे पुस्तकाचे आकर्षण वाढले आहे. यातून टिळकांच्या राष्ट्रीय पातळीवरील प्रभावक्षमतेचे यथार्थ दर्शन घडते."**

वृत्तबद्ध रचना, शोकगीत, दीर्घकाव्य, स्तोत्र, आरती आणि मुक्तशैलीतल्या कविता असे रचनेचे विविध घाटही यात पाहायला मिळतात. 'दख्खनचा दिनमणी गेला लोकांतरी' ही ग. त्र्यं माडखोलकरांची कविता, 'सूर्याची लाल पगडी, मस्तकी धारण केलेला' ही मधुकर कुलकर्णी यांची कविता, सन्मित्र समाज मेळ्याची पदे अशा वेगळ्या रचनाही लक्षवेधी आहेत. विशेष म्हणजे ग. रा. करमळकर लिखित 'लोकमान्यालंकारः' ही संस्कृत काव्यरचना, 'लोकमान्यांचे राष्ट्रगीत' ही एका मुस्लीम टिळकभक्ताची रचना, ज्योत्स्ना शिवदे यांचा 'तेजोनिधी' हा टिळकचरित्रपर काव्यसंग्रह, मौलाना हसरत मोहानी यांची उर्दू कविता, सुब्रह्मण्यम भारती आणि सरोजिनी नायडू यांच्या इंग्रजी कविता, विनोद, जया पांडे आदींच्या हिंदी कविता, तसेच हुँदराज दुखायल यांची सिंधी कविता यांच्याविषयीच्या माहितीमुळे पुस्तकाचे आकर्षण वाढले आहे. यातून टिळकांच्या राष्ट्रीय पातळीवरील प्रभावक्षमतेचे यथार्थ दर्शन घडते.

'टिळक युगात राष्ट्रीय कवितेला खरा सूर सापडला', 'मी गेल्यावर 'केसरी'चा अंक देहावर घाला', अशी शं. ना. बर्वे यांनी व्यक्त केलेली इच्छा, तसेच 'सन्मित्र मेळ्याचे कर्झन काव्य गोविंदाग्रजांनी मुलांना छुपेपणाने शिकवले' अशा पुस्तकातल्या विधानांना ऐतिहासिक महत्त्व आहे. या पुस्तकातून टिळकांच्या जीवनातील विविध प्रसंगांना अनुलक्षून व्यक्त झालेल्या कवींच्या भावना जशा कळतात, तशाच कविमन आणि कालतत्त्व यांच्या परस्पर नात्यांच्या अनेक शक्यताही कळतात. प्रस्तुत पुस्तकाची प्रस्तावना श्री. दीपक टिळक यांची असून श्री. मिलिंद जोशी यांनी पुस्तकाची पाठराखण केली आहे. अनेक पुस्तकांच्या मुखपृष्ठांची छायाचित्रे आणि कवितांच्या प्रसिद्धीचे संदर्भ दिल्यामुळे पुस्तकाला संशोधनाची असलेली बैठक लक्षात यायला मदत झाली आहे. स्वप्नील पोरे यांनी मनोगतात उल्लेख केलेल्या 'काव्यमय टिळक' या का. र. वैशंपायन यांच्या पुस्तकाविषयीची नोंद व त्याचे मुखपृष्ठ पुस्तकातही समाविष्ट करायला हवे होते. ही लहानशी त्रुटी जाणवते. एकंदरीत हे पुस्तक त्यातील कवितांच्या आस्वादामुळे सहज वाचनीय बनले आहे आणि ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यासनीयही ठरले आहे. श्री. पोरे यांनी म्हटले आहे की, टिळकांवरील कविता या स्वातंत्र्यपूर्व काळातील इतिहासाचा आरसा आहे. त्यांच्या या निरीक्षणाची प्रचिती या पुस्तकातून नक्कीच येते.

●

**डॉ. नीलिमा गुंडी,**
अन्नपूर्णा,
१२५९, शुक्रवार पेठ,
पुणे ४११००२

भाषण

रेखा इनामदार–साने

# समीक्षा वाचण्याची जिज्ञासा साहित्यप्रेमींमध्ये वाढली तरी आपल्या सांस्कृतिक जाणिवा प्रगल्भ होतील!

**महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, धुळे शाखा आणि जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट संचालित झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय देवपूर, धुळे आयोजित समीक्षा संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. रेखा इनामदार-साने यांचे अध्यक्षीय भाषण. हे भाषण क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.**

धुळे मुक्कामी होत असलेल्या या आठव्या 'समीक्षा संमेलना'च्या अध्यक्षपदाचा मान 'अवघे पाऊणशे वयमान' नसतानाही 'महाराष्ट्र साहित्य परिषदे'च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमताने मला दिला, याबद्दल सुरुवातीलाच मी त्यांच्यासकट सर्वांप्रति मनापासून कृतज्ञता व्यक्त करते. अनेक अर्थांनी हा उपक्रम रुजवणे, तो बळकट होण्यासाठी विशेष प्रयत्न करणे, त्यासाठी वातावरण पोषक राखणे हे मला अत्यंत आवश्यक वाटते कारण मूलतः 'समीक्षा' लेखनाची निकडच आपल्या समाजामध्ये अनेकांना वाटत नाही. किंबहुना त्यांना ती अप्रियच असते. अशा सर्वस्वी विपरीत परिस्थितीत चार जाणत्या लोकांना एकत्र येऊन हे संमेलन, ते ही पुण्या-मुंबईत नव्हे, तर धुळ्यासारख्या कोरडवाहू, रखरखीत, नानाविध आपत्तींनी ग्रासलेल्या प्रदेशात आयोजित करावेसे वाटले, हे निश्चितपणे उल्लेखनीय आहे. मी धुळ्यामध्ये का आले? असा संकेत आहे की, ज्या गावात आपण आलो आहोत, त्याच्याविषयी बरे बोलावे, नाहीतर ते औचित्यपूर्ण होणार नाही; पण म्हणून नव्हे, तर मनापासून मला इकडे यावेसे वाटले याची दोन-तीन कारणे आहेत. एकतर २५-३० वर्षांपूर्वीपर्यंत पुणे-मुंबई ही महानगरे साहित्यव्यवहाराची केंद्रस्थाने होती. आता ती तशी राहिलेली नाहीत. वाढत्या लोकसंख्येचे खेड्यांमधून व निमशहरी भागातून शहरांकडे, शहरांमधून परदेशात (त्यातही पश्चिमेकडे) होणारे स्थलांतर, प्रगत तंत्रज्ञानाचा झपाटा, प्रदूषित हवेचा विळखा, अस्ताव्यस्त पसरत जाणाऱ्या काड्यापेटीसारख्या इमारतींची दाटी, श्वास घ्यायला मुश्कील व्हावे, अशी वाहनांची व माणसांची तुंबळ गर्दी - अशा वातावरणात जेथे माणसांना वाचायलासुद्धा चार घटका फुरसत नाही तेथे स्वतःला जे वाटते ते व्यक्त करायला मिळणे दुरापास्तच झाले आहे, यात नवल नाही. मुळात या बाह्य कल्लोळात आपला आतला आवाज तरी शाबूत आहे का? त्यामुळे आता असा कशाचा तरी उच्चार करावासा वाटणारी, त्याची दखल घ्यायला लावणारी माणसे लहानसहान गावांमधून, निमशहरी भागातून येत आहेत, भविष्यातही येतील व आपले अस्तित्व खणखणीतपणे दाखवून देतील, असे वाटते. म्हणून निमंत्रक संस्था असलेल्या 'महाराष्ट्र साहित्य परिषदे'चे, 'समीक्षा संमेलना'चा घाट घालणाऱ्या संयोजकांचे मी खरोखर अभिनंदन करते आणि या निमित्ताने उदयोन्मुख लेखकांना आणि अभ्यासकांना भेटण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मला मिळाली, याचा आनंद व्यक्त करते.

१९८० च्या दशकात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत असताना धुळ्याचे नाव कानावर पडले ते 'का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन केंद्रा'मुळे! कॅनडामध्ये

वास्तव्य असलेल्या, कितीतरी कौटुंबिक अडचणींचा, अडथळ्यांचा सामना करणाऱ्या वाणी यांनी अशा प्रकारच्या केंद्राची उभारणीच नव्हे तर, निगुतीने निगराणी करावी, हे विशेष होते. त्यात डॉ. जगन्नाथ वाणी हे सद्‌गृहस्थ औपचारिक अर्थाने साहित्य-व्यवहाराशी संबंधितही नव्हेत. तरीदेखील मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती याविषयीचे त्यांचे ममत्व प्रत्यक्ष कृतिशीलतेतून प्रकट झाले, अबाधित राहिले, असे उदाहरण दुर्मिळ म्हणावे लागेल. 'राजवाडे संशोधन केंद्र', 'कवितारती' (संपादक- पुरुषोत्तम पाटील) हे नियतकालिक, 'मराठी वाङ्‌मयाचा इतिहास' लिहिणारे प्रा. ह. श्री. शेणोलीकर या सर्वांचा महिमा मला चांगला माहिती आहे, म्हणून या भूमीत हे संमेलन होणे आणि त्यासाठी मला इथे येता आले याचे निश्चितपणे समाधान आहे.

माझ्याआधी प्रा. रा. ग. जाधव, डॉ. सुधीर रसाळ, डॉ. वसंत आबाजी डहाके, डॉ. दिलीप धोंडगे, डॉ. हरिश्चंद्र थोरात, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले व डॉ. के. रं. शिरवाडकर या व्यासंगी प्रज्ञावंतांनी संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले आहे. त्यांच्या पंक्तीमध्ये आपण माझा समावेश केला आहे याचा मला अत्यंत संकोच वाटतो आहे. उपरोक्तच नव्हे, तर मराठीमध्ये का. बा. मराठे, वि. का. राजवाडे, श्री. कृ. कोल्हटकर, वा. ब. पटवर्धन, वा. म. जोशी, श्री. के. क्षीरसागर, कुसुमावती देशपांडे, वा. ल. कुलकर्णीपासून बा. सी. मर्ढेकर, नरहर कुरुंदकर, म. वा. धोंड, रा. भा. पाटणकर, विजया राजाध्यक्ष, त्र्यं. वि. सरदेशमुख, म. सु. पाटील, गंगाधर पाटील व हरिश्चंद्र थोरात यांच्यापर्यंत कितीतरी तेजस्वी, विचक्षण समीक्षकांची जोरदार परंपरा आहे. केवळ तात्त्विक खंडनमंडन करणारी सैद्धांतिक समीक्षा (Meta Criticism) आणि विशिष्ट सिद्धांताचे प्रात्यक्षिक घडवणारी प्रत्यक्ष किंवा उपयोजित समीक्षा (pplied Criticism) अशा दोन्ही प्रकारचे समीक्षात्मक लेखन त्यांनी सातत्याने व विपुल प्रमाणात केले. वस्तुतः त्यासाठी लागणारी संशोधनात्मक सामग्री, उदा. काही इंग्रजी बीजग्रंथ त्यांना परिश्रमपूर्वक मिळवावे, मुद्दाम मागवावे लागत होते. त्यासाठी लागणारी आर्थिक सुबत्ताही त्यांच्यापैकी बहुतेकांकडे नव्हती, कारण अल्पअपवाद वगळले, तर बरेचसे समीक्षक अध्यापन क्षेत्रात नोकऱ्या करीत होते आणि त्यांना दरमहा मिळणारा पगार खाऊनपिऊन सुखी राहण्याइतपतच होता. हे गृहीत धरून वर्षानुवर्षे ते वाचत, लिहीत व अभ्यास करत राहिले. त्यांनी आपापला ग्रंथसंग्रह केला. तो ठेवा अभिमानाने जपला. त्याचे फलित त्यांच्या स्वतःच्या लेखनातून दृष्टोत्पत्तीस येते. कुलकर्णी कुलोत्पन्न सर्व समीक्षकांनी किमान पाच तरी समीक्षा ग्रंथ सिद्ध केलेले दिसतात.

ललित साहित्याची निर्मिती, त्याचे प्रयोजन व त्याचे स्वरूप यांचा शोध वेगळ्या दिशेने घेताना स्वतंत्र सिद्धान्तांचीही मांडणी काही लेखक, भाष्यकारांनी केलेली आढळते. उदा. बा. सी. मर्ढेकरांनी लयसिद्धान्ताचे, साहित्याच्या माध्यमाचे व महात्मतेचे आणि 'लेखनपूर्व व लेखनगर्भ आत्मनिष्ठे'चे केलेले प्रतिपादन, शरच्चंद्र मुक्तिबोधप्रणीत 'मानुषते'ची संकल्पना, भालचंद्र नेमाडे यांचा 'देशीवाद' किंवा दिलीप चित्रेप्रणीत 'अस्तित्वभाना'ची संकल्पना. गेल्या २५ ते ३० वर्षांत साहित्यसमीक्षेमध्ये कितीही नवनव्या दृष्टिकोनांची भर पडलेली असली, त्यांचा कमी-अधिक प्रमाणात आधार घेऊन कलाकृतींचे अर्थनिर्णयन आणि मूल्यमापन होत असले, तसे करीत असताना तिचे काही अनोखे पैलू प्रकाशमान होऊन वाचकाच्या आकलनाचे क्षितिज विस्तारत असले तरी पूर्वसुरींचे ऋण कमी होत नाही. साहित्य-व्यवहारावर असलेली त्यांची अव्यभिचारी निष्ठा जराही विचलित झाली नाही, म्हणून अध्यापन कार्यातून ते निवृत्त झाले, त्यांना आजारपण आले तरी अखंडपणे ते कामात व्यग्र राहिले. त्यांना पुरस्कारांचे प्रोत्साहन, बढतीचे आमिष वा प्रसिद्धीचे वलय यांपैकी कशाचेही आकर्षण वाटले नाही कारण ते आपाततः 'प्रासंगिक' समीक्षक नव्हते, तर चिकित्सक वृत्ती हा त्यांचा अंगभूत अविभाज्य घटक होता. म्हणून तर द. ग. गोडसे नेपथ्यकार आणि इतिहासाचे अभ्यासक होते आणि माधव आचवल व्यवसायाने वास्तुकला विशारद होते. तरीही त्यांनी उत्तम समीक्षा लिहिली. 'पोत', 'शक्तिसौष्ठव', 'गतिमानी' (लेखक द. ग. गोडसे), आणि 'जास्वंद' व 'रसास्वाद' (लेखक माधव आचवल) हे ग्रंथ उत्तम आस्वादक समीक्षेचा मूर्तिमंत वस्तुपाठ म्हणावेत, असे आहेत. अलीकडच्या काळातील एस. डी. इनामदार ('रूपबंध'), अरुण खोपकर ('चित्रव्यूह' व 'चलत चित्रव्यूह') हे ग्रंथही दृश्यकलांवर समीक्षा करणारे असले तरी महत्त्वाचे आहेत. समीक्षेच्या या अनवट वाटा आज खुंटत चालल्या आहेत की काय अशी शंका येते. तरीदेखील वातावरण फारसे अनुकूल नसताना, सांस्कृतिक जाणीव दुबळी होत चाललेली असताना आणि मुळात

> **“** समीक्षकाची भूमिका केवळ वाचकाची, रसिकाची, शिक्षकाची, उपदेशकाची वा न्यायाधीशाची नसते, तर ती डोळस, संस्कारित व ज्ञानी शोधकाची असते. त्याचा हा शोध अनेकानेक वाटा-वळणांवरून निरंतर चालू राहणारा असतो म्हणून 'साहित्यसमीक्षा' ही एकदिशीय, एकरेषीय संकल्पना नाही, याचे प्रत्यंतर मराठी समीक्षेच्या आजवर झालेल्या वाटचालीतूनही दिसून येते. या ज्ञान-व्यवहारावर निस्सीम निष्ठा असल्याने, अगदी विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत मराठी साहित्यसमीक्षेची वाटचाल दमदारपणे होण्यामध्ये अनेकानेक समीक्षकांची कामगिरी मोलाची आहे, यात शंका नाही. **”**

'समीक्षे'विषयीची आपली आस्था आणि आत्मीयताच मंदावलेली असताना ज्यांनी मराठी साहित्यसमीक्षेची परंपरा समृद्ध व बहुआयामी केली, त्यांचे मनोमन कृतज्ञतापूर्वक स्मरण करून विनम्रपणे मी हे अध्यक्षपद स्वीकारत आहे. या अखंड कडीचा मी एक लहानसा दुवा आहे, याची मला जाणीव आहे.

■

कोणत्याही साहित्यकृतीचा प्रकार (कथा, कादंबरी, कविता, नाटक इ.), तिचे आशयसूत्र (व्यक्तिकेंद्रित, सामाजिक इ.), वास्तव व कल्पित यांची लेखकाने केलेली गुंफण (घटना, प्रसंग, पात्रे इ. मधून मूर्त होणारी) तिची भाषिक संरचना (शब्दबंध, वाक्यबंध, प्रतिमा, प्रतीके इ.), तिचे सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भ (विषय, आशय, काल व अवकाश इ. च्या निवडीतून प्रतीत होणारे) यातून जी एकजिनसी संघटना आकारते (किंवा जी आकारत नाही) तिचे विश्लेषण, अर्थनिर्णयन व मूल्यमापन समीक्षक करीत असतो. त्यामधून सौंदर्यमूल्ये व सौंदर्येतर (म्हणजे राजकीय, सामाजिक इ.) मूल्ये, त्यांचे प्रकटीकरण लेखकाला कसे साधले आहे व ते कोणत्या प्रतीचे किंवा दर्जाचे आहे, हे समीक्षक सांगत असतो. ते सांगत असताना ज्या निकषांचा आधार तो घेतो ते सार्वत्रिक असले तरी परिवर्तनशील असतात म्हणून समीक्षकाची भूमिका केवळ वाचकाची, रसिकाची, शिक्षकाची, उपदेशकाची वा न्यायाधीशाची नसते, तर ती डोळस, संस्कारित व ज्ञानी शोधकाची असते. त्याचा हा शोध अनेकानेक वाटा-वळणांवरून निरंतर चालू राहणारा असतो म्हणून 'साहित्यसमीक्षा' ही एकदिशीय, एकरेषीय संकल्पना नाही, याचे प्रत्यंतर मराठी समीक्षेच्या आजवर झालेल्या वाटचालीतूनही दिसून येते.

या ज्ञान-व्यवहारावर निस्सीम निष्ठा असल्याने, अगदी विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत मराठी साहित्यसमीक्षेची वाटचाल दमदारपणे होण्यामध्ये अनेकानेक समीक्षकांची कामगिरी मोलाची आहे, यात शंका नाही. १८७२ साली का. बा. मराठे यांनी लिहिलेला 'नावल आणि नाटक याविषयीचा निबंध' हा जर आरंभबिंदू मानला तर तेथपासून हरिश्चंद्र थोरात लिखित 'कथनात्म साहित्य आणि समीक्षा' (२०११) येथपर्यंतचा इतिहास, त्यातील वळणे चढ-उतार विशद करणारा आढावा येथे स्थल-कालमर्यादा असल्याने विस्ताराने घेणे शक्य नसले तरी मराठी समीक्षा कालौघात कसकशी बदलत गेली त्याचा मागोवा येथे संक्षेपाने घेणे उपयुक्त ठरेल.

■

साधारणतः १९५० सालापर्यंत, 'साहित्यकृती ही स्वायत्त, स्वतंत्र सौंदर्यमूल्य असलेली कलात्मक निर्मिती असते. कोणतेही कलाबाह्य प्रयोजन व त्याची फलश्रुती तिच्यातून अभिप्रेत वा अपेक्षित नसते' ही धारणा केंद्रवर्ती असणारा कलावाद आणि 'साहित्य म्हणजे जीवनाचा आरसा, संसृतीटीका असल्याने (व कोणताही साहित्यिक समाजाचा घटक असल्याने तो 'हस्तिदंती मनोऱ्या'त राहत नसल्याने) समाजसापेक्ष सर्जनशीलतेचा आविष्कार, सामाजिक जाणिवांची अभिव्यक्ती करण्याचे, सामाजिक परिवर्तन घडविण्याचे साधन' हा विचार प्रबळ असणारा जीवनवाद अशी समीक्षेची द्विध्रुवात्मक मांडणी केली जात होती. अनुक्रमे ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर हे या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करणारे साहित्यिक होते. १९५० नंतर पाश्चात्त्यांच्या प्रभावातून मर्ढेकरांनी आपल्या सौंदर्यशास्त्राचा पाया घातला. त्यांनी साम्य-विरोध व समतोल या घटकांचे साधार विवेचन करून लयसिद्धांतांची मांडणी तर केलीच, त्याचबरोबर या आधी म्हटल्याप्रमाणे लेखनपूर्व व लेखनगर्भ आत्मनिष्ठा, वाङ्मयीन महात्मता,

साहित्याचे माध्यम व रूपबंध अशा अनेक पारिभाषिक संज्ञा रूढ केल्या. समीक्षेला शास्त्रीय व तर्कशुद्ध बैठक देण्याचा हा पहिला प्रयत्न होता. 'सौंदर्य' या शब्दाभोवती असलेले गूढ धुके त्यांच्यामुळे विरून गेले.

१९७० नंतर तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि भारतीय व पाश्चिमात्य साहित्यशास्त्र यांतून निष्पन्न झालेल्या सौंदर्यविषयक नानाविध उपपत्तींचा जो विस्तृत व व्यापक नकाशा ('सौंदर्यमीमांसा' या बृहतग्रंथाच्या रूपाने) रा. भा. पाटणकरांनी समोर ठेवला तो वर्तमानकालीन व भविष्यकालीन सर्व साहित्य विमर्शकांना आजही मार्गदर्शक ठरणारा आहे. सौंदर्यलक्ष्यी सर्व व्यवहार अलौकिक आहेत ही एका टोकाची भूमिका, तर ते तसे नसून जीवनविषयक अन्य व्यवहारांसारखेच आहेत, ही दुसऱ्या टोकाची भूमिका म्हणजे अनुक्रमे लौकिकतावाद व अलौकिकतावाद होय. (विस्तारभयास्तव हे सुलभीकरण केले आहे याची अर्थातच मला जाणीव आहे). पाटणकरांच्या शब्दांत सांगायचे, तर या दोन तात्त्विक भूमिका केवळ वेगळ्या नसून त्या परस्परविरोधी व परस्परव्यावर्तक आहेत. मात्र आधुनिक मराठी समीक्षेमध्ये त्या त्या समीक्षकाच्या वृत्ती-प्रवृत्तीनुसार बऱ्याचदा त्यामध्ये सरमिसळ झालेली आढळते. त्यामुळे समीक्षकांच्या भूमिकेबाबत संदिग्धता उत्पन्न होते (उदा. रा. ग. जाधव, गो. म. कुलकर्णी इ.). पाटणकरांनी सिद्ध केलेला सौंदर्यशास्त्राचा दबदबा व प्रभाव त्यानंतरच्या काळात प्रभाकर पाध्ये ('सौंदर्यानुभव') व मे. पुं. रेगे यांच्या मतमतान्तरांनी आणखी वाढला. किंबहुना साहित्यसमीक्षा करण्यासाठी सौंदर्यविषयक उपपत्ती अवगत असायला हव्यात, ही समजूत त्यामुळे बळकट झाली. 'सौंदर्यशास्त्र' हे प्रकरण इतके जटील होते की, तत्कालीन दोन मातब्बर साहित्यिकांना त्यावर विडंबनात्मक लिहिल्यावाचून राहवले नाही. (पाहा : 'एक सौंदर्यवाचक विधान' हा पु. ल. देशपांडे यांचा लेख आणि जयवंत दळवींनी 'निवडक ठणठणपाळ' मधून त्यावर केलेली मार्मिक टीका!) असे असले तरी प्रत्येक उच्चारित किंवा लिखित शब्दाचा नेमका अर्थ, त्याची व्याख्या, व्युत्पत्ती व व्याप्ती नीट ध्यानात घेऊन मग तो योजण्याची शिस्त, याची सवय लावण्याचे श्रेय रा. भा. पाटणकर, प्रभाकर पाध्ये मे. पुं. रेगे व गंगाधर पाटील यांना जाते, असे निश्चितपणे म्हणता येईल.

या वाटचालीतील आणखी एक टप्पा त्यातल्या त्यात ठळकपणे दाखवता येतो कारण प्रस्तुत दृष्टिकोन केवळ साहित्य वा कलाव्यवहाराशी संबद्ध नसून समग्र जीवनविषयक विचारप्रणालीशी मानलेली बांधिलकी त्यामध्ये अनुस्यूत आहे, त्यामुळे समाजशास्त्रीय म्हणजे प्रामुख्याने साम्यवादी पद्धतीने केलेली समीक्षा असा समज बराच काळ रूढ होता. आर्थिक उत्पादनसंबंधावर आधारित शोषक (भांडवलशाहीत आपल्या हाती सर्व साधने व सत्ता राखून ठेवलेला) मालक वर्ग व त्यांच्याकडून होणारी पिळवणूक सहन करणारा शोषित (श्रम करूनही लाभांपासून वंचित राहणारा) श्रमजीवी मजूर, कामगारवर्ग यांच्यातील कलह चव्हाट्यावर मांडणारे, त्या संघर्षातून उत्पन्न होणाऱ्या दुःखाला भिडलेली निर्मिती मूल्यगर्भ मानणारे साहित्य या प्रकारच्या समीक्षेच्या दृष्टिकोनातून अधिक अन्वर्थक ठरले. मार्क्सवादी समीक्षेची 'नवी मळवाट' काही काळ इतकी प्रभावी ठरली की, गं. बा. सरदारांनीसुद्धा 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' सांगितली. 'साहित्य आणि समाजजीवना'चा वेध लालजी पेंडसे यांनी घेतला, तर 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' यांचा अनुबंध उलगडून दाखवताना 'मानुषता' हे ललितकृतीचे संघटक तत्त्व म्हणून शरच्चंद्र मुक्तिबोधांनी मांडले. साहित्याची 'निर्मिती व समीक्षा' यांचा परामर्श घेताना मार्क्सवादी समीक्षेतील अपुरेपणा दि. के. बेडेकरांना जाणवला होता; पण भूमिकेवर असलेल्या ठाम निष्ठेमुळे त्यांच्या 'खुलेपणा'ला मर्यादा आलेल्या दिसतात. (तरीही बेडेकरांचा वेगळेपणा हा की जसा पाश्चात्त्य तत्त्वविचाराचा अभ्यास त्यांनी केला होता, तसे संस्कृत साहित्यशास्त्रही त्यांना अवगत होते. 'अस्तित्ववादाची ओळख' त्यांनी प्रथम करून दिली. हेगेल या विश्वविख्यात तत्त्वज्ञावर त्यांनी भाष्यग्रंथ लिहिला. कवितेतून रसनिष्पत्ती कशी साधते यावरही त्यांनी प्रकाश टाकला, हे विसरता येणार नाही.) परंतु समाजशास्त्रीय म्हणजे जणू काही केवळ मार्क्सवादी, असे मानल्याने क्षेत्र-पाहाणी, नमुना-विश्लेषण, प्रश्नावली आदि तंत्रे पूर्णतः दुर्लक्षित राहिली, हे येथे अवश्य नमूद करायला हवे. श्री. व्यं. केतकर लिखित 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' या ग्रंथाने वस्तुतः समाजशास्त्रीय समीक्षेची दिशा दाखवली होती; परंतु पुढे कोणीही ती अनुसरलेली दिसत नाही.

१९७० नंतर वास्तववाद, देशीवाद संस्कृतिसंयोग व नवनैतिकता या संकल्पनांची मांडणी भालचंद्र नेमाडे यांनी केली. नेमाडे पुरस्कृत मूल्यसरणी विवाद्य ठरली तरी त्यावरील अनुकूल-प्रतिकूल विचारमंथन समीक्षेला समृद्ध

**“ १९७५ नंतर विभिन्न जनसमूहांना आपल्या अस्मितेचे प्रखर भान आले. शिक्षणाचा प्रचार-प्रसार सर्वदूर होऊ लागला. सौंदर्यविषयक प्रस्थापित (‘मौज’, ‘सत्यकथा’ प्रणीत) निकषांना लघुअनियतकालिकांच्या चळवळीतून ठाम नकार दिला गेला. नामदेव ढसाळ, राजा ढाले, सतीश काळसेकर, अशोक शहाणे यांनी ‘असो’, ‘वाचा’, ‘अथर्व’ यामधून स्फुट परीक्षणात्मक लेखन केले. त्याचबरोबर ग्रामीण, दलित, जनवादी व आदिवासी असे नानाविध प्रकारचे संवेदन ललित साहित्यातून व्यक्त होऊ लागले. तेव्हा त्याला सह-संवादी ठरेल, त्याची पाठराखण करेल अशी समीक्षाही विपुल प्रमाणात लिहिली गेली. आनंद यादव, वासुदेव मुलाटे इत्यादींनी ग्रामीण साहित्यसमीक्षेची चौकट बळकट करण्याचा प्रयत्न केला, तर गंगाधर पानतावणे, भालचंद्र फडके, रा. ग. जाधव, यशवंत मनोहर, बाबुराव बागूल यांच्यापासून अक्षरशः असंख्य अभ्यासकांनी दलित साहित्याची उत्साहाने, स्वागतशील समीक्षा केली. या. वा. वडस्कर यांनी जनवादी साहित्याकडे, तर प्रमोद मुनघाटे यांनी आदिवासी साहित्याकडे आपले लक्ष वेधले. स्त्रीवादी समीक्षेची दखल पुढे स्वतंत्रपणे घेतली आहे. ”**

करणारे ठरले. वि, का. राजवाडे, भालचंद्र नेमाडे, विलास सारंग व हरिश्चंद्र थोरात यांनी ‘कादंबरी’ या साहित्यप्रकाराकडेच नव्हे, तर समग्र साहित्याकडे बघण्याची, त्याचे पुनर्मूल्यांकन करण्याची एक नवी दिशा दिली. त्यांची दखल घेतल्याशिवाय कादंबरी-समीक्षा विकसित करता येत नाही, इतकी अपरिहार्यता त्यांनी निर्माण केली आहे.

१९७५ नंतर विभिन्न जनसमूहांना आपल्या अस्मितेचे प्रखर भान आले. शिक्षणाचा प्रचार-प्रसार सर्वदूर होऊ लागला. सौंदर्यविषयक प्रस्थापित (‘मौज’, ‘सत्यकथा’ प्रणीत) निकषांना लघुअनियतकालिकांच्या चळवळीतून ठाम नकार दिला गेला. नामदेव ढसाळ, राजा ढाले, सतीश काळसेकर, अशोक शहाणे यांनी ‘असो’, ‘वाचा’, ‘अथर्व’ यामधून स्फुट परीक्षणात्मक लेखन केले. त्याचबरोबर ग्रामीण, दलित, जनवादी व आदिवासी असे नानाविध प्रकारचे संवेदन ललित साहित्यातून व्यक्त होऊ लागले. तेव्हा त्याला सह-संवादी ठरेल, त्याची पाठराखण करेल अशी समीक्षाही विपुल प्रमाणात लिहिली गेली. आनंद यादव, वासुदेव मुलाटे इत्यादींनी ग्रामीण साहित्यसमीक्षेची चौकट बळकट करण्याचा प्रयत्न केला, तर गंगाधर पानतावणे, भालचंद्र फडके, रा. ग. जाधव, यशवंत मनोहर, बाबुराव बागूल यांच्यापासून अक्षरशः असंख्य अभ्यासकांनी दलित साहित्याची उत्साहाने, स्वागतशील समीक्षा केली. या. वा. वडस्कर यांनी जनवादी साहित्याकडे, तर प्रमोद मुनघाटे यांनी आदिवासी साहित्याकडे आपले लक्ष वेधले. स्त्रीवादी समीक्षेची दखल पुढे स्वतंत्रपणे घेतली आहे.

याच काळात, दुर्लक्षित राहिलेल्या लोकसाहित्यातील आशयसूत्रे, त्यांचे संकेतव्यूह, त्यातील प्रतिमा-प्रतीके, प्राक्कथा- त्यांची अर्थपूर्णता व शैली यांचा सखोल व सूक्ष्म ऊहापोह दुर्गा भागवत (‘लोकसाहित्याची रूपरेखा’ इ. ग्रंथ), रा. चिं. ढेरे (‘लज्जागौरी‘, ‘लोकदैवतांचे विश्व’ इ.), प्रभाकर मांडे (‘लोकसाहित्याचे अंतःप्रवाह’, ‘लोकसंस्कृतीचे मूलतत्व’ इ.), तारा भवाळकर (‘लोकसंचित’, ‘लोकपरंपरेतील सीता’ इ.), विश्वनाथ शिंदे (‘पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य’) यांनी ग्रंथरूपाने केलेला आढळतो. यामुळे आपल्या मौखिक साहित्याच्या परंपरेला उजाळा तर मिळालाच; परंतु त्याकडे नव्या दृष्टिकोनातून पाहिले, तर ते किती वैविध्य व वैचित्र्यपूर्ण आहे, अर्थाचे अनेक पदर त्यातून कसे दृष्टिपथात येतात, हे ही उमजले. विशेषतः अन्तःस्फूर्तता आणि सिद्धान्तन यांची सांगड घातल्याने ही समीक्षा अत्यंत मौलिक ठरली. तसेच उपयोजित समीक्षाही वेगवेगळ्या दिशांनी विकसित झालेली आढळते. उदा. साहित्यप्रकारनिष्ठ समीक्षेमध्ये ‘कविता आणि प्रतिमा’ (सुधीर रसाळ), ‘अर्वाचीन मराठी काव्यदर्शन’ (अक्षयकुमार काळे), ‘कवितेविषयी’ (वसंत आबाजी डहाके), ‘कविता : संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा’ (वसंत पाटणकर), ‘मराठी कथेचा उद्गम आणि विकास’ (इंदुमती शेवडे), ‘कथा: संकल्पना आणि समीक्षा’ (सुधा जोशी), ‘लघुनिबंध ते मुक्तगद्य’ (वि. शं. चौघुले) यांचा अंतर्भाव करता येईल. एका लेखकाच्या समग्र साहित्याचीही समीक्षा झालेली आढळते. उदा. रा. रं. बोराडे यांच्या साहित्यावरील ‘घरशिवार’ ( संपादक - चंद्रकुमार नलगे), श्याम मनोहर यांच्या साहित्याची ‘लोचना आणि आलोचना’ (संपादक - चंद्रकांत पाटील ), संत साहित्याचे नवे आकलन शब्दांकित करणारी समीक्षा दिलीप चित्रे (‘पुन्हा तुकाराम’), व सदानंद मोरे (‘तुकाराम दर्शन’)

इत्यादींनी लिहिली. परिप्रेक्ष्य वेगळे असल्याने हे ग्रंथ आजही महत्त्वाचे ठरतात. तसेच, एका साहित्यकृतीची अनेकांनी केलेली समीक्षाही आढळते. 'बालकवींची औदुंबर कविता : विविध अर्थध्वनी' (संपादक एस. एस. नाडकर्णी), 'कोसलाबद्दल' (संपादक- बाबा भांड), 'नटसम्राट' समीक्षा (संपादक गो. तु. पाटील) इत्यादी. 'मराठी साहित्य : १९५० ते १९७५' (संपादक - म. द. हातकणंगलेकर, गो. मा. पवार) या ग्रंथामध्ये विशिष्ट कालखंडातील सर्व साहित्यप्रकारांचा साकल्याने विचार केला गेला. अगदी 'विसाव्या शतकातील मराठी समीक्षे'ची समीक्षादेखील साहित्यप्रकारांच्या अनुषंगाने केलेली आढळते. (संपा.- विलास खोले). काव्य, नाट्य, कथा, कादंबरी, सैद्धांतिक व उपयोजित समीक्षेचा आलेखच यामुळे व्यवस्थितपणे रेखाटला गेला. मुळात चर्चासत्रात वाचल्या गेलेल्या, नीलिमा गुंडी, शुभदा शेळके, भारती निरगुडकर, हरिश्चंद्र थोरात, रवींद्र किंबहुने, रा. ग. जाधव व भालचंद्र नेमाडे (समारोप) या अभ्यासकांच्या निबंधांनी साहित्यसमीक्षेस फार मोठा हातभार लावला. अशी फलदायी चर्चासत्रेही आता होत नाहीत. त्यामुळे जागोजागचे अभ्यासक एकत्र येऊन आपापल्या विचारांचे आदानप्रदान करू शकत नाहीत. परिणामी समीक्षेचा पैस विस्तारत नाही. या संपादनांनीही समीक्षेला मोठा हातभार लावला. मुख्य म्हणजे त्यातून दृष्टिकोनांचे वैविध्य अधोरेखित झाले. एखादी प्रस्तावना देखील साहित्यसमीक्षेचा वस्तुपाठ कशी ठरू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे पु. शि. रेगे यांच्या काव्यसंपादनाचे आदिबंधात्मक दृष्टिकोनातून विश्लेषण करणारी 'सुहृदगाथा' या संग्रहाची गंगाधर पाटील यांनी लिहिलेली प्रस्तावना होय. साहित्यसमीक्षकांची प्रतिमा त्यांच्यामुळे उजळ झाली, गुणगौरवास पात्र ठरली. तुलनेने 'लोकप्रिय साहित्या'वर व अन्य कलांवर चिकित्सापूर्वक लिहिले न गेल्याने आजही मराठी वाचक संगीत, चित्र, शिल्प यांसंबंधी अडाणीच राहिलेला आहे. 'दाद' देण्यापलीकडे तो सहसा जात नाही.

आजपर्यंत लिहिल्या गेलेल्या समीक्षात्मक लेखनाचे स्थूलमानाने समालोचन करताना त्या त्या काळातील नियतकालिकांची नोंद अवश्य केली पाहिजे कारण मराठी कथा जशी त्यांच्या आश्रयाने बहरली तशीच परिस्थिती समीक्षेच्या संदर्भातही आहे. किंबहुना आजमितीला समीक्षेची जी दुरवस्था झालेली आहे तिचे एक महत्त्वाचे कारण नियतकालिकांचा अभाव, हे आहे. (इंग्रजी माध्यमातून शिक्षण झाल्याने मातृभाषेची हेळसांड होणे, परिणामी कोणतीही एक भाषा नीट आत्मसात केलेली नसणे, आपल्या यथार्थ अभिव्यक्तीसाठी किमान काही कौशल्ये अंगी बाणवण्याची निकड अंतर्यामी न जाणवणे, उत्कटताच क्षीण झालेली असल्याने 'मजकूरांमध्ये विरामचिन्हेच वारंवार येणे, शब्दांचा ओघ आटल्याने मुळात ललित, वैचारिक साहित्याचे उगमस्त्रोतच कोरडे, ओलावा कसाबसा टिकवून धरलेले असणे यामुळे समीक्षा कशाची, आणि कोणासाठी करायची? हे प्रश्न सद्यःपरिस्थितीत अधूनमधून डोके वर काढतात!) केवळ ग्रंथपरीक्षणे व समीक्षा यांना वाहिलेले 'आलोचना'सारखे नियतकालिक प्रा. वसंत दावतर यांनी ३० ते ३५ वर्षे, आर्थिक नुकसान सोसून व खस्ता खाऊन चालवले. त्याआधी व त्यानंतरच्या काळातही 'छंद', 'अभिरुची', 'समीक्षक', 'सत्यकथा', 'साहित्य', 'अस्मितादर्श', 'युगवाणी', 'प्रतिष्ठान', 'अनुष्टुभ', 'कवितारती', 'भरतशास्त्र' इत्यादी नियतकालिकांनी समीक्षेच्या वाढीस फार मोठा हातभार लावला. दिलीप चित्रे यांनी महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेल्या अष्टपैलू पु. ल. देशपांडे यांना 'विदूषक' असे संबोधून त्यांच्यावर लिहिलेला टीकात्मक लेख, अशोक शहाणे यांनी मराठी साहित्यावर टाकलेला क्ष-किरण, माधव मनोहर यांनी कितीतरी नाटककारांचे उघडकीस आणलेले वाङ्मयचौर्य, 'रेखेची वाहाणी' या सदरातून 'कथनमीमांसे'चा गंगाधर पाटील यांनी करून दिलेला परिचय आणि 'नवभारत'मधून मे. पुं. रेगे यांनी केलेली विस्तृत, सडेतोड व मूळ ग्रंथातील उणिवांवर निर्भीडपणे बोट ठेवणारी परीक्षणे, त्या त्या काळातच नव्हे, तर पुढे अनेक वर्षेचर्चेचा विषय ठरली. १९८० च्या दशकातसुद्धा आपले ग्रंथपरीक्षण 'सत्यकथे'त वा तत्सम नियतकालिकात छापून येणे हा मानबिंदू होता. आता हे सारे अस्तंगत होत चालले आहे, परंतु परिस्थिती विपरीत असली तरी यशोधन पाटील संपादित 'मुक्तशब्द' मध्ये समीक्षेला आजही स्थान आहे. त्याहून विशेष म्हणजे 'रंगवाचा' व 'सजग' या नव्या नियतकालिकांचा जन्म झाला आहे. त्यांचे भरणपोषण करण्याची जबाबदारी आपली आहे, हे विसरून चालणार नाही. समीक्षा वाचण्याची जिज्ञासा जरी साहित्यप्रेमींमध्ये वाढली तरी आपल्या एकूणच सांस्कृतिक जाणिवा प्रगल्भ होतील, यात शंका नाही.

**(क्रमशः)**


■

समीक्षा

**डॉ. मथु सुरेश सावंत**

# लोकसंस्कृतीचे लोभस दर्शन व चिकित्सक चिंतन

**लोकसंस्कृती दर्शन व चिंतन या डॉ. द. ता. भोसले यांच्या ग्रंथाची डॉ. मथु सावंत यांनी केलेली समीक्षा.**



**लोकसंस्कृती : दर्शन आणि चिंतन, लेखक : डॉ. द. ता. भोसले पृष्ठे : १९१, मूल्य रु. २५०/-, मुखपृष्ठ : गिरीश सहस्रबुद्धे प्रकाशक : अरुण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे-४११०३८**

**ज्ये**ष्ठ साहित्यिक डॉ. द.ता. भोसले यांच्या दोन कादंबऱ्या, आठ कथासंग्रह, पाच वैचारिक ग्रंथ, सहा ललितलेखसंग्रह, लोकसंस्कृतीवरील पाच ग्रंथ, सात समीक्षाग्रंथ, दोन चरित्रग्रंथ, पंधरा संपादित ग्रंथ, ग्रामीण बोलीतील शब्दकोश व म्हणींचे चार संग्रह इ. ५४ ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे. लोकसंस्कृती व लोकजीवनाचे गाढे अभ्यासक म्हणून ते महाराष्ट्राला चिरपरिचित आहेत. नऊ पुरस्कार लाभलेला त्यांचा 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' हा ग्रंथ मॅकमिलन प्रकाशनातर्फे इंग्रजीत अनुवादित व प्रकाशित झाला आहे.

लोकसाहित्य, लोकसंस्कृती व लोकजीवन हा डॉ. द. ता. भोसले यांच्या दीर्घकाळ, लेखन, चिंतन व संशोधनाचा विषय राहिला आहे. 'लोकसंस्कृती : दर्शन आणि चिंतन' हा त्यांचा ग्रंथ नुकताच प्रकाशित झाला आहे. या ग्रंथावरून डॉ. द. ता. भोसले यांची लोकसंस्कृतीच्या अभ्यासक्षेत्रातील उंची अधोरेखित होते.

डॉ. भोसले यांनी प्रस्तुत ग्रंथाची मांडणी दोन विभागांत केलेली आहे. पहिल्या विभागात संशोधनपर १२ लेख असून दुसऱ्या विभागात अतिशय माहितीपूर्ण आणि लालित्यपूर्ण असे आठ लेख आहेत. लोकसंस्कृती ही निसर्गसन्मुख जगण्याला महत्त्व देते. संरक्षण, सर्जन, संगोपन आणि सहकार्य यांना महत्त्व देते. सेवा आणि समर्पणाला महत्त्व देते. ईहवाद आणि अध्यात्म यांचा सुरेख संगम लोकसंस्कृतीत सापडतो. तथापि जागतिकीकरणाच्या झंझावातात ही निसर्गनिष्ठ आणि कृषिनिष्ठ लोकसंस्कृती अस्तास जाऊ लागली आहे. आज महाराष्ट्रात ह्या जीवनदायिनी लोकसंस्कृतीचे डॉ. द. ता. भोसले यांच्यासारखे नैष्ठिक अभ्यासक हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. त्या पार्श्वभूमीवर डॉ. भोसले यांचे या क्षेत्रातील कार्य उठून दिसते.

'इतिहास आणि लोकसंस्कृती : परस्पर अनुबंध' ह्या पहिल्याच लेखात लेखकाने प्रचलित इतिहास-लेखनाच्या काही मर्यादा दाखवून दिल्या आहेत. निर्दोष इतिहास-लेखनासाठी सामाजिक स्थितिगतीचे यथातथ्य दर्शन घडायला हवे. ज्ञात इतिहासाच्या मागचा लपलेला इतिहास उजेडात यायला हवा, असे आग्रही मतप्रतिपादन त्यांनी केले आहे.

इतिहासातून साकार झालेला युगधर्म ज्ञात झाला, तरच तो खरा आणि परिपूर्ण इतिहास ठरेल, असे डॉ. भोसले यांना वाटते. या संदर्भात त्यांनी डॉ. रा. चिं. ढेरे यांचे एक अवतरण उद्धृत केले आहे, ते असे : 'लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती ही सर्व सामाजिक शास्त्रांचे मायपोट आहे,' या विधानाच्या

प्रकाशात इतिहासाच्या परिपूर्ण आकलनासाठी मानव्यविद्या आणि लोकसाहित्य/लोकसंस्कृतीचा अभ्यास अत्यंत आवश्यक आहे, असे डॉ. भोसले यांचे आग्रही प्रतिपादन आहे. एकांगी इतिहास लेखनातील त्रुटी दाखविताना डॉ. भोसले यांनी इतिहासातील चकव्यांची अक्षरश: यादीच दिली आहे. इतिहास आणि लोकपरंपरा/लोकसंस्कृती यांच्यामध्ये एक सशक्त असे आंतरिक नाते आहे, असा साधार दावा ते करतात. प्रस्तुत लेख म्हणजे डॉ. द. ता. भोसले यांनी अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या नांदेड येथे झालेल्या २१ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण आहे. इतिहासाच्या अभ्यासकांच्या परिषदेत जाऊन अभ्यासकांना खडे बोल (तेही साधार आणि संयमाने) सुनावण्यासाठी जे विद्याव्यासंगाचे तेज लागते, ते डॉ. भोसले यांनी संपादन केलेले आहे. या भाषणाच्या माध्यमातून डॉ. द. ता. भोसले यांनी इतिहास लेखकांना, इतिहासाच्या अभ्यासकांना 'दृष्टी' देण्याचे काम केले आहे. भाषा व वाङ्मयाचे अभ्यासक असलेल्या डॉ. भोसले यांचा इतिहास विषयाचा अभ्यास पाहून थक्क व्हायला होते. लेखकाने भाषणाच्या समारोपात (लेखाच्या निष्कर्षात) जे विधान केले आहे, ते ज्ञानाच्या विविध क्षेत्रांतील जाणकारांनी आपल्या काळजावर कोरून घ्यावे, असे आहे. ते म्हणतात : 'सत्याच्या संपूर्ण साक्षात्कारासाठी सत्याच्या फक्त पुढे दिवा असून चालत नाही. सत्याच्या पाठीमागेही दुसरा दिवा आवश्यक असतो. लोकसंस्कृती या दुसऱ्या दिव्याची भूमिका बजावते.' (पृष्ठ २५)

डॉ. द. ता. भोसले यांनी या लेखाच्या माध्यमातून एकांगी व अर्धवट ज्ञानाच्या उजेडात चाचपडणाऱ्या तथाकथित विद्वानांना दिवा दाखविण्याचे काम केले आहे, तेही अतिशय विनम्रतेने!

'लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती : परस्पर अनुबंध' ह्या दुसऱ्या लेखात लेखकाने लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचे परस्पराश्रयी अस्तित्व अधोरेखित केले आहे. लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीला लाभलेले शब्दरूप असते. लोकसाहित्याची सखोल आणि समग्र ओळख करून घेण्यासाठी लोकसंस्कृतीचा अभ्यास आवश्यक असतो. त्या त्या काळातील लोकजीवन, लोकधारणा, जीवनरहाटी, श्रद्धा आणि उपासना, सण आणि सोहळे, देवदेवता आणि त्यांच्या उपासना या पूर्णत: जाणून घेण्यासाठी लोकसंस्कृतीचा अभ्यास आवश्यक असतो. इतक्या ह्या दोन बाबी एकजीव झालेल्या असतात. किंबहुना लोकसंस्कृतीपासून लोकसाहित्य वेगळे करताच येत नाही, हे पटवून देण्यासाठी लेखकाने 'वीर मारुती' आणि 'दास मारुती', नवरात्रातील घटस्थापनेमागचा मथितार्थ, पोतराजाच्या हातातील कडूलिंबाच्या डहाळ्या इ. लोकसंस्कृतीतील प्रतिमा आणि प्रतीकांचा अर्थ उलगडून दाखविला आहे. या निमित्ताने लेखकाने लोककथा, लोकगीते, विधिगीते, परंपरा, रूढी यांचा मागोवा घेतला आहे. लोकसंस्कृतीच्या घनदाट व निस्तेज होत गेलेल्या धारणा-संकल्पना यांचा धांडोळा घेतला आहे.

भूतकाळ आणि वर्तमानकाळ जाणून घेण्यासाठी लोकसाहित्याचा आणि लोकसंस्कृतीचा अभ्यास कसा आवश्यक आहे, ते दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन पटवून देतात. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासामुळे माणसाचे पंचमहाभूतांशी असणारे चिरंतन नाते समजते. निसर्ग आणि माणूस यांचे परस्परपोषक आणि परस्परावलंबी नाते असते. असे असले तरी डॉ. द. ता. भोसले हे लोकसंस्कृतीचे अंधभक्त नाहीत. लोकसंस्कृतीतील कालबाह्य, गतार्थ, जाचक आणि व्यर्थ बाबींचा व परंपरांचा अनावश्यक गौरव न करता त्यांचा त्याग करण्याचा आग्रह धरतात. वर्णवर्चस्व, वर्णश्रेष्ठत्व, जातीयता, धर्माच्या नावाखाली होणारे शोषण, कर्मकांड, स्त्रियांविषयीच्या चुकीच्या धारणा, घातलेली बंधने पूर्वास्पृश्यांवर होणारे अन्याय व त्यांना दिली जाणारी निंद्य वागणूक यांसारख्या बाबींचा ते कृतियुक्त निषेध करतात.

'लोकसंस्कृती' असा ज्या संस्कृतीचा वारंवार उल्लेख केला जातो, ती मुळात ग्रामसंस्कृती आहे आणि म्हणूनच ती कृषिसंस्कृतीही आहे. या संस्कृतीचे भूमीशी घनिष्ट नाते असते. कृषिनिष्ठ संस्कृती ही पंचमहाभूतांची उपासना करणारी संस्कृती आहे. या संस्कृतीत भूमी आणि भूमिपुत्रांचे घनिष्ठ आंतरिक नाते असते. या संस्कृतीची जीवनशैली भूमिकेंद्री असते. म्हणून या संस्कृतीत भूमीविषयीची नितांत कृतज्ञता असते. या संस्कृतीत भूमी आणि स्त्री यांच्याकडे सर्जनाची केंद्रं म्हणून पाहिले जाते. माता आणि माती ह्या दोन्हींकडे सर्जन आणि संवर्धन करणाऱ्या शक्ती म्हणून पाहिले जाते. 'भूमी आणि लोकसंस्कृती' या लेखात लेखकाने भूमीशी संबंधित विविध लोकविधींची आणि उपासना पद्धतींची अतिशय सांगोपांग माहिती दिली आहे. अन्नाचा पहिला घास आणि पाण्याचा पहिला घोट भूमीला अर्पण करण्याची कृतज्ञता त्यामुळेच इथे रुजली आहे. जन्माला येणारे नवजात बाळ जसे मातेचे आहे, तसेच आधी

“ग्रामीण जीवनातील लोकोत्सव' हा आपल्या पूर्वजांनी आपल्या संस्कृतीचा जतन करून ठेवलेला समृद्ध असा वारसा आहे. सुंबरान, जागरण, पारंपरिक नृत्यनाट्य, भुलादेवीचा उत्सव, विदर्भातील दंडार, गोव्यातील धालो, कर्नाटकातील यक्षगान, महाराष्ट्रातील तमाशा, गोंधळ, छबिना, भवाडा, ललित, पंचमी आणि कोकणातील दशावतार हे लोकोत्सव त्या त्या संस्कृतीची वेगळी ओळख करून देतात. या लोकोत्सवांतून विविधतेतील एकात्मतेचे दर्शन घडते. या लोकोत्सवांतून सामाजिक एकतेची भावना जोपासली जाते. सामूहिक जीवनाचा आनंदही प्राप्त होतो. विविध मुखवटे धारण करून केलेल्या सोंगांमध्ये वाईटाचे विडंबन आणि उपहासात्मक दर्शन घडवून सामाजिक अपप्रवृत्तींविरुद्ध जनमत तयार केले जाते. अशा रंजन आणि प्रबोधन असे दुहेरी हेतू सफल करणाऱ्या वैविध्यपूर्ण लोकोत्सवांची सविस्तर माहिती लेखकाने दिली आहे.”

ते मातीचे आहे. म्हणून बाळ आधी कृतज्ञतापूर्वक मातीला अर्पण करून त्याच्या संगोपनाची जबाबदारी भूमीवर सोपविण्याचा विधी काही जमातींत केला जातो.

'कृषिजीवन आणि मानवी संस्कृती' या लेखात डॉ. भोसले यांनी कृषिसंस्कृतीच मानवी संस्कृतीला जन्म देते, असे मोठे अर्थपूर्ण विधान केले आहे. नादब्रह्म आणि शब्दब्रह्म निर्माण करणाऱ्या कलावंताइतकीच श्रेष्ठता अन्नब्रह्माची निर्मिती करणाऱ्या शेतकऱ्याची आहे, अशा शब्दांत लेखकाने भूमिपुत्रांचा आणि भूमिकन्यांचा गौरव केला आहे. शिवछत्रपतींपासून म. ज्योतिराव फुल्यांपर्यंत आणि ग. ल. ठोकळांपासून ग. ह. पाटलांपर्यंत कृषिसंस्कृती अभिव्यक्त करणाऱ्या, कृषिवलांची पाठराखण करणाऱ्या मान्यवरांचा लेखकाने गौरव केला आहे.

'ग्रामीण जीवनातील लोकोत्सव' हा आपल्या पूर्वजांनी आपल्या संस्कृतीचा जतन करून ठेवलेला समृद्ध असा वारसा आहे. सुंबरान, जागरण, पारंपरिक नृत्यनाट्य, भुलादेवीचा उत्सव, विदर्भातील दंडार, गोव्यातील धालो, कर्नाटकातील यक्षगान, महाराष्ट्रातील तमाशा, गोंधळ, छबिना, भवाडा, ललित, पंचमी आणि कोकणातील दशावतार हे लोकोत्सव त्या त्या संस्कृतीची वेगळी ओळख करून देतात. या लोकोत्सवांतून विविधतेतील एकात्मतेचे दर्शन घडते. या लोकोत्सवांतून सामाजिक एकतेची भावना जोपासली जाते. सामूहिक जीवनाचा आनंदही प्राप्त होतो. विविध मुखवटे धारण करून केलेल्या सोंगांमध्ये वाईटाचे विडंबन आणि उपहासात्मक दर्शन घडवून सामाजिक अपप्रवृत्तींविरुद्ध जनमत तयार केले जाते. अशा रंजन आणि प्रबोधन असे दुहेरी हेतू सफल करणाऱ्या वैविध्यपूर्ण लोकोत्सवांची सविस्तर माहिती लेखकाने दिली आहे. ती वाचत असताना वाचक आपल्या लोकसंस्कृतीशी नव्याने परिचित होत जातो. आपल्या लोकसंस्कृतीत काळाला पुरून उरणारे सत्त्व आहे, याची वाचकाला प्रचिती येते. यातील आपण काय घेतो अन् काय गमावतो, यावर आपल्या संस्कृतीचे भवितव्य अवलंबून असते, असे एक कळीचे विधान लेखकाने केले आहे. शहरी सुखांना चटावल्यामुळे आपण लोकसंस्कृतीच्या शाश्वत सुखाला मुकल्याची खंत वाचकाला वाटल्यावाचून राहात नाही.

'बदलते खेडे : काही निरीक्षणे' या लेखात डॉ. भोसले यांनी खेड्यांमध्ये बदल होण्याची ५ कारणे नमूद केली आहेत. राजकारण हा ग्रामीणांचा आवडता विषय बनला आहे. धर्म आणि कर्मकांडाचा प्रभाव कमी होऊ लागला आहे. नवसांपेक्षा वैद्यकीय उपचारांना प्राधान्य मिळू लागले आहे. अस्पृश्यता कमी झाली आहे. मुलींच्या शिक्षणाला महत्त्व आले आहे. भौतिक सुखविलासाकडे ओढा वाढला आहे, तरी लेखकाने आशावाद सोडलेला नाही.

लोकसाहित्य हा भारतीय जीवन आणि संस्कृतीचा मौलिक ठेवा आहे. आपला इतिहास नीटपणे समजून घेण्यासाठी, आपल्या वर्तमानकाळातील समस्यांची पाळेमुळे शोधण्यासाठी आणि आपलं जगणं श्रीमंत होण्यासाठी लोकसाहित्य आणि संस्कृतीच्या अभ्यासाला पर्याय नाही. जागतिकीकरणामुळे व्यक्तीचे बाजारीकरण सुरू झाले आहे. समाजाचे बधिरीकरण सुरू झाले आहे आणि निसर्गाचे व्यापारीकरण सुरू झाले आहे. अशा परिस्थितीत लोकसाहित्य कुटुंबजीवन, कृषिजीवन आणि ग्रामजीवनाला एकत्र बांधून ठेवू शकते. भौतिक सुखांमुळे वरून सुजलेल्या आणि आतून कुजलेल्या या समाजाला यासाठी लोकसाहित्याची आज नितांत गरज आहे, असे डॉ. भोसले यांना वाटते.

'लोकसाहित्यातील प्रादेशिक आविष्कार' या लेखात डॉ. भोसले यांनी विदर्भ, खानदेश, मराठवाडा, प. महाराष्ट्र आणि कोकण या प्रदेशांतील घरे, अन्नपदार्थ, वस्त्रे, खेळ, सण, सोहळे, रीतिरिवाज, प्रथापरंपरा, श्रद्धा, उपासना या अनुषंगाने आलेली विविधता नमूद केली आहे. प्रादेशिक विविधता लोकसंस्कृतीला आणि पर्यायाने लोकसाहित्याला कशी समृद्ध करते, याचे अनेक दाखले दिले आहेत.

म्हणी म्हणजे साहित्य सोनियाच्या खाणी. 'शहाण्या माणसाचे जीवनभाष्य म्हणजे म्हणी', असे बायबलमध्ये

म्हटले आहे. डच भाषेत, 'रोजच्या अनुभवाचे अपत्य म्हणजे म्हणी' असे म्हटले जाते. म्हणींमध्ये अनुभवांतून आलेले शहाणपण असते. चटकदारपणे सांगितलेले अनुभवांचे सार असते. सुभाषितकारांनी म्हणींना पृथ्वीवरच्या तीन रत्नांपैकी एक रत्न संबोधले आहे. डॉ. भोसले यांचा म्हणींचा व्यासंग फार दांडगा आहे. त्यांनी 'लोपलेल्या सुवर्णमुद्रा' या शीर्षकाखाली दोन खंडांमध्ये ११०० म्हणी सार्थ संकलित केल्या आहेत. 'लोकसाहित्यातील म्हणी : काही निरीक्षणे' या लेखात डॉ. भोसले यांनी म्हणींची व्युत्पत्ती, त्यांचे अर्थ आणि महत्त्व विशद केले आहे. या म्हणींमध्ये जीवनदर्शन घडविण्याचे, जीवनसाक्षात्काराचे व जीवनभाष्याचे मोठे भाषिक सामर्थ्य दडलेले असते. म्हणींमुळे भाषेची समृद्धी, सौंदर्य आणि परिणामकारकता वाढते. म्हणींवरून लोकमानसाच्या धारणा आणि सामाजिक संकेत समजून घ्यायला मदत होते. लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. समाजव्यवस्थेवर प्रकाश पडतो. प्रचलित प्रथा-परंपरांचे आकलन होते. डॉ. भोसले यांनी महाराष्ट्रभर भटकंती करून या लोप पावत चाललेल्या सुवर्णमुद्रांचा अनोखा खजिनाच खुला केला आहे.

नागरी संस्कृतीत मीटर, लिटर, किलो, ग्रॅम यांसारखी मापके वापरली जातात. उलट ग्रामसंस्कृतीत कवळाभर, कासराभर, भाराभर, ओंजळभर, खोंगाभर, चिमूटभर, नखभर, गाडीभर, वीतभर, वावभर, टीचभर, खंडीभर, तर द्रव पदार्थांसाठी अदपाव, पावशेर, अच्छेर, वाटीभर, पळीभर, चरवीभर, अर्धा डेरा, मोगाभर, चमचाभर इ. मापके वापरली जातात. 'ग्रामसंस्कृतीतील मापके' या लेखात लेखकाने ग्रामीण मापकांतील विविधता वर्णन केली आहे. शहरी वाचकांना मापकांतील ही विविधता पाहिल्यावर आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही.

'खांद्यावर विसावलेली लोकसंस्कृती' या लेखात ग्रामीण भागात 'खांदा' या अवयवाचा कसा वापर होतो हे सांगितले आहे. नागरी समूहात खांदा तसा उपेक्षित; पण ग्रामीण जीवनात मदतीसाठी धावून येणारा हा खांदा लोकसंस्कृतीने एखाद्या दागिन्यासारखा आपल्या अंगावर मिरविला आहे. या खांद्यानेच लोकजीवनाला भक्कम असा आधार दिला आहे. लेखकाचा लोकसंस्कृतीचा अभ्यास इतका सखोल आहे की, या लेखात खांद्याविषयीचे पौराणिक संदर्भही दाटीवाटीने येतात.

पुस्तकाच्या दुसऱ्या विभागात एकूण आठ लेख असून हे लेख लोकसंस्कृतीच्या विविध पैलूंवर ललितगद्याच्या अंगाने प्रकाश टाकतात. ज्याचे संपूर्ण आयुष्यच महानगरात गेले आहे, अशा माणसाला 'शिदोरी' या शब्दाचा अर्थ कदाचित कोशांतच शोधावा लागेल; परंतु ग्रामीण माणसाच्या बाबतीत 'शिदोरी' हा अतिशय जिव्हाळ्याचा विषय असतो. 'शिदोरी : लोकसंस्कृतीचे गोड प्रतीक' या लेखात डॉ. भोसले यांनी शिदोरी म्हणजे काय, ती सुरू होण्याची कारणे, ग्रामीण जीवनातील शिदोरीचे महत्त्व अतिशय चित्रदर्शी शैलीत वर्णन केले आहे. माहेरवाशीण सासरी जाताना तिच्यासोबत गोडाधोडाची शिदोरी बांधून दिली जाते. त्या शिदोरीवरून त्या घराची (सासर आणि माहेर) इभ्रत आणि मोठेपणा जोखला जातो. खेड्यात शिदोरीच्या माध्यमातून सुखदु:खाची वाटणी होत असते. 'शिदोरी सोडणे' आणि 'शिदोरी वाटणे' हा दु:ख सौम्य करण्याचाही भाग असतो. लोकसंस्कृतीने शिदोरी या प्रकाराला एका विधीचे रूप दिले आहे. सांस्कृतिक वलय प्रदान केले आहे. या प्रथेच्या पाठीमागे एक मूल्यविचार असल्याचे लेखकाने अधोरेखित केले आहे. जागतिकीकरणाच्या आवेगात शिदोरीचे स्वरूप बदलले असले, तरी त्यापाठीमागची भावना कायम आहे, हे निश्चित!

सामान्यत: शहरी माणसाला शीळ घालता येत नसल्यामुळे त्याला त्यातील संगीत आणि सौंदर्यही समजत नाही. ग्रामीण माणसाला शीळ, तिचे विविध प्रकार, तिची उपयुक्तता, शीळ आणि तीमागे चिकटलेल्या लोकधारणा, संकेत, शिळेचे अर्थ आणि अनर्थ, माहीत असतात. 'शीळ : लोकजीवनाची मधुर ओळख' या लेखात डॉ. भोसले लिहितात, शीळ ही माणसाला मिळालेली अजब देणगी आहे. भाषा जन्माला येण्याआधी शीळ जन्माला आली. शीळ ही भावनांची भाषा आहे. आत्मसंवादाची भाषा आहे. विचारशक्तीची भाषा आहे. शिळेने मानवाचे जीवनही सुरेल आणि सुगंधी बनविले आहे. शिळेने लोकसंस्कृतीचे रूप ठळक केले आहे.

'काठीचा देव आणि देवाची काठी' या लेखात आपल्याला लोकसंस्कृतीतील काठीची विविध रूपे भेटतात. पंतोजीच्या हातातील छडी, पाटलाच्या हातातील सत्तेचे प्रतीक असलेली काठी, खोत-देसाई-देशपांडे यांच्या हातातील संपत्तीचे प्रतीक असलेली काठी, येसकराच्या हातातील रक्षणाचे प्रतीक असलेली घुंगुरकाठी, सेवाकार्याचे प्रतीक असलेली रामोशाच्या हातातील काठी, खलरक्षणार्थ पोलिसाच्या हातात आलेली काठी, गुरवाच्या हातातील

देवाची काठी ही काठीची विविध रूपे. सर्वांची सखी, सोबतीण असलेल्या काठीची ग्रामजीवनात विविध रूपे रूढ झाली. टिकारणं, दांडकं, कांडकं, रूमणं ही तिची आणखी काही रूपे. गुढीची उंच काठी आदिशक्तीचे, सर्जनाचे रूप मानली गेली. बहिरोबा, भैरवनाथ, सिदोबा, जोतीबा, रवळनाथ इ. ग्रामदेवतांच्या उंचच उंच काठ्यांना श्रद्धा आणि भक्ती चिकटली. तिला दैवी रूप आले. धार्मिक जीवनात आणि लोकोत्सवात या दैवी काठ्यांना प्रतिष्ठा आली. चार फुटाची लाकडी वस्तू असलेली नगण्य काठी लोकजीवनात आणि लोकसंस्कृतीत पार खोलपर्यंत रूतून बसली होती. एकेकाळी संस्कृतीचे व सर्जनाचे प्रतीक असलेली ही काठी आता शक्तिपात होऊन आपल्या आयुष्यातून हळूहळू निघून जात असल्याबद्दल लेखकाने खंत व्यक्त केली आहे.

शतकानुशतके पंढरपूर हे भूवैकुंठ मानले जाते. पंढरपूरचा विठोबा हे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत. पंढरपुरी काही प्रथा-परंपरा जन्मल्या आणि भाविकांच्या माध्यमातून महाराष्ट्रभर पसरल्या. 'पंढरपूर परिसरातील लोकपरंपरा आणि लोकप्रथा' या लेखात डॉ. भोसले यांनी एकादशीचा उपास, उपासाच्या निमित्ताने खाल्ले जाणारे पदार्थ, तुळशीची माळ व माळ घालण्याची परंपरा, श्रद्धा, ओल्या देहाने लोटांगण घालण्याची प्रथा, नवस बोलून हात गहाण टाकण्याची परंपरा, सजवलेल्या म्हशींची मिरवणूक काढणे, नगरप्रदक्षिणा, रेड्यांची पूजा, दिवाळीच्या सुमारास दोन गटांत होणारी लुटूपुटूची लढाई इ. लोकप्रथा आणि लोकपरंपरा विशद केल्या आहेत.

'लोकपरंपरेतील पहिलेपण' या निबंधात शेतातील पहिले अन्न, पहिले फळ, व्यालेल्या गाई-म्हशीचे पहिले दूध देवाला आणि पुजाऱ्याला अर्पण करणे, पहिले बाळ जन्मल्यावर त्याला देवाच्या पदरात घालणे, बाळाला विधिपूर्वक मंदिरात पहिला घास भरविणे, बाळाचे जावळ देवाला अर्पण करणे, ऋतुमती झालेल्या कुमारिकेला हिरवा चुडा भरून मखरात बसविणे, सुपारी फोडणे, पहिले मंगलाष्टक पुरोहिताने म्हणणे, नवविवाहितांची 'वावरजत्रा', डोहाळे जेवण, पहिले बाळंतपण, पहिला पाळणा, पहिला दिवाळसण, नव्या अन्नाची पुनव, चुलीवर भाजलेली पहिली भाकर चुलीला (अग्नीदेवतेला) अर्पण करणे इ. लोकपरंपरेतील पहिलेपणाच्या परंपरा नोंदवून त्यामागील लोकभावना नमूद केली आहे. लोकसंस्कृतीतील ही कृतज्ञतेची भावना वाचकमनाला स्पर्शून जाते.

डॉ. द. ता. भोसले यांचे दीर्घकाळ वास्तव्य पंढरपुरात असल्यामुळे १) पंढरपूर परिसरातील लोकपरंपरा आणि लोकप्रथा, २) नाही विठुरायासम दुजा देव, आणि ३) आषाढीतले पंढरपूर असे पंढरपुरासंबंधीचे तीन लेख ह्या पुस्तकात आले आहेत. विशेष म्हणजे हे सर्व लेख अतिशय वाचनीय आहेत. डॉ. भोसले यांचे ललितलेखन तर अतिशय काव्यमय आणि प्रवाही असतेच; पण त्यांच्या संशोधनपर लेखनालाही लालित्याची मनोरम झालर असते. या लेखनाला संशोधनमूल्य तर आहेच; पण लालित्य हा या लेखनाचा प्राण आहे. त्यामुळे हे पुस्तक एकदा वाचायला सुरू केले की, वाचून पूर्ण होईपर्यंत सोडवत नाही.

'आषाढीचे पंढरपूर' या लेखात लेखकाने पंढरपूर आणि इतर तीर्थक्षेत्रे यातील एक ठळक भेद नोंदविला आहे. तो असा : इतर तीर्थक्षेत्री देवाचे दुरूनच 'दर्शन' होते, तर पंढरपुरी पांडुरंगाची 'भेट' होते. दर्शनामध्ये अंतराय असतो, तर भेटीमध्ये एकरूपता असते. म्हणूनच तर भक्त म्हणतात, 'भेटीलागी जीवा। लागलीसे आस।' ही आस पंढरपुरातच पूर्ण होते.

डॉ. द. ता. भोसले यांनी यापूर्वीच्या लेखनातून 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' निर्देशित केल्या होत्याच. प्रस्तुत ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी लोकसंस्कृतीच्या लोभस दर्शनाचे आणि चिकित्सक चिंतनाचे नवनीत वाचकांच्या हातावर ठेवले आहे. लोकसंस्कृतीविषयी आस्था असणाऱ्या प्रत्येकाने हा ग्रंथ वाचायलाच पाहिजे. पुस्तक वाचून झाल्यावर डॉ. द. ता. भोसले म्हणजे लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचा चालताबोलता ज्ञानकोश असल्याची आपली खात्री पटते.

गिरीश सहस्रबुद्धे यांनी मुखपृष्ठावर लोकसंस्कृतीचे प्रतीक असलेले प्राचीन जाते चितारले आहे, ते मोठेच अन्वर्थक आहे. लोकसंस्कृतीला श्रीमंत करणाऱ्या सर्व संबंधित घटकांचा, त्यांच्या परस्पर संबंधांचा परिचय करून देणाऱ्या प्रस्तुत ग्रंथाला सांस्कृतिक आणि सामाजिक दस्तऐवज म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

●

**डॉ. मथु सुरेश सावंत,**
सहयोगी प्राध्यापक,
पदव्युत्तर मराठी विभाग,
पीपल्स कॉलेज, नांदेड
चलभाष : ९४२२१७०६८९

समीक्षा

**ऋषिकेश देशमुख**

# काळाच्या मूल्य-ऱ्हासाचे प्रतिबिंब

## तणस

**स**मकाल हा अत्यंत गुंतागुंतीचा नि जटिल स्वरूपाच्या प्रश्नांनी वेढलेला आहे. अर्थात प्रत्येक काळात त्या त्या काळाचे असे काही मूलभूत असे प्रश्न असतातच; पण ह्या काळाचे नेमके प्रश्न काय आहेत हेच समजेनासं झालेलं आहे. प्रश्न समजूच नयेत एवढी खबरदारी नि दक्षता घेणारी नवी व्यवस्था इथे आकाराला आलेली आहे. सार्वत्रिक भय, असुरक्षितता नि सार्वत्रिक अनागोंदी निर्माण करणारा हा काळ आहे. आपली माणूस म्हणून असणारी ओळख या काळानं पूर्णतः पुसून टाकली आहे आणि त्यामुळे त्याचा नेमका अदमास घ्यायचा, तर तो नेमका कसा घ्यावा हेही एक मोठं आव्हानच या काळानं निर्माण करून ठेवलं आहे. लेखक हा काळाचं अपत्य असतो आणि तो त्याच्या कलाकृतीतून काळाचे प्रश्न मांडण्याचाच प्रयत्न करत असतो. त्याचं लिहिणं ही भाषिक अभिव्यक्ती असते आणि त्यामुळे तिला सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ असतात. लेखकाचं लिहिणं हा सांस्कृतिक हस्तक्षेप असतो. तो हस्तक्षेप डॉ. महेंद्र कदम हे आपल्या लिहिण्यातून सातत्यानं करत आलेले आहेत.

'आगळ' व 'धुळपावलं' या दोन कादंबऱ्यांच्या नंतर त्यांची 'तणस' ही कादंबरी नुकतीच आलेली आहे. 'तणस' म्हणजे धान्य उफणून शिल्लक राहिलेला भुसा. अर्थात त्या भुशाला काही फार अर्थ नसतो; पण आज दिसणारा भुसा कधीकाळी धान्याचं संरक्षक कवच असतं, हे विसरून चालता येत नाही. आज माणसाचं जगणं त्या भुशासारखं झालेलं आहे. माणसाला क्रयवस्तू बनवणाऱ्या या व्यवस्थेत माणसाचं नेमकं मूल्य काय याचा शोध ही कादंबरी घेत राहते.

कादंबरीचा नायक दिनकर देसाई याचं वय आणि आपल्या देशानं स्वीकारलेल्या खाउजा संस्कृतीचं म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यांचं वय एकसमान आहे. जागतिकीकरण हळूहळू वाढत आज ज्या टप्प्यावर आपल्याला घेऊन आलंय त्याचं मुख्य प्रतिनिधित्व दिनकर करत आहे. म्हणजे गेल्या अडीच दशकांत आपल्या एकूण कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय नि सांस्कृतिक उलथापालथी; त्यांनी घडवलेली स्थित्यंतरं; या सर्वांचा विस्तृत कालपट; त्यानं व्यापलेला अवकाश ही कादंबरी नेमकेपणानं अधोरेखित करते. अर्थात ते करत असताना भूतकाळाचे सूक्ष्म सिंहावलोकनही चालूच आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या आधीचा आणि नंतरचा कालबदल, त्याचा यथार्थ अन्वय हे सूत्र कादंबरीभर प्रवाहीपणे वाहत राहते.

जागतिकीकरणातून प्रसवलेल्या विकासाच्या भ्रामक संकल्पना आणि त्यातून संयमितपणे संपुष्टात येणारे मानवी अस्तित्व व भू-जैविक वैशिष्ट्ये ह्यांचा व्यापक कोलाज ही कादंबरी आविष्कृत करते.

ही कादंबरी मुख्यतः सार्वत्रिक मूल्य-ऱ्हासाचा सूक्ष्म वेध घेण्याचा तसेच तो होण्यामागील कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न करते. दिनकर हा मुख्य नायक असला तरी मनोज जावळे व अमर शेंडे हे सहनायक आहेत. तीन वर्गांचे प्रतिनिधित्व हे तीन तरुण करताना दिसतात. दिनकर देसाई मध्यमवर्गीय आहे, मनोज जावळे अभावग्रस्त, तर अमर शेंडे पाटील गर्भश्रीमंत आणि त्यांचं त्यांचं जग, त्यातील नवी परिप्रेक्ष ते त्यांच्या वर्तनातून दृग्गोचर करतात. ज्याच्या त्याच्या स्व-अस्तित्वाचा हा लढा आहे. त्यामुळे निर्माण झालेला अटळ-अपरिहार्य वर्गसंघर्ष. यातील अमर खलनायक वाटू शकतो; पण जेव्हा त्यांच्या दृष्टीने विचार करतो तेव्हा तोही योग्यच असल्याचं लक्षात येतं. हे सर्व लेखकाने तटस्थपणे मांडलं आहे.

**दिनकर हा सुशिक्षित बेरोजगार आहे. त्याची बुद्धिमत्ता ही सर्वसामान्य तरुणांची असते तशी आहे. त्यामुळे नोकरीची शाश्वत हमी नाही. त्यामुळे तो जीप घेऊन त्यावर व्यवसाय सुरू करतो. ड्रायव्हर लाईनला गेल्यानंतर येणाऱ्या साऱ्या व्यसनं / चैनीची सवय त्यालाही लागते. त्यातून एकदा अपघात घडतो आणि सगळंच विस्कटून जातं. तिथंच त्याला मनोज जावळे भेटतो, तो सिव्हिल इंजिनिअर असतो; पण बांधकाम व्यावसायिक लोकांच्या अप्रामाणिक वर्तनामुळे त्याला नोकरी टिकवता येत नाही. त्यामुळे तोही बेरोजगार आहे.**

कादंबरीच्या पर्यावरणात येणारे मंदिर, वनराई, टेकडी, वाहनतळ हे सर्व लेखकानं सजिवंत केले आहेत. दिनकर देसाईचे वडील हे कधी काळी शहरात आलेत. त्यामुळे त्याचा आणि शेतीचा तसा फार सबंध नाही. तरीही त्याची मुळं ही शहरात रुजली नाहीत. त्याला निसर्ग खुणावत असतो. दिनकरला टेकडीचं आकर्षण आहे. तिथल्या वनराईची अपूर्वाई आहे. तो तिथे तासंतास येऊन बसतो. तिथल्या मंदिराविषयी असणाऱ्या आस्था, त्याला जोडून असणाऱ्या मिथकांचा त्याला चांगला परिचय आहे; पण पुढे त्या सगळ्यांनाच मंदिराचे पुजारी असणारे गजाननपंत छेद देत कसं सगळं बदलून टाकतात, हे तो पाहत असतो. गावाचा विकास म्हणत किंवा मंदिर विकास म्हणत केलेली वृक्षतोड, तिथल्या नैसर्गिक सौंदर्याचा केलेला ऱ्हास देव हेच एक मोठं मिथक असावं की काय, असा प्रश्न निर्माण करणारा आहे.

दिनकर हा सुशिक्षित बेरोजगार आहे. त्याची बुद्धिमत्ता ही सर्वसामान्य तरुणांची असते तशी आहे. त्यामुळे नोकरीची शाश्वत हमी नाही. त्यामुळे तो जीप घेऊन त्यावर व्यवसाय सुरू करतो. ड्रायव्हर लाईनला गेल्यानंतर येणाऱ्या साऱ्या व्यसनं / चैनीची सवय त्यालाही लागते. त्यातून एकदा अपघात घडतो आणि सगळंच विस्कटून जातं. तिथंच त्याला मनोज जावळे भेटतो, तो सिव्हिल इंजिनिअर असतो; पण बांधकाम व्यावसायिक लोकांच्या अप्रामाणिक वर्तनामुळे त्याला नोकरी टिकवता येत नाही. त्यामुळे तोही बेरोजगार आहे. पुढं तो एक जीप घेऊन आपली बेकारी संपुष्टात आणण्याचा विफल प्रयत्न करीत असतो.

मनोज जावळे शहरालगत असणाऱ्या गावात राहणारा दलित कुटुंबातील तरुण. खूप अभावातून त्यानं आपलं शिक्षण पूर्ण केलेलं. त्याचा भाऊ त्याच्यापेक्षा हुशार असतो; पण त्याला गावातील प्रखर जातवास्तवाचा सामना करावा लागतो. त्याच्या दहावीच्या परीक्षेत जवळ असलेल्या उच्च जातीय मुलाला आपला पेपर दाखवला नाही आणि तो मुलगा नापास झाला म्हणून सरंजामी जातीय द्वेषाचा सामना करावा लागतो. तो करता करता तो एक दिवस आत्महत्या करण्याचा टोकाचा प्रयत्न करतो; पण काहींच्या दक्षतेमुळे त्यातून तो वाचतो; पण कॉलेज आणि अभ्यासातील लक्ष विचलित होतं. गावागावांमध्ये असणारा जातीय द्वेष आणि त्यात होरपळून निघणाऱ्या अशा अनेक अश्राप जीवांचं हे प्रातिनिधिक रूप आहे. जातीय, धार्मिक विखाराने उन्मत्त समाज आपल्या स्वातंत्र्याच्या, जातिनिर्मूलनाच्या संकल्पनांचा कसा संकोच करतो हे दिसून येते.

अमर शेंडे हा स्पर्धा परीक्षेची तयारी करून अधिकारी होण्याचं स्वप्न पाहत असतो. घरची संपन्नता असल्यामुळे त्याला पुण्यासारख्या शहरात शिक्षण वगैरे सुविधा विनासायास मिळतात; पण त्यात त्याला काही यश मिळत नाही. पुढं त्याच्या वडिलांच्या म्हणजे उत्तमराव



**कादंबरी : तणस**
**लेखक : महेंद्र कदम**
**मुखपृष्ठ : सतीश भावसार**
**प्रकाशन : लोकवाङ्मय गृह, मुंबई.**
**किंमत : ३००रुपये, पृष्ठ : २२७**

शेंडेंचा कारभार तो पाहत असतो. काळाची पावलं ओळखून उत्तमराव पतसंस्थेचं जाळं सर्वदूर विणतात. त्या सगळ्यांमध्ये अमर स्वतः लक्ष घालून त्याला आणखी व्यापक रूप देण्याचा प्रयत्न करत राहतो. त्याच पतसंस्थेत पुढे मॅनेजर म्हणून दिनकर नोकरीला लागतो. तरीही त्याची आर्थिक ओढाताण सुरूच राहते. विविध विवंचना काही त्याची पाठ सोडत नसतात. पतसंस्था कशा कर्मचारी व सर्वसामान्य माणसाची पिळवणूक करतात, त्यांना वेठीस धरत असतात ते सारे चित्र यात स्पष्टपणे उलगडते.

उत्तमराव शेंडे, गजाननपंत कुलकर्णी, शिवाजीराव काळे, दिनकरचे वडील ही पहिल्या पिढीतील माणसं आहेत. त्यांच्या जगण्यात आणि पुढे मुलांच्या जगण्यात कमालीचं अंतर पडत गेलं आहे. अर्थात प्रत्येकच पिढीत ते पडत असतं. मात्र ज्या महत्त्वाकांक्षा, लालसा असतात त्या पुढच्या पिढीतही संक्रमित होतात हे मात्र खरं.

गजाननपंतांना राजकारणी लोकांशी, समाजातील बड्या प्रस्थांशी जुळवून घेऊन स्वतःचं स्वतंत्र प्रस्थ निर्माण करायची अपार लालसा असते. त्यातूनच पुढे ते उत्तमराव शेंडेंशी मिळून शैक्षणिक संस्था सुरू करतात. संस्थेत सचिव होऊनही त्यांना त्यांचं स्वतंत्र प्रस्थ प्रस्थापित करता येत नाही ही त्यांची आंतरिक सल आहे, तर उत्तमरावांना आहे त्यापेक्षा अधिक श्रीमंती, मानमरातब मिळवायचा आहे. या सगळ्यांमधून जे मिळतंय त्यात ते अधिकाधिक महत्त्वाकांक्षा कुरवाळत आहेत. शिवाजीरावांचा मुलगा बाजीराव व्यसनी व उनाड निपजतो त्यामुळे जेवढं आहे तेवढं टिकून राहावं असं त्यांना वाटत राहतं.

कादंबरीत येणारे स्त्रीविश्व हे स्त्रियांच्या वेगवेगळ्या रूपांचं दर्शन घडवणारं आहे. काही स्त्रियांचं जग आपल्या आदिम मातृसत्ताक जीवनपद्धतीकडे अंगुलीनिर्देश करणारं आहे, तर काही आजच्या काळातही स्त्रीला कसा जगण्याचा संघर्ष विनातक्रार करावा लागतो ते दृग्गोचर करणारं आहे. अमरची आई शेवंताबाई ही एका संघर्षशील आईची मुलगी आहे. शेवंताबाईच्या आईनं स्वतःचं सगळं शेत धरणात गेल्यानंतर मिळालेल्या मुरमाड जमिनीवर कौटुंबिक सलोखा व एकता अखंडपणे साधत काबाडकष्ट करून बागायती जमीन फुलवली होती. पुन्हा नव्याने दुसरी शेते विकत घेतली होती. त्या सगळ्यांमध्ये तिचा पुन्हा उमलून येण्याचा निर्धार फार चिवट आहे आणि स्त्री कशी आलेल्या परिस्थितीवर मात करत नवनिर्माण करण्याची प्रेरणा बाळगून असते हेही अधोरेखित करणारं आहे. हे सगळं शेवंताबाई स्वतः अनुभवलेल्या, तो काळ जगलेल्या आहेत. गाव धरणात गेलं. आयुष्यात मोठं स्थित्यंतर आलं. त्यात शिक्षण घेता आलं नसलं तरी अनुभवांचं शिक्षण आयुष्यभर कामी येणारं होतं. तो वारसा पुढं चालवण्याचं संस्कार स्वतःवर झाले होते.

दिनकरची आई ही एक सहनशील स्त्री आहे. नवरा व मुलगा यांच्या वर्तनाचे परिणाम भोगत ती मूक आक्रंदन करत जगतेय. तिची कुटुंबाच्या सांधेजोडीत नेहमीच फरफट झालीय. दिनकरचे वडील तरुणपणापासून ते आजपर्यंत तिच्याकडे संशयितपणे पाहतात हे दुःख तिला आयुष्याच्या उत्तरार्धातही सलत असते.

बाजीरावाची पत्नी ही व्यसनी नवरा गळ्यात पडला म्हणून स्वतःतील बळ मोडून पडू देत नाही. उलट ती अधिक खंबीरपणे आलेल्या परिस्थितीला तोंड देत घरात नवऱ्याचा मार खात घराचं, शेताचं नुकसान होऊ देत नाही. शिवाजीरावांच्या नंतर बाजीरावांचा जुलूम सहन करत शेताची सगळी सूत्रं हाती घेऊन त्यात राबून स्वतःचा नवा ठसा उमटवते.

तर गजाननपंतांची मुलगी उर्मिला ही उच्चशिक्षित, आत्मभान आलेली स्त्री आहे. दिनकरमध्ये स्पार्क पाहून ती त्याच्याशी विवाहित होते; पण लग्नाआधी दिसलेला स्पार्क पुढे कुठे हरवला हा प्रश्न तिला सतत पडत असतो. दोन्ही घरच्या लोकांना मंजूर नसताना हा प्रेमविवाह झाला; पण त्यातून काहीच हाती लागलं नाही हा सल तिच्या अंतर्मनात आहे. लग्नानंतर पहिले काही दिवस चांगले गेले. मात्र पुढे आर्थिक ओढाताण, कौटुंबिक कलह, परस्परविरोधी स्वभाव या सगळ्यांचा मनस्ताप तिला सहन करावा लागतो. पुढे कसंतरी अप्रत्यक्षपणे पंत तिला संस्थेत मुख्याध्यापक म्हणून घेतात; पण तिथेही डोनेशन वगैरेसाठी तिला वेठीस धरले जाते. अमरला त्याच्या बायकोला मुख्याध्यापक करायचे असते. दिनकरलाही त्यामुळे पतसंस्थेत त्रास दिला जातो. त्याला स्वतःच्या कर्जाची परतफेड करूनही एन. ओ. सी. दिली जात नाही. या सगळ्यांच्या ताण-तणावातून त्याला नर्व्हस ब्रेकडाऊनचे झटके येत असतात. त्यातून

त्याला कसं बाहेर काढावं हे उर्मिलासमोर मोठं आव्हान असते. एकदा दिनकर तिला टेकडीवर घेऊन येतो. तिथं तो म्हणतो, 'मला कधीही असं झालं, तर इथे घेऊन येत जा.' तो तिला तिथे विचित्र वाटणारी; पण फार सूचक मागणी करतो. तो म्हणतो, 'तू विवस्त्र होऊन या मातीत मिसळून जा.' ते म्हणणे ऋग्वेदपूर्वकालीन मातृसत्ताक पद्धतीचा आग्रह असतो. तो तिलाही समजत नाही. अर्थात उर्मिला एक पत्नी म्हणून, सून म्हणून आणि एक आत्मभान आलेली स्त्री म्हणून सगळं जोडून स्वमुद्रा उमटवण्याचा प्रयत्न करत असते; पण तिच्याही सहनशीलतेचा कडेलोट करणारी परिस्थिती सतत निर्माण होत असते. दिनकरचा स्पार्क तर मावळून गेलाच होता; पण तो या सर्व प्रकारच्या तणावामुळे अधिकाधिक आत्मकेंद्री नि विक्षिप्त होत होता. या सर्वांतून एक वेळ तिला दिनकर किंवा नोकरी या दोन्हींपैकी एक निवडण्याची वेळ येते आणि ती नोकरीला प्राधान्य देत घराबाहेर पडते. ती घराबाहेर पडत असते आणि दिनकर घरात प्रवेश करत असतो, इथे कादंबरी थांबते; पण पुढे दिनकरचं काय झालं हा प्रश्न वाचकांच्या मनात रुंजी घालत असतो. त्या प्रश्नांची उत्तरे अनुत्तरित राहतात.

ही कादंबरी समूहमानस समजून घेण्याचा आणि त्यांचे अनेकस्तरीय ताणेबाणे उलगडून दाखवण्याचा प्रयत्न करते. जागतिकीकरणामुळे माणसांचे झालेले आक्रमक बाजारू, अर्थकेंद्री नि आत्मकेंद्री रूप, त्यात झालेला मूल्यऱ्हास ठळकपणे नोंदवते. या काळाने व्यक्ती-व्यक्तीत आणलेली निष्क्रियता ही या कादंबरीत खूपच प्रकर्षाने जाणवते. संस्थात्मक जाळे विणून नव्या शोषणाची नि सरंजामी मानसिकतेची व्यवस्था आकाराला आली आहे. आज शैक्षणिक संस्था ह्या शोषणाच्या छळछावण्या झालेल्या आहेत तिथं केवळ कर्मचाऱ्यांचं शोषण होतं असं नाही, तर विद्यार्थी, पालक व पर्यायानं समाजाचंच शोषण होतं. नोकरीसाठी डोनेशन, ॲडमिशनसाठी डोनेशन, ग्रामीण भागात विद्यार्थी मिळावेत म्हणून वणवण करावी लागते. संस्थाचालक हे मालक आणि कर्मचारी सालगडी हे असलं अभद्र वास्तव आजच्या भवतालाचं झालेलं आहे. गावं शहरं होताहेत; पण त्यासाठी भूमी अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहे. तुम्ही भूमिहीन झालात की, तुमच्या संघर्षाला बळ मिळणार नाही किंवा त्यात तेवढं सामर्थ्य असणार नाही हे निर्विवाद सत्य आहे. आजपर्यंतच्या राजसत्ता त्यांना सत्ता प्रस्थापित करण्यासाठी सर्वसामान्य लोकांना भूमिहीन करण्याचाच प्रयत्न करत आलेल्या आहेत आणि त्यात त्या यशस्वी झालेल्या आहेत. मात्र जागतिकीकरणाच्या नंतर शत्रू कोण हेच कळायला मार्ग नाही. तुम्हाला चंगळवादी बनवून ग्राहक करणे आणि त्यात तुमची ऊर्जा संपवणे हे या व्यवस्थेचं स्वरूप आहे. नव्या दमनकारी, शोषक यंत्रणा या काळाने विकसित केलेल्या आहेत. मोबाईलचे नेटवर्क काही काळ गेले तरी प्रचंड अस्वस्थ होणारे आपण या काळाच्या, त्या कंपनीच्या हातचे बाहुले बनले आहोत.

'तणस' ही महेंद्र कदम यांची कादंबरी आज मराठीत लिहिल्या जाणाऱ्या कादंबऱ्यांपेक्षा त्यामुळे वेगळी नि महत्त्वपूर्ण ठरते. ती अतिवास्तववाद टाळून या काळाच्या प्रश्नांना कलात्मकरीतीने साकार करण्यात यशस्वी झाली आहे. ती भूत आणि वर्तमान यांचा कोलाज चित्रित करते. मधे एखाद्या ठिकाणी कादंबरीकारातला अभ्यासक समीक्षक डोकावतो तिथे जागतिक संदर्भ वगैरे येतात; पण तीही कादंबरीचा भाग म्हणून. सामान्य वाचकाला तो भाग कळायला जरा कठीण जाईल; पण ज्यांची किमान अभिरुची क्षमता विकसित आहे त्याला तो अत्यंत महत्त्वाचा वाटणार आहे.

लेखकाचं लिहिणं हा एक प्रकारचा सांस्कृतिक हस्तक्षेप असतो. आपल्या 'तणस' या कादंबरीतून महेंद्र कदम यांनी तो हस्तक्षेप केला आहे. या काळाचा विस्तृत नि सखोल कालपट त्याच्या दृश्य-अदृश्य कार्यकारणभावासह दृग्गोचर केला आहे. ही कादंबरी ह्या काळाचं प्रतिबिंब आहे, यात शंकाच नाही.

●


**ऋषिकेश गंगाधरराव देशमुख**
मु पो : शिळवणी, ता : देगलूर, जि : नांदेड
पिनकोड : ४३१७४१
संपर्क : ९९२३०४५५५०
ईमेल : rushigdeshmukh@gmail.com

लेख

**कल्याणी झा**

# नामदेव ढसाळ 'कवी नावाचा सैनिक'

**नामदेव ढसाळांच्या कवितेविषयी किंवा स्वतः त्यांच्याविषयी लिहिताना कोणताही एकच संदर्भ अपुरा ठरतो. त्यांचा कवी म्हणून परिचय करून घेत असताना केवळ काव्यविषयक कामगिरी बघावी म्हटले तरी दलित कविता, दलित पँथर, कम्युनिस्ट चळवळ, आंबेडकरी चळवळ, लघुनियतकालिकांची चळवळ, आणीबाणी-इंदिरा गांधी, शिवसेना हे संदर्भ अपरिहार्यपणे पुढे येत राहतात. तसेच त्यांच्या राजकीय कामात त्यांच्या कवितेचे केंद्र सुटत नाही. किंबहुना कवी नामदेव ढसाळ म्हणून होणारी भाषिक कृती ही त्यांच्या राजकीय-सामाजिक कमिटमेंटचाच एक भाग आहे. 'व्यक्ती, समष्टी आणि सृष्टी यांच्यातल्या अंतर्विरोधाला, व्यामोहाच्या अनेकविध पातळ्यांवर घेऊन जाण्याचा व्यवहार म्हणजे कविता,' असे ते कवितेकडे पाहतात.**



नामदेव ढसाळांचा पहिला काव्यसंग्रह शोषण व्यवस्थेला सुरुंग लावण्याचा विडा उचलून दाखल झाला. हा सुरुंग व्यवस्थेला लागण्याआधी मराठी वाचकाच्या वर्षानुवर्षे ट्यून झालेल्या अभिरुचीला लागला. 'त्यांची सनातन दया फॉकलंड रोडच्या भडव्याहून उंच नाही' किंवा 'स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे' यातला जळजळीत उपरोध किंवा 'माण्सं भादरून पेपरवेटमधी कुणी बंद केलीयेत' यातली सत्ताहीनाची सत्ताधीशाला बसणारी जरब, 'माणसाने पहिल्याप्रथम स्वतःला पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे' (सर्व काव्यपंक्ती गोलपिठामधून) अशा काव्यभाषेतून येणारी ठाम विधानात्मकता, निडरता मराठी कवितेच्या वाचकाला कायमचे जागे करून गेली. गोलपिठापासून पुढील दोन संग्रहांपर्यंत, म्हणजे 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' आणि 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रः प्रियदर्शनी' या कवितासंग्रहांमधून आपल्याला ढसाळांच्या राजकीय बांधिलकीचे वेगवेगळे आयाम दिसतात, ज्यातून दलित हा सर्वहारा वर्गाचा अविभाज्य भाग आहे आणि त्याच्या उन्नतीसाठी हा कवी कटिबद्ध आहे हे लक्षात येते. वाचकाला गल्लीत बोलवून, अशा जागांमध्ये ढसाळांनी प्रवेश करायला लावला जिथे केवळ एक लेखणीच जाऊ शकते.

नामदेव ढसाळांच्या कवितेविषयी किंवा स्वतः त्यांच्याविषयी लिहिताना कोणताही एकच संदर्भ अपुरा ठरतो. त्यांचा कवी म्हणून परिचय करून घेत असताना केवळ काव्यविषयक कामगिरी बघावी म्हटले तरी दलित कविता, दलित पँथर, कम्युनिस्ट चळवळ, आंबेडकरी चळवळ, लघुनियतकालिकांची चळवळ, आणीबाणी-इंदिरा गांधी, शिवसेना हे संदर्भ अपरिहार्यपणे पुढे येत राहतात. तसेच त्यांच्या राजकीय कामात त्यांच्या कवितेचे केंद्र सुटत नाही. किंबहुना कवी नामदेव ढसाळ म्हणून होणारी भाषिक कृती ही त्यांच्या राजकीय-सामाजिक कमिटमेंटचाच एक भाग आहे. 'व्यक्ती, समष्टी आणि सृष्टी यांच्यातल्या अंतर्विरोधाला, व्यामोहाच्या अनेकविध पातळ्यांवर घेऊन जाण्याचा व्यवहार म्हणजे कविता,' असे ते कवितेकडे पाहतात.

१९७१मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'गोलपिठा' ह्या कवितासंग्रहापासून

२०१०मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'निर्वाणा अगोदरची पीडा' ह्या कवितासंग्रहापर्यंत जवळपास पस्तीस-चाळीस वर्षे ढसाळांनी कविता लिहिली. 'मायस्थेनिया ग्रॅव्हीज' ह्या दुर्धर आजाराने दीर्घकाळ आजारी असून व शेवटच्या टप्प्यात कॅन्सरनेही ग्रस्त असताना त्यावर मात करत आपल्या ६४ वर्षांच्या आयुष्यात दहा कवितासंग्रह, दोन कादंबऱ्या, एक नाटक आणि राजकीय, सामाजिक चिंतनपर लेखन अशी अविरत कामगिरी केली. १५ जानेवारी २०१४ला मृत्यू पावलेला हा कवी लौकिक अर्थाने ह्या जगात नाही; परंतु त्यांची कविता वाचकांशी आजही जिवंत संवाद साधते.

स्वतःला 'कवी नावाचा सैनिक' मानणारे ढसाळ आपल्या आधीच्या पिढीने केलेले काम आणि त्यातून राहिलेल्या उणिवा जाणून त्या उणिवा वैयक्तिक पातळीवर नष्ट करण्याचा प्रयत्न 'भाषिक कृतीतून माझी कविता करते' असे मानतात. आंबेडकरांच्या नेतृत्वात उभी राहिलेली अस्पृश्यता आणि जातव्यवस्थाविरोधी चळवळ आंबेडकरांच्या नंतर नेतृत्वहीन झाली. 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हा पक्ष स्थापन झाला; परंतु नेतृत्वाच्या अभावामुळे पक्षांतर्गत गट निर्माण झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही दलितांची दलित म्हणून होणारी विटंबना थांबलेली नव्हती, तर ती अधिकच वाढली. हे वास्तव सत्तरच्या दशकात पुढे आलेल्या तरुण दलित साहित्यिकांनी वाचले होते.

डॉ. आंबेडकरांनी दिलेला दलित मुक्ती आणि मानव मुक्तीचा मंत्र अनेक दलित साहित्यिकांनी घेऊन आपल्या लेखणीतून पुढे नेला. तरीही साठीच्या दशकात 'विद्रोही कविता' म्हणून नावारूपाला आलेल्या धारेत नामदेव ढसाळ लिहीत असलेली कविता ह्या धारेचा भाग असूनही वेगळी होती. ही धारा जातव्यवस्थेवर अत्यंत कठोर टीकाही करत होती आणि तिला बदलायच्या ऊर्मीने एका नव्या जगाचे स्वप्नही पाहत होती, चैतन्य निर्माण करत होती. ढसाळांची कविता ह्या धारेतील नवनिर्मितीवरचा विश्वास घेऊन, 'आज आम्हाला, या खोपटा खोपटातून पूर्ण सूर्य दिसतोय' असा आत्मविश्वास कायम ठेवते; परंतु त्यांचे संदर्भ बदललेले दिसतात. प्रबोधनाच्या पुढे जाऊन आता राजकीय कृती करण्याची गरज ढसाळांना वाटली आणि म्हणूनच दलित पँथर पक्षाच्या स्थापनेतून त्यांनी ह्या विचारांना मूर्त रूप दिले.

'गोलपिठा' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित होण्याआधी लघुनियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध होत राहिल्या. 'सत्यकथा' ह्या त्या वेळच्या प्रतिष्ठित मासिकात ठरावीक लेखकांच्या लेखनालाच वाव होता. ढसाळ आणि समकालीन विद्रोही व आधुनिक कवी उदा. चित्रे, कोलटकर आणि अशोक शहाणे ह्यांनी लिटील मॅग्झिनच्या धर्तीवर मराठीत लघुनियतकालिकाची परंपरा आणली. शब्द, असो, वाचा ही त्यातील काही प्रातिनिधिक लघुनियतकालिके म्हणता येतील. ढसाळ अशा विविध जातकुळींच्या, शैलींच्या विचारांच्या कवी लेखकांसह आपली काव्यात्म कामगिरी पुढे नेताना दिसतात आणि त्यामुळे त्यांच्या कवितांना अपरिहार्यपणे वरील सर्व गोष्टींची पार्श्वभूमी व आयाम लाभतात.

आतापर्यंत कवितेत न आलेले विषय, न बोलली जाणारी भाषा, विशिष्ट समाज सापेक्ष शब्द, त्यातून दिसणारी दुनिया व संस्कृती एखाद्या जोरदार गुद्द्याप्रमाणे 'गोलपिठा' ह्या त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहातून येते. प्रचलित, प्रस्थापित, भाषिक संकेतांतील शुभ-अशुभ, ग्राम्य-अग्राम्य, प्रस्तुत, अप्रस्तुताचे कोणतेही मुलाहिजे न बाळगता रस्त्यावरचे न पाहिलेले, लपलेले, प्रस्थापिताला नकोसे वाटणारे 'लुम्पन' विश्व गोलपिठातली कविता थेट मांडते. प्रतिष्ठा नसलेले भांडवली, बाजारू जग म्हणजे गोलपिठा, या जगाला कवी प्रतिष्ठितांच्या नजरेतून पाहत नाही. म्हणूनच त्यात एक सहानुभूती आहे, करुणाही आहे. 'येथे प्रत्येक हंगाम बेदर्दीच असतो / म्हणून नुसता सांगाडाच लटकवून भागत नाही रे' (गोलपिठा, पृ. २९) अशी समजूत घालण्याचा प्रयत्नही कवी करतो. त्याहीपुढे माणसाने स्वतः तयार केलेली अमानुष व्यवस्था तो जोपर्यंत मुळापासून उद्ध्वस्त करत नाही तोपर्यंत नवीन व्यवस्था; ज्यात माणूसपणाचे सूक्त रचले जाईल; तयार होणार नाही, असे कवी 'माणसाने पहिल्याप्रथम स्वतःला / पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे' (गोलपिठा, पृ. ४०) या कवितेतून सांगतो. ही संपूर्ण कविताच सर्वनाशातून निर्मितीचे गायलेले सूक्त आहे.

गोलपिठाच्या तिसऱ्या आवृत्तीत दि. पु. चित्रे


म्हणतात तसे 'दलितत्वातील अंतिम रूप असलेली वेश्या' व त्या व्यवसायातील जग ह्या सर्वांच्या व्यथेचा, शोषणाचा, संघर्षाचा परिपाक ह्या कवितासंग्रहात येतो व दलित शब्दाची व्याप्ती वाढते. ह्या कवितेवर टीका करताना ग. दि. माडगूळकर म्हणाले होते, की 'रसाळ नामदेवाचा काळ संपून ढसाळ नामदेवांचा काळ सुरू झाला आहे.' ह्या टीकेतून प्रस्थापित साहित्यिक वर्तुळात गोलपिठाने किती अस्वस्थता निर्माण केली होती, याची कल्पना येते.

नामदेव ढसाळ दलित चळवळ आणि स्वतःच्या कवितेविषयी राजकीय भान असलेले कवी होते. 'जग बदलतं, पॅटर्न बदलतो... त्या बदलाची जाण असलेल्या कवींपैकी मी आहे' असे ते सांगतात, तेव्हा ती एक पोज नसते, कवितेच्या दृष्टीने त्यांची ती कमिटमेंट असते. ती आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विषमतेच्या विरुद्ध, सगळ्या शोषणाविरुद्ध आहे. आजूबाजूचा समाज बदलतो आणि तो बदल कवीच्या देह-मन-विचारांवर परिणाम करतो. त्यातून त्यांची कविताही बदलते. बाहेरच्या जगाचा परिणाम आणि त्यातील तुमचे गुंतणे महत्त्वाचे असते आणि त्यातून होणाऱ्या स्वतःच्या 'ग्रोथ'प्रमाणे कवीने वाढत जायला हवे, असे ते मानतात. कविताही अशीच बदलत जाते. गोलपिठानंतरच्या प्रत्येक कवितासंग्रहात ही 'ग्रोथ' दिसते. ते स्वतःच म्हणतात की, 'गोलपिठातील स्टाईल मी 'रिपीट' करणार नाही कारण मी सर्व प्रयोग समजून केलेले आहेत.' कवितेतील बदललेली भाषिक रचना, संकेतांच्या पातळीवरील व राजकीय भूमिकेतील वळणे त्यांच्या राजकीय प्रवासाशी मेळ घालत जाणारी आहेत. समाजवादी लोहिया विचारधारेकडून, डाव्या मार्क्सवादी विचारधारेला समजून घेत असतानाच त्यात 'अनटचेबिलीटी'चा प्रश्न राजकारणाच्या अग्रस्थानी नसल्याचे लक्षात आल्याने तेथून पुढचा राजकीय प्रवास अधिक आक्रमक अशा पँथरच्या निर्मितीकडे झालेला दिसतो. त्यापुढचा राजकीय प्रवास त्यांना सत्ताधारी वर्गाशी तडजोड करण्यापर्यंत नेतो. अस्पृश्यता उच्चाटन आणि सत्तापालट करण्यासाठी मुख्य धारेत यावे लागते ह्या दृढ विश्वासातूनच हा प्रवास घडतो.

आपल्या आधीच्या पिढीला आंबेडकरी विचार समजले होते; परंतु सर्वंकष बदलासाठी लागणारे राजकीय भान, राजकीय शिक्षण, 'सुपर-स्ट्रक्चर शिवाय बेसिक-स्ट्रक्चरही बदलणे आवश्यक आहे' ही डायलेक्टिकल मटेरियलीजमची समज 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' ह्या कविता संग्रहातून स्पष्टरूपाने पुढे येते. दलित हा केवळ जातीचा बळी नसून आर्थिक वर्गाचाही बळी असतो व त्या अर्थाने ढसाळांनी आपला वर्ग हा 'सर्वहारा' वर्ग आहे व त्याचीच गाणी माझी कविता गाणार हे ह्या संग्रहात निक्षून सांगितलेले दिसते. 'एक तृतियांश जगावर रक्ताने रंगलेले ध्वज / फडकावणारा तूच / ह्या देशाच्या रक्तधमनीतून वाहणाराही तूच' (मूर्ख म्हाताऱ्याने..., पृ. ५९) या आणि याच कवितासंग्रहातील अनेक कवितांमधून ढसाळांनी कामगार हा आपल्या कवितेतला नायक निवडलेला आहे. ह्याच संग्रहात दलित, पीडित कामगारांसह स्त्रीला तिच्या प्रेयसी, आई ह्या पिढीजात भूमिकेतून बाहेर पडायला सांगून योद्धा म्हणून आवाहित करणाऱ्याही कविता येतात. 'कामगार बंधो', 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले', 'आईच्या समजुतीसाठी', 'माझ्या काळ्या सावळ्या लाडक्या मादीस' ह्या कविता त्यासाठी पाहता येतील. आपल्या प्रेयसीलाही तिचे पारंपरिक स्त्रीपण सोडून आता कॉम्रेड व्हावे लागेल, असे आवाहन कवी करतो. 'नर आणि मादीच्या कल्पना या युगातच कशा पायदळी तुडविल्यात / तू माझी दासी नाहीस मी तुझा राजा नाही / आपण कॉम्रेड आपण प्राणंतिक साथीदार' (मूर्ख म्हाताऱ्याने...पृ. ४५)

'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' ह्यात केलेले राजकीय भाष्य आणि त्यापुढील 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रः प्रियदर्शिनी' ह्यातील राजकीय भाष्य वेगळ्या स्वरूपाचे आहे. 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शनी' ही दीर्घ कविता म्हणजे ढसाळांमधील कवी आणि लढाऊ दलित नेता ह्यातील एक द्वंद्व आहे. ही कविता उद्देशिका (ode) असली तरी स्तुती नाही किंवा खुशामत नाही, तर ढसाळांच्या राजकीय भूमिकेतील भाबडेपण दर्शवणारी आहे. साम्राज्यवादी अमेरिकेविरुद्ध आणि तिसऱ्या जगाच्या बाजूने इंदिरा गांधींनी घेतलेली भूमिका ढसाळांना महत्त्वाची वाटते आणि तिला दिलेली दाद म्हणजे ही कविता म्हणता येईल.

“कवितेत ‘व्याकूळपणे इव्होल्व्ह’ होण्याविषयी ढसाळ बोलतात. त्या व्याकूळतेनेच त्यांची पुढच्या काळातील कविता जाते; परंतु त्यांच्या सुरुवातीच्या संग्रहांमध्ये असलेल्या राजकीय सक्रियतेला मध्यमवर्गीय स्थैर्य आल्यासारखे दिसते. कुठे उदासीनताही दिसते. तरीही गोलपिठातील आक्रमक, धारदार भाषा कवीच्या ‘ग्रोथ’प्रमाणे बदलते, कठोर आत्मपरीक्षण आणि आत्मचिंतनाकडे जाते. ‘या समकालीन इतिहासातला मी एक सामान्य माणूस, आत्मलीनतेपायी मी उतरवून ठेवलंय शिरस्त्राण’ (या सत्तेत जीव रमत नाही, पृ. १४) ह्या ओळींमधून चळवळ ऐन भरात असल्यापासून तिचा संधिकाळ आल्यावर येणारी चिंतनपरता व्यक्त होते; परंतु ती व्यक्त करताना ढसाळ कुठेच खचल्याची किंवा पराभवाची भाषा करत नाहीत, तर कवी म्हणून अखंड चालू असलेले शब्दांचे आणि विचारांचे द्वंद्व, बदलणाऱ्या सामाजिक, राजकीय संदर्भात मांडत राहतात.”



कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाच्या (सीपीआय) विचारांशी जवळीक असल्यामुळे सीपीआयने आणीबाणीला पाठिंबा दर्शविला तसा ढसाळांनी आपल्या कवितेतून (त्या राजकीय विचारांना पाठिंबा) दर्शविला हे सयुक्तिक व भूमिकेला साजेसेच म्हणावे लागेल. ह्या कवितेत प्रियदर्शिनी ह्या पात्राकडून वेगवेगळ्या अपेक्षा आहेत आणि तिच्यासाठी एक सावध इशारा आहे. ‘तिसऱ्या जगाच्या भल्यासाठी, तू एक आव्हान आहेस, हुकूमशहा आणि स्वामींना, प्रियदर्शिनी- रंकाचा छळ न होऊ देण्याचं तू निभवायला हवंयस अभिवचन, कामगार, शेतकरी, विद्यार्थी, दलित जनता ह्यांच्या गौरवासाठी तू झगडायला हवंयस अहोरात्र’ ह्या कवितेत ढसाळ एकीकडे काँग्रेस आणि डाव्या विचारांमधली भेदाची सीमारेषा पाळतात आणि दुसऱ्या बाजूला सत्ताधारी पक्षातील असूनही साम्राज्यवादी, सामंतशाहीविरोधी भूमिकेचे कौतुक करू शकतात. समाजातील ज्या अंतर्विरोधाविषयी ढसाळ जागरूक आहेत आणि जो त्यांना कविता लिहायला भाग पाडतो तोच अंतर्विरोध त्यांच्या कवितेत सापडतो.

प्रियदर्शिनी नंतर पुढे आलेल्या तुही यत्ता कंची (१९८१), खेळ (१९८३) गांडू बगीचा (१९८६) या सत्तेत जीव रमत नाही (१९९५) मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे (२००५) तुझे बोट धरून चाललो आहे मी (२००६) आणि निर्वाणा अगोदरची पीडा (२०१०) ह्या कवितासंग्रहांतून ढसाळ मानवमुक्तीच्या एका व्यक्तिगत, अंतर्मुख करणाऱ्या जाणिवेकडे जाताना दिसतात. या कवितेची भाषा, त्यातील काव्यवस्तू यांत बदल झालेला दिसतो.

ढसाळांच्या कवितेत भारतीय संदर्भासह आंतरराष्ट्रीय संदर्भही येतात. म्हणूनच पाल रॉबिन्सन, पॉब्लो नेरुदा यांवर कविता होतात. इस्लामी धर्म संकल्पना, ख्रिस्ती धर्म संकल्पना, प्रतिमा त्यांच्या कवितेत येतात. ‘गांडू बगीचा’ ही संकल्पनाही ख्रिस्ती धर्मातील पवित्र बागेचा संदर्भ सांगते. या संदर्भात प्रकाश देशपांडे केजकर यांनी नामदेव ढसाळांविषयी नोंदवलेले निरीक्षण महत्त्वाचे आहे. ‘ख्रिस्ती प्रतिमांचा अनुनय करत आपल्या कवितेचे नाते युरोपीय धर्म संकल्पनेशी जोडणाऱ्या तिसऱ्या जगातील कवीचा पवित्रा फार महत्त्वाचा आहे. ढसाळांच्या कवितेला हा दुसरा आंतरराष्ट्रीय धागा आहे.’[२]

कवितेत ‘व्याकूळपणे इव्होल्व्ह’ होण्याविषयी ढसाळ बोलतात. त्या व्याकूळतेनेच त्यांची पुढच्या काळातील कविता जाते; परंतु त्यांच्या सुरुवातीच्या संग्रहांमध्ये असलेल्या राजकीय सक्रियतेला मध्यमवर्गीय स्थैर्य आल्यासारखे दिसते. कुठे उदासीनताही दिसते. तरीही गोलपिठातील आक्रमक, धारदार भाषा कवीच्या ‘ग्रोथ’प्रमाणे बदलते, कठोर आत्मपरीक्षण आणि आत्मचिंतनाकडे जाते. ‘या समकालीन इतिहासातला मी एक सामान्य माणूस, आत्मलीनतेपायी मी उतरवून ठेवलंय शिरस्त्राण’ (या सत्तेत जीव रमत नाही, पृ. १४) ह्या ओळींमधून चळवळ ऐन भरात असल्यापासून तिचा संधिकाळ आल्यावर येणारी चिंतनपरता व्यक्त होते; परंतु ती व्यक्त करताना ढसाळ कुठेच खचल्याची किंवा

पराभवाची भाषा करत नाहीत, तर कवी म्हणून अखंड चालू असलेले शब्दांचे आणि विचारांचे द्वंद्व, बदलणाऱ्या सामाजिक, राजकीय संदर्भात मांडत राहतात.

आंबेडकरी विचार पुढे नेणे, समस्त 'अस्पृश्यां'ची एकी, त्यांना मुख्य प्रवाहात आणणे आणि सर्वंकष मुक्तीकडे मार्गक्रमण करणे ह्या ध्येय-उद्दिष्टांनी 'दलित पँथर' चळवळ निर्माण झाली. नंतरच्या काळात पक्षातील फुटीमुळे पँथर वाढू शकली नाही. ढसाळांच्या आयुष्यात राजकीय चढउतार अनेक आले. इंदिरा काँग्रेसला समर्थन देण्यापासून ते शिवसेनेसारख्या सत्ताधारी पक्षाशीही त्यांनी नाते जोडले. दलितमुक्ती आणि मानवमुक्तीच्या संघर्षात ही तडजोड नक्कीच टीकेचे टोक झाली; परंतु मुख्य प्रवाहातील राजकीय पक्षांशी संबंध ठेवताना आंबेडकरी विचार, दलित मुक्ती, कामगार मुक्ती आणि सर्वहारा वर्गाबद्दलच्या भूमिकेत त्यांनी बदल केला नाही.

ढसाळांचे समकालीन मित्र आणि हितचिंतक राजा ढाले त्यांच्या राजकीय भूमिका आणि कविता ह्यांविषयी बोलताना म्हणतात की, 'नामदेवाच्या राजकीय भूमिकेचा काही नेम नाही; पण त्याची कविता म्हणजे मांजरीसारखी आहे जी कितीही उंचावरून पडली तरी चार पायांवर तोल सांभाळते.' हे विधान त्यांच्या कवितेच्या बाबतीत खरेच आहे.

आपले बालपण आणि तारुण्य मुंबईच्या अशा गल्ल्यांमध्ये ढसाळांनी घालवलं ज्यातून एक नवीन 'कॉस्मोपॉलिटिअन' भाषा त्यांनी कवितेला देऊ केली. 'बरोबर-चूक' तसेच 'नैतिक-अनैतिकतेची' मापं कधीच उधळून लावल्यामुळे मराठी कवितेत 'लुम्पन' वर्गाची प्रतिनिधी भाषा उमटली. आक्रस्ताळी भाषा, बीभत्सपणा, लैंगिक शब्दांची व कृतींची वर्णने ह्या कवितेत येतात. त्यामुळे ठरावीक मध्यमवर्गीय साच्यातील काव्यप्रतिमा माहीत असणाऱ्या वाचकाला ती बीभत्स वाटते / वाटेल. 'प्रेयसी : रांडेचे सोज्वळ रूप / प्रियकर : भडव्याचं /बायका पुरुषांच्या छापील रांडा' (गोलपिठा, पृ. ६८) भांडवली अर्थव्यवस्थेत स्त्री पुरुषांच्या नात्यांची सालच ढसाळ काढतात. ढसाळ कवितेच्या 'स्ट्रक्चर'कडे लक्ष देणारा कवी असल्याने हे घडते. यात भाषेची रचना समाजाच्या रचनेतून कशी आविष्कृत होते ते लक्षात येते. भाषिक रचनेच्या व व्यवहाराच्या रूढ अर्थात ते बदल करू पाहतात.

दलित म्हणून व्यवस्थेत नाकारला गेलेला असला तरी आपल्या कवितेच्या विषयात त्याने काही त्याज्य केले नाही. जे जे मानवी आहे ते ढसाळांच्या कवितेचा विषय आहे. त्यासाठी स्थळकाळाच्या सीमा रेषाही पुसल्या जातात. म्हणूनच पाब्लो नेरुदावर कविता होते, हिजड्यांवर त्यांची कविता दिसते. आंबेडकर, इंदिरा गांधी अशा दोन परस्पर भिन्न राजकीय विचार असलेल्या व्यक्तींवर कविता होते. मुंबईसारख्या शहरावर तर होतेच; परंतु दुष्काळावरही होते. बायकोपासून रांडेपर्यंत, आईपासून मावशी, आजी ह्या नात्यांवरही कविता होते. मराठी कवितेला इतक्या वेगवेगळ्या अंगाने फिरवून आणणाऱ्या ढसाळांच्या कविता प्रदीर्घ आहेत, असं असूनही त्यात तोचतोचपणा नाही. त्यामुळे ही कविता आपल्याला कंटाळवत नाही, तर अनुभवाच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर घेऊन जाते. अशा ह्या कवीची स्टाईल पुन्हा कधी 'रिपीट' होणार नाही आणि हा कवीही पुन्हा 'रिपीट' होणे नाही.

**संदर्भ :**


१) गोलपिठा, प्रभात प्रकाशन, तिसरी आवृत्ती, मार्च १९९९

२) आधुनिक मराठी कविता : एक विश्लेषण - प्रकाश देशपांडे केजकर, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०१२ (पृ. २३५)

३) मराठी दलित कविता-संपा-बी. रंगराव, साहित्य अकादमी प्रकाशन, २००७

४) गोलपिठा - आराधना प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९७१, प्रभात प्रकाशन, तिसरी आवृत्ती - मार्च १९९९

५) तुही इयत्ता कंची-आंबेडकर प्रबोधिनी, १९८१

६) आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी, दलित पँथर प्रकाशन, १९७६

७) मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे! संपा- सतीश काळसेकर, प्रज्ञा लोखंडे, शब्द प्रकाशन, २००७


●


**कल्याणी झा**

फ्लॅट नं. ४, अथर्व सोसायटी,

लेन क्र.७, डहाणुकर कॉलनी,

कोथरूड, पुणे - ४११०२९

इ-मेल : kalyanijhaa@gmail.com

लेख

डॉ.सुजाता शेणई

# शब्दबीजांची जपणूक संवेदनशीलतेने करणारी लेखिका : कीर्ती मुळीक

**कीर्ती मुळीक यांना लेखन वारसा थोर साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्याकडून मिळाला हे जितके सत्य तितकेच त्या वारशाचे संचित सांभाळणे हे जबाबदारीचे! ही जबाबदारी त्या सांभाळत आहेत. वारसा मिळाला तरी प्रत्येकाला आपली वाट स्वतःच शोधावी लागते. त्या वाटेवरचे प्रवासी झाल्याशिवाय अनुभवाची शिदोरी बांधता येत नाही. ही शिदोरी बांधण्याचे आणि त्यातील शब्दरूप संचित पुढच्या पिढीकडे देण्याचे काम निरलसपणे करणाऱ्या कीर्ती मुळीक यांच्याकडे आशेने पाहण्यास हरकत नाही.**

शिक्षण, संशोधन आणि साहित्य या तीनही क्षेत्रात स्वतःच्या कामातून ओळख निर्माण करणे हे जबाबदारीचे काम आहे. ते शक्य होईलच असे नाही; पण शक्यतेच्या कसोटीवर तरी उतरवू शकतो. ही कसोटी साधण्याचा चांगला प्रयत्न प्राध्यापक आणि लेखिका डॉ. कीर्ती मुळीक यांनी केला आहे. दीर्घकाळ चालू असलेले अध्यापन आणि अकरा पुस्तकांच्या लेखनातून साहित्य क्षेत्रात मिळवलेली ओळख ही त्यांची शैक्षणिक आणि वाङ्मयीन कारकीर्द आहे. इचलकरंजी येथील आपटे वाचन मंदिराचा 'उत्कृष्ट मराठी गद्य साहित्य पुरस्कार' त्यांच्या 'डॉ. आनंद यादवः एक साहित्यिक प्रवास' या पुस्तकाला मिळाला आणि संपादन क्षेत्रातील त्यांचे योगदानही अधोरेखित झाले. पीएच.डी.च्या निमित्ताने सुरू झालेला लेखनप्रवास सातत्याने सुरू आहे, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

'ग्रामीण साहित्याची चळवळ', 'साहित्य स्वरूप आणि विकास' ही संशोधन-समीक्षात्मक पुस्तके, 'माणसं' हा कथासंग्रह, 'झाडं' हा ललित गद्यसंग्रह, 'गोतावळाः साद आणि प्रतिसाद', 'डॉ. आनंद यादवः एक साहित्यिक प्रवास' हे संपादन, 'मधमाश्यांची एकता आणि इतर गोष्टी', 'आम्हा मुलांचे सामर्थ्य', 'दौलतवाडी आणि इतर कथा', 'डिटेक्टिव्ह टोळी आणि इतर कथा' ही मुलांसाठीची पुस्तके, तर शंकर पाटील यांच्या 'टारफुला' या कादंबरीचे संक्षिप्तीकरण एवढी लेखनसंपदा त्यांच्या नावावर जमा आहे. अनेक साहित्यप्रकार वापरताना भाषेची सजग जाण आणि शब्दांच्या बीजाचा गांभीर्याने विचार करावा लागतो. कीर्ती मुळीक तो करतात म्हणूनच प्रत्येक साहित्यप्रकाराचे वैशिष्ट्य सांभाळण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत, असे म्हणता येईल. कीर्ती मुळीक यांच्या लेखनाचा विचार करायचा, तर तो त्यांनी लिहिलेल्या साहित्यप्रकारानुसार केला पाहिजे.

**संशोधन-लेखन :**

मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ १९७४ पासून सुरू झाली. १९७७ मध्ये नवोदित ग्रामीण लेखकांचा पहिला मेळावा झाला आणि तेथून पुढे चळवळीने प्रत्यक्ष कृतिशील रूप घेतले. डॉ. आनंद यादव हे या चळवळीचे प्रवर्तक होते. खेड्यातल्या शिक्षित तरुणाचे विचार, अनुभव लिखित स्वरूपात प्रकाशित व्हावेत व ते समाजासमोर यावेत या हेतूने यादव सरांनी सुरू केलेली ही चळवळ पुढे चांगलीच फोफावली. ग्रामीण मेळावे, चर्चासत्रे, कार्यशाळा ते ग्रामीण साहित्य संमेलने हा त्याचा विस्तारत गेलेला प्रवास होता. ग्रामीण साहित्यिक रा.रं.बोराडे, द.ता.भोसले, नागनाथ कोत्तापल्ले, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख इत्यादींनी या चळवळीसाठी केलेल्या प्रयत्नांचा व ग्रामीण साहित्य संमेलनांचा लेखिकेला जवळून परिचय होता. या सर्वांचा परिणाम असेल लेखिका या विषयाकडे ओढली

गेली आणि त्यातून 'ग्रामीण साहित्याची चळवळ' (प्रथमावृत्ती २०११) या पुस्तकाची निर्मिती झाली.

चळवळ म्हणजे 'साध्यप्राप्त कृतिशीलता' असे असले तरी, 'सामाजिक जीवनात नवे बदल घडवून आणणे, नवी सुव्यवस्था निर्माण करणे या उद्देशाने करण्यात आलेले सामूहिक स्तरावरचे प्रयत्न म्हणजे चळवळ' असे लेखिकेला वाटते. या व्याख्येला न्याय देणारी ग्रामीण चळवळ होती का, ही चळवळ १९६० नंतर रुजू लागली, तर साठोत्तरी कालखंडाच्या संक्रमणाचा या चळवळीवर काय परिणाम झाला, चळवळीची स्पंदने कोणती होती आणि चळवळीचे यशापयश कोणते या आणि यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे वाचकाला यातून समाधानकारकरीत्या मिळतात.

'ग्रामीणांनी ग्रामीणांसाठी लिहिलेले ग्रामीण साहित्य', हे चळवळीचे श्रेयस आणि प्रेयस होते. ग्रामीण चळवळीनेही तीन पिढ्या पाहिल्या. पिढीगणिक साहित्याचे स्वरूप, आशय आणि अभिव्यक्ती यात परिवर्तन होत गेले. ते कसे झाले याची चिकित्सक मीमांसा या पुस्तकात आहे. ग्रामीण साहित्य संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या विकसित झाले, कसदार-दमदार झाले या साऱ्याचे यश चळवळीचे आहे, याचा अभ्यासपूर्ण लेखाजोखा कीर्ती मुळीक यांनी मांडला आहे. समीक्षा आणि संशोधन यांची सांगड घालत लिहिलेले हे पुस्तक साहित्याच्या अभ्यासकांना दिशा देणारे आहे.

'साहित्यः स्वरूप आणि विकास' या दुसऱ्या संशोधनपर ग्रंथात कीर्ती मुळीक समीक्षात्मक लेखन करताना पुस्तक परीक्षण, साहित्यिकांचे व्यक्ती व वाङ्मय या रूपात परिचयात्मक लेखन आणि स्वतंत्र समीक्षात्मक लेखन अशा तीन टप्प्यांत हे लिहिले गेले आहे. अर्वाचीन कालखंड, साठोत्तरी कालखंड, नव्वदोत्तरी लेखन आणि एकविसाव्या शतकातील लेखकांची घेतलेली दखल यात वाचावयास मिळते. दीर्घ कालखंड वाचताना लेखिका त्या काळाची मांडणी आणि वैशिष्ट्ये देते, हे नमूद करायला हवे. हा विस्तीर्ण पट अनुभवताना ग्रामीण जीवन आणि लेखन याच्याशी सांधा जोडणारा 'मराठी ग्रामीण साहित्याची चळवळः प्रेरणा आणि परिणती' हा लेख, ग्रामीण साहित्याचे विविधांगांनी चिंतन मांडणारा डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा 'ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि शोध' या ग्रंथाचा साक्षेपी विचार व एकविसाव्या शतकातील दोन ग्रामीण कादंबऱ्या 'जमीन' (लेखक- राजन गवस), 'बोडखी' (लेखिका-प्रतिमा इंगोले) या लेखांचा समावेश करता येईल. ग्रामीण साहित्य, साहित्यिक आणि चळवळ यांवर भरपूर लेखन मराठीत झाले आहे. लेखिकेचे वैशिष्ट्य म्हणजे या साऱ्याची परिणती काय झाली आणि का झाली याची सोदाहरण कारणमीमांसा त्यांनी दिली आहे. खेड्यातील कौटुंबिक, मानसिक व भावनिक जीवन, जीवनसंघर्षाबरोबरच येणारा मूल्यसंघर्ष आणि विषम अर्थव्यवस्था या व यांसारख्या घटकांमुळे ग्रामीण जीवनावर होणारे परिणाम लेखिका उदाहरणांसहित स्पष्ट करते, तेव्हा लेखिकेचा विषयामागचा आवाका व अभ्यास दिसून येतो. कृषिसंस्कृती ही महत्त्वाची संस्कृती; पण या संस्कृतीत होणारे बदल व त्यामागची कारणे शोधताना व त्याची मीमांसा करताना लेखिकेने विदारक सत्य परखडपणे मांडले आहे. आज खेडी बकाल होत आहेत कारण विषमतेवर आधारलेली अर्थव्यवस्था याला कारणीभूत आहे, हे निरीक्षण लेखिका नोंदवते. 'आहे रे' आणि 'नाही रे' मधील दरी स्वातंत्र्यानंतरही कायम आहे, शहरी-ग्रामीण हे भेदही कायम आहेत आणि जातिव्यवस्था जाता जात नाही हे विदारक वास्तवही दूर होत नाही. मंदा खांडगे, विंदा करंदीकर, शान्ता शेळके, अण्णाभाऊ साठे हे मागच्या पिढीतील साहित्यिक, तर अरुण कोलटकर, नीरजा, अशोक कोतवाल आणि सुभाष पवार हे अलीकडच्या काळातील साहित्यिक आहेत. या साहित्यिकांच्या साहित्यकृती व त्यांची लेखनवैशिष्ट्ये वाचताना दोन्ही काळातील समाजवास्तव समजण्यास व समजून घेण्यास मदत होते, हे या पुस्तकाचे यश आहे. डॉ. न. म. जोशी यांनी, 'भारतातील नवआधुनिकतावाद, कलेचे सामाजिक जीवनातील स्थान, साहित्य आणि समाज अशा लेखांतून त्यांनी केलेला साहित्यविमर्श पूर्वसुरींच्या विचारप्रवाहाला आधुनिक वळण देणारा आहे', ही दिलेली प्रतिक्रिया योग्य वाटते.

**संपादन :**

'डॉ. आनंद यादवः एक साहित्यिक प्रवास' हे श्री. अप्पासाहेब जकाते यादव यांच्याबरोबर सह-संपादित केलेले पुस्तक आहे. आनंद यादव यांची मुलगी आणि संपादक या दुहेरी जबाबदारीतून हे संपादन करणे म्हणजे संपादन कौशल्याची कसोटी होती. या कसोटीला न्याय दिला असेच म्हणावे लागेल. यादव सरांनी ललित, कथा, समीक्षा, कादंबरी, काव्य इ. विविध वाङ्मय प्रकार सक्षमतेने हाताळले. यातील साहित्यकृतींचा साक्षेपाने परामर्श घेणारे लेख यात आहेत. हे लेख इंद्रजित भालेराव, नागनाथ कोत्तापल्ले, रवींद्र ठाकूर, वासुदेव मुलाटे, रवींद्र शोभणे इत्यादी मान्यवर साहित्यिक व समीक्षकांनी लिहिले आहेत. एकूण सतरा लेख असलेल्या या संपादनात महाराष्ट्रातील विविध भागातील लेखकांनी केलेले लेखन आहे. उत्स्फूर्तता आणि तटस्थता, योग्य मूल्यमापन पण अवास्तव स्तुती नाही,

यादवांचे मोठेपण तरीही वेगळेपण आणि साहित्यसंमेलनाध्यक्ष होऊनही संमेलनाला जायला न मिळाल्याची सल सारे यातून स्पष्टपणे समोर येते. आनंद यादव या व्यक्तीवर प्रेम करणारे आणि आनंद यादव साहित्यिक म्हणून प्रेम करणारे असे अनेक आहेत. वाचकप्रेमींनीही सारे साहित्य वाचले असेल असे नाही किंवा वाचल्यास त्याच्या पुनःप्रत्ययाचा आस्वाद घ्यायचा असेल, तर हे संपादन संग्रही असायला हवे. यादव सरांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय दिल्याने थोर साहित्यिकाच्या प्रतिभेची जाणीव गडद होते. खरे तर हा गौरवग्रंथही झाला असता; परंतु अभ्यासकांना त्यातून समीक्षेची व संशोधनाची मूल्ये गवसली नसती. या संपादनातून आस्वाद, विचार, संशोधन व समीक्षा हे चार कोन साधले आहेत, असे म्हणता येईल.

संपादनात महत्त्वाची असते ती प्रस्तावना. या प्रस्तावनेतून आनंद यादव व्यक्ती आणि लेखक, ग्रामीण चळवळीचे प्रवर्तक, आत्मचरित्रात्मक कादंबरीचा प्रयोग करणारे सर्जनशील लेखक, नवे अनुभव सुचत नाही म्हणून घेतलेली लेखननिवृत्ती आणि नवोदित लेखकांना घडवण्याची सामाजिक बांधिलकी स्वीकारणारे साहित्यिक अशी बहुपेडी ओळख होते. संपादनाची सारी कौशल्ये यात दिसतात. संपादन म्हणजे पुनःसर्जनाचा आनंद असतो. तो या संपादक द्वयींनी घेतला व वाचकाला दिला, असे म्हणता येईल.

**ललितलेखन :**

'शब्दफुलांची ही झाडं, आई, यांच्या सावलीत तू बसावंस', ही तरल आणि काव्यात्म अर्पणपत्रिका असलेला 'झाडं' हा कीर्ती मुळीक यांचा लेखसंग्रह आहे. ललितलेखनाला आवश्यक असलेली संवेदनशीलता, काव्यात्मता आणि चिंतनशीलता या लेखसंग्रहात दिसून येते. शब्दफुलांची झाडं लेखिकेचा हात धरून अज्ञात प्रदेशात घेऊन जातात आणि त्या प्रदेशाची वाट प्रकाशमान करून टाकतात. या प्रकाशाच्या प्रदेशात लेखिकेचे अनुभव उजळून निघतात. हे अनुभव सामान्य, साधारण; पण त्याला चिंतनाच्या पातळीवर नेऊन चिंतनाची खोली व्यापक करण्याचा प्रयत्न लेखिका करते.

एकवीस लेख असलेले हे छोटेखानी पुस्तक माणसाच्या सभोवतीच्या घटकांशी नाते जोडत जाते. सूर्य हा स्वयंप्रकाशी तेजःपुंज प्रकाशगोल! या सूर्याला पाहिल्यावर लेखिकेला जीवनात अनेक संघर्ष पाहिलेल्या, अनुभवलेल्या आजोबांच्या चेहऱ्यावरील सुरकुत्यांची आठवण होते. आजोबा जसे सर्वांवर पांघरूण घालत हिंडतात, तसाच सूर्यही किरणांची पांघरुणं घालत फिरतो. या सूर्याला स्वतःच्या कुटुंबाचा एक घटक बनवून त्याच्याकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन लेखिकेने दिला आहे. 'झाडं', 'बाग', 'कोठी', 'माकडं', 'बागेत फिरताना' या लेखांमधून आलेल्या अनुभवाला शब्दबद्ध करताना त्याचे सार्वत्रिकीकरण करणे हे ललितलेखनाचे बळ असते, ते यातून दिसते. वाचकाच्या मनात तो अनुभव रुंजी घालायला हवा, अनुभव लेखक-वाचकाला आस्वाद्य व्हायला हवा. ही वैशिष्ट्ये यातून दिसतात.

'सौंदर्य' हा शब्द आपण सहजतेने वापरतो; पण या शब्दाचा अर्थ व त्यामागची व्याख्या लेखिका हळुवारपणे उलगडून दाखवते. 'सौंदर्य एक कहाणी आपल्यासमोर मांडत असते. ही कहाणी रंगांची असते, लहान मोठ्या आकाराची असते, तर कधी लहानमोठ्या व्यक्तींची असते. कधी या सौंदर्याचा निरागसपणा भावतो, तर कधी त्यात आपला एखादा अनुभव आपल्याला सापडू लागतो. सौंदर्याने कधी आपण रोमांचित होतो, शरीर-मनात एक वीज खेळून जाते, तर कधी आपल्याला ते स्तब्ध करते'. सौंदर्याची व्याख्या प्रत्येकाची वेगवेगळी असू शकते; पण सौंदर्याचा स्थायिभाव शोधण्याचा लेखिकेचा हेतू, त्याचे संवेदनशीलतेने केलेले वर्णन आणि वाचकाला त्याचा अधिक शोध घेण्यास सहजतेने केलेले मार्गदर्शन विशेष भावून जाते.

'जत्रा' व 'जगणं' या लेखांतून जगणं हे किती बहुआयामी असते; पण ते तितक्या कोनातून पाहिले जाते का हा प्रश्न उभा राहतो. चिंतन आणि जगण्यातील सजगता अधोरेखित करत

**“ 'सौंदर्य' हा शब्द आपण सहजतेने वापरतो; पण या शब्दाचा अर्थ व त्यामागची व्याख्या लेखिका हळुवारपणे उलगडून दाखवते. 'सौंदर्य एक कहाणी आपल्यासमोर मांडत असते. ही कहाणी रंगांची असते, लहान मोठ्या आकाराची असते, तर कधी लहानमोठ्या व्यक्तींची असते. कधी या सौंदर्याचा निरागसपणा भावतो, तर कधी त्यात आपला एखादा अनुभव आपल्याला सापडू लागतो. सौंदर्याने कधी आपण रोमांचित होतो, शरीर-मनात एक वीज खेळून जाते, तर कधी आपल्याला ते स्तब्ध करते'. सौंदर्याची व्याख्या प्रत्येकाची वेगवेगळी असू शकते; पण सौंदर्याचा स्थायिभाव शोधण्याचा लेखिकेचा हेतू, त्याचे संवेदनशीलतेने केलेले वर्णन आणि वाचकाला त्याचा अधिक शोध घेण्यास सहजतेने केलेले मार्गदर्शन विशेष भावून जाते. ”**

जातो. एकविसाव्या शतकात जगण्याची गरज सतत बदलणारी आहे कारण हे तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगात जगायचे, तर लेखिकेने दिलेला सल्ला ऐकायला हवा. तो म्हणजे, 'लेटेस्ट माहितीचा साठा असणाऱ्या गुगल मुलाचे ऐकले पाहिजे'. माणसापेक्षा तंत्रज्ञान मोठे होत आहे, हा भीतीवजा सावधानतेचा इशारा तर यातून दिला जात नाही ना?

विनोदाचा मार्मिक व माफक शिडकावा करत काही लेख येतात. लेखिका मराठीची प्राध्यापक असल्याने पारिभाषिक संज्ञा येतात. अजूनही काही इंग्रजी शब्दांना मराठी पारिभाषिक शब्द सापडले नाहीत याची खंत व्यक्त होते व आज नवे शब्द तयार करण्याची गरज आहे हे निदर्शनास आणून देते. प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांशी असलेले नाते 'आजचा विद्यार्थी'मधून जाणवते. दरवेळी विद्यार्थ्यांना आपण शिकवले पाहिजे असे नाही, तर विद्यार्थीही आपल्याला शिकवतात त्या वेळी त्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, असे या लेखातून सूचितही करतात.

डॉ. आनंद यादव यांची 'नटरंग' ही अतिशय गाजलेली कादंबरी होय. या कादंबरीवर आधारित चित्रपटही खूप गाजला. त्यामागची रंजक आणि रोचक कहाणी 'नटरंग-कादंबरी ते सिनेमा' हा लेख वाचल्यावर कळते. 'दिग्दर्शकाने कादंबरीला पूर्ण शरण गेले पाहिजे व लेखकाच्या मनाप्रमाणेच कादंबरीचे रूप चित्रपटातून रेखाटले पाहिजे', या यादव सरांच्या अटी दिग्दर्शक रवी जाधव यांनी मान्य केल्या व तंतोतंत उतरवल्या म्हणूनच चित्रपटही ताकदीचा झाला, असे लेखिकेला वाटते. हा लेख म्हणून जरी चांगला असला तरी, तो या संग्रहात बसत नाही असे मात्र वाटत राहते.

ललित लेखकाने ललित गद्यात आत्मपरता आणि अनौपचारिकता ही लेखन कौशल्ये हाताळली की, लेखन वाचनीय व रसपूर्ण होते. अनुभवाची आस्वाद्यता वाढते. काव्यात्मता आणि त्याला वैचारिकतेची दिलेली जोड ही लेखनाला एका उंचीवर नेऊन ठेवत असते; पण वैचारिकता लालित्याला मारक ठरणार नाही याची काळजीही घेतली पाहिजे, ती लेखिकेने घेतली आहे. स्वैर चिंतन, मुक्त भाष्य, वेचक व अर्थपूर्ण अनुभवाच्या निवडीतून व लेखनातून वाचकाला सुजाण करणे हे ललित लेखकाला साधावे लागते, ते काही प्रमाणात कीर्ती मुळीक यांना साधले आहे, असे जाणवते. अजूनही पुष्कळ 'झाडं' लेखिकेला खुणावत आहेत, त्यातील सौंदर्य पारखून मांडायचे आहे हे वाचकाला जाणवते आहे.

**कथासंग्रह :**

'माणसं' हा तेरा कथा असलेला कथासंग्रह आहे. साध्या, सोप्या आणि सहज संवादशैलीत लिहिलेल्या कथा असे याचे वर्णन करता येईल. कथेतील अनुभव वाचकाच्या परिचयातील; पण त्याची चांगली कथा होऊ शकते, हे कीर्ती मुळीक यांच्या कथेतून जाणवते, हे याचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सजीवासाठी 'मरण' ही नैसर्गिक घटना; पण त्या मृत्यूभोवती फिरत असतो तो मानवी मनाचा खेळ असतो. या कथेत दागिने हे मुख्य नायकाच्या भूमिकेत येतात. दागिन्यांतून प्रत्येक जण आपली सोय कशी होणार हे पाहत असतो. विनोद, उपहास, नात्यानात्यांतील बंध या साऱ्यावर ही कथा प्रकाश टाकते.

लेखिका ही शहरी वातावरणात वाढल्याने त्या परिसराचा प्रभाव येणे साहजिक आहे. सोसायटीत राहणाऱ्यांना 'सिक्युरिटी' गरजेचा वाटतो. तो म्हणजे जणू आपली कामे करणारा हरकाम्या असला पाहिजे ही चुकीची पण ठाम समजूत सोसायटीतल्या फ्लॅटधारकांची असते. या समजुतीतून अनेक घटना घडतात; पण त्याला तो 'सिक्युरिटी' जबाबदार ठरवणे व स्वतःची प्रतिमा कायम राखणे हे वास्तव यातून दिसते. सिक्युरिटीही पहिल्यांदा माणूस आहे, त्यालाही भाव-भावना आहेत याचा विसर पडतो. परिस्थितीशरण माणूस आणि त्याची दुःखे यातून व्यक्त झाली आहेत. लेखक संवेदनशील असला की, त्याला समोरच्या माणसाच्या मनातील भावनेचा तळ शोधता येतो, हे या कथेतून जाणवते.

'छत्रीचे गौडबंगाल', 'वीज आणि वृक्ष', 'पप्पा प्रेमात पडतात', 'दहीहंडी' या कथांतून माणसांचे स्वभाव, त्यांचे ताणतणाव व विचार कृतीत असलेले अंतर यावर भाष्य केले आहे. या कथांमध्ये मध्यमवर्गीय माणूस हा केंद्रस्थानी आहे. या माणसाची मानसिकता ही कशी परिस्थितीजन्य फिरत राहते, हे यातून जाणवते. लेखिका एका बाजूला करत असलेले भाष्य आणि त्याच वेळी वाचकाला वास्तवाची करून दिलेली प्रखर जाणीव दोन्ही प्रकर्षाने समोर येते. उपहास आणि विनोद याचा खुबीने केलेला वापर रंगत आणतो.

राजकारण हे फक्त राजकारणी लोकांनीच करायचे असते असे नाही, तर दैनंदिन जीवनात सामान्य माणूसही राजकारणच करत असतो, हे 'पैशाचं झाड' या कथेतून दिसते. गल्लीतल्या राजकारणातून दीड कोटी रुपये उभे करण्याचे कसब साधलेला विकास दिल्लीतल्या राजकारणाची काय गणिते असतील यावर अप्रत्यक्ष प्रकाश टाकतो. राजकारणी माणसाची लबाडी, आपमतलबीपणा यांवर खुमासदार पण सहज पद्धतीने लेखिका मत मांडते.

माणसांभोवती फिरणाऱ्या या कथा माणसाची मानसिकता पकडण्याचा प्रयत्न करतात. या मानसिकतेचा वाचकाला त्याच्या आयुष्यात कधीतरी प्रत्यय आलेला असतो; पण पुनःवाचनातून त्या घटनेचा नवा अन्वयार्थ शोधण्यास तो प्रवृत्त होतो, हे या कथांचे यश म्हणावे लागेल. छोट्या पण अर्थगर्भ कथांचे हे लेखन वाचकाशी संवाद साधू पाहते हे अधोरेखित करावेसे वाटते.

**किशोर गटातील मुलांसाठी लेखन :**

बालवाङ्मय हे दालन मराठीत समृद्ध आहे. युवकांसाठीही काही प्रमाणात साहित्याची उपलब्धता आहे; पण किशोर गटातील साहित्य अल्पप्रमाणात उपलब्ध आहे. ही उणीव थोड्या अंशी तरी भरून काढण्याचा प्रयत्न कीर्ती मुळीक यांच्या 'दौलतवाडी आणि इतर कथा' व 'डिटेक्टिव्ह टोळी आणि इतर कथा' या कथासंग्रहातून झालेला आहे. किशोरवयीन मुलांना जी नैतिक मूल्ये आणि जीवनकौशल्ये द्यायला हवीत किंवा जो संस्कार त्यांच्यावर झाला पाहिजे तो यातून होण्यास मदत होते. मुलांच्या भावविश्वाशी जवळीक असणारी चित्रे आणि लेखनमांडणी यामुळे ही पुस्तके मोठ्यांनाही आकर्षित करतात. 'मधमाश्यांची एकता आणि इतर गोष्टी' व 'आम्हा मुलांचे सामर्थ्य' ही पुस्तकेही उल्लेखनीय आहेत. साहित्यप्रेमी भगिनी मंडळाने चांगल्या कादंबऱ्यांचे संक्षिप्तीकरण करून एकविसाव्या शतकातील मुलांना ते वाचनीय करून दिले. या संक्षिप्तीकरण प्रकल्पात कीर्ती मुळीक यांनी शंकर पाटील यांच्या 'टारफुला' या कादंबरीचे संक्षिप्तीकरण करून लेखनाचा वेगळा बाज हाताळला, असे म्हणता येईल.

कीर्ती मुळीक यांना लेखन वारसा थोर साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्याकडून मिळाला हे जितके सत्य तितकेच त्या वारशाचे संचित सांभाळणे हे जबाबदारीचे! ही जबाबदारी त्या सांभाळत आहेत. वारसा मिळाला तरी प्रत्येकाला आपली वाट स्वतःच शोधावी लागते. त्या वाटेवरचे प्रवासी झाल्याशिवाय अनुभवाची शिदोरी बांधता येत नाही. ही शिदोरी बांधण्याचे आणि त्यातील शब्दरूप संचित पुढच्या पिढीकडे देण्याचे काम निरलसपणे करणाऱ्या कीर्ती मुळीक यांच्याकडे आशेने पाहण्यास हरकत नाही.

●

**डॉ. सुजाता शेणई**
फ्लॅट नं ३, सुंदर रचना, आनंदनगर,
सिंहगड रोड, पुणे ४११०५१.
चलभाष : ९०११०१७९१६
इ-मेल : sujata.shenaigmail.com

## भावपूर्ण श्रद्धांजली!



● **ह. ल. निपुणगे :** महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी कोषाध्यक्ष, माजी संपादक, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, 'विशाखा' या दिवाळी अंकाचे संपादक, आपल्या 'हलचल' या आत्मचरित्रामुळे रसिक वाचकांना परिचित. साहित्य परिषदेच्या कार्यात अनेक वर्षे सक्रिय सहभाग.



● **अनिल बळेल :** कथालेखक, बाल साहित्यकार, वृत्तपत्रे आणि विविध नियतकालिकातून सातत्याने स्तंभलेखन. ''विसाव्या शतकातील गाजलेले दहा वृत्तपत्र संपादक'' या ग्रंथासाठी कोशकार स. मा. गर्गे पुरस्कारासहित लेखनासाठी अनेक पुरस्कारप्राप्त सत्तावीस ग्रंथांचे लेखन.



● **शकुंतला क्षीरसागर :** 'श्री के क्षीरसागर व्यक्ती, टीकादृष्टी आणि टीकासृष्टी', प्रबंध लेखनाची संशोधनपद्धती आणि संपूर्ण केशवसुत ही त्यांची महत्वपूर्ण पुस्तके होत. सा.फू.पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात १९५८ ते १९९१ या काळात विविध पदांवर नोकरी केली. सहाय्यक ग्रंथपाल या पदावरून त्या सेवानिवृत्त झाल्या. केशवसुताच्या कवितेचा शैलीवैज्ञानिक अभ्यास

या अप्रकाशित पीएचडी प्रबंध आस प्रबंध आस मराठी अभ्यास परिषदेचा महाबँक पुरस्कारही मिळालेला होता. शेवटपर्यंत अत्यंत चिकित्सक, शिस्तप्रिय, आणि अभ्यासू असलेल्या शकुंतला ताईंनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत भाषाशैली विषयक लेख लिहिले होते.



● **गिरिजा कीर :** बालसाहित्यकार, कथाकथनकार, सिद्धहस्त लेखिका, कथा-कादंबरी, मुलाखती, प्रवासवर्णने आदी विविध प्रकारची साहित्यनिर्मिती. सामाजिक कार्यातून कामगार वस्ती, कुष्ठरोग्यांची वस्ती आणि आदिवासी भागात जाऊन सामाजिक प्रश्नांचा अभ्यास. गाभाऱ्यातील माणसं, जगावेगळी माणसं, कलावंत, साहित्य सहवास ही व्यक्तिचित्रणात्मक पुस्तके आहेत. म.सा.प.चा ह.ना. आपटे पुरस्कार, पुणे मराठी ग्रंथालयाच्या कमलाबाई टिळक पुरस्कार, अभिरुची पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित.

समीक्षा


**एकनाथ पगार**

# ‘धूळपेरा उसवता...’ विष्णू थोरे यांच्या कविता

‘**धू**ळपेरा उसवता...’ हा विष्णू थोरे यांचा कवितासंग्रह पुन्हा पुन्हा वाचताना दर एक वाचनात नवा वाटत राहतो. खेडेगाव, शेती, शेतीतले कष्ट ,कष्टकरी आईबाप, शेतकीतल्या कृती-उक्ती, शेतकीतले झुरत-पाझरत राहणे, गणगोत, झाडं, पिके, पाऊस, पक्षी, हिरवे साप, वारी-दिंडी-विठ्ठल, गुरेढोरे वगैरे शेतकीतले संघर्ष या कवितांमध्ये भेटतात. शेतीतले व्यथाक्षण, स्वप्नक्षण आणि संहाराचे क्षणही अत्यंत प्रत्ययकारी नादसौंदर्याचे, अर्थसौंदर्याचे क्षण म्हणून संवेद्य बनतात. या कवितांमधील आशयसूत्रे परिचित आहेत. बऱ्याच लयी, अष्टाक्षरी छंद, क्वचित प्रतिमाबंधही परिचित आहे. या परिचिताला अनोखे अपरिचित करण्यातून लक्षात येते, राहते, ती काव्यात्मकता महत्त्वाची असते.

समकालीन जीवन-वास्तव आणि कल्पिताची विविध नादलयींमधून संमिश्रणाची प्रक्रिया येथे घडत राहते. केवळ शेतकीतले वास्तव चटके ‘दाखवणे’ किंवा कल्पिताचे ‘स्वप्नचळ’ मुक्तपणे वावरू देणे अशी एकमार्गी काव्यप्रतिभा येथे नाही. खेड्यांचे शेतकीतले वास्तव ‘भयाण’ आहेच. त्यात दुष्काळ, दुःखे, शोषणही आहे. शेतकीचे वास्तवही स्थिर नाही. जगण्यातले अस्थैर्य परिवर्तन या वास्तवाला स्थिर राहू देत नाही, या अस्थैर्यासाठी, काही स्थिर क्षणांसाठी स्वप्नरंजक कल्पकता उभारावी लागते. प्रखर वास्तवाच्या चटक्यांमध्ये ‘काही’ स्वप्नशीतल असे असावे... असाही अनुभव या कविता देतात.

‘रंगलो त्या माळाला / चुलीतल्या जाळाला / माती उसवणाऱ्या / नांगराच्या फाळाला अशी अर्पणपत्रिका हा कवी लिहितो. ‘माळ’, चूल, माती उसवणारा नांगर’ हे निष्ठेचे आणि जगण्याचे केंद्र आहेत. माळ बहुधा उघडाबोडखा, खडकाळ, क्वचित हिरवा होणारा आहे. माळावरची शेतीमाती, त्या मातीला सर्जनशील बनविणारा नांगर, त्यातून उत्पन्न झालेले पीकपाणी काळीतून-पांढरीत स्थलांतरित होते. अन्न शिजवणाऱ्या जगण्याची धग आहे, तेथे! शेतीची नांगरट करण्याचे, संघर्ष करण्याचे प्राणशास्त्र हा नांगर आहे. संघर्षाचेच, जगण्याचेच एक प्रतीक ‘नांगर’ आहे. नांगरी संस्कृतीतच माळरान, चूल समाविष्ट असते. परिवर्तनाच्या ओघात शेतीतही ‘यंत्र-तंत्र, रसायने’ आले, जगण्याच्या उधळलेल्या नांगरीसंस्कृतीकडून नागरीकडे जाऊ लागल्या आहेत. शेतीचे बिनशेतीत रूपांतरण सुरळीत सुरू आहे. विकास होत आहे. विकासासाठी जंगलतोड बिनशेतीकरण हे करणे क्रमप्राप्त आहे. मोठे मोठे रस्ते करायचे, हब उभारायचे, बाहेरच्या भांडवलदारांना येथे आपली माती-दगडं-हात द्यायचे. डिसइव्हेंसमेंट वगैरे यामुळे उत्पादनक्षमता असलेली जमीन हळूच काढून घेतली जाते. विकासनीती प्रश्नांकित करता येणार नाही, इतकी बाध्य आहे. भारतीय शेतकऱ्याचे समूहमानस सतत नियतीशरण, निसर्गशरण असेच राहत आले आहे. शेतकऱ्यांच्या समस्या, संप-आत्महत्या-कर्जमाफी हे स्थानिक चर्चांचे विषयही असतात. महत्त्वाचे म्हणजे विधान ‘साधा-सुधा’ वर्तमान काळ आहे. कैक धोरणे-योजना आल्या गेल्या, येतील जातील, पेच तसाच आहे.



**धूळपेरा उसवता...**
**-विष्णू थोरे**
**अक्षरबंध प्रकाशन,नाशिक.**
**एप्रिल २०१५**
**पृष्ठसंख्या ९६मूल्य १०० रु.**

**'धूळपेरणी' हा शोकात्मिकेचा प्रारंभ असतो. नैराश्यात आशेचे चार थेंब शोधण्याचे स्वप्न असते. ओढ दिलेला पाऊस येईल, असा भरवसा असतो. स्वप्नभंगही अटळ, पाऊस येत नाही. कुठे कुठे आवई असते, शिंतोडे असतात. ओल नसलेली जमीन पेरणीलायक नाही, वाफ आली नाही तरीही ही धूळपेरणी केली जाते. सारे बियाणे मातीत मरून जाते, पेरणाऱ्यालाही सर्जक मरणाची ओढ असते. पुढे दुबारपेरणी, पुन्हा स्वप्नभंग या निरंतर हमखास मरणसावलीत शेतकरी वावरत, खुरडत आणि सरपटत राहतो. शेतकऱ्यांच्या सरपटण्याशी, अडखळण्याशी, कोसळून पडण्याशी या कवीच्या निष्ठा बांधलेल्या आहेत. शेतकीतल्या माणसाला निष्ठारंग सहज बदलता येत नाहीत. 'माती असशी मातीत मिळशी' हे ते भागध्येय असते. ही शेतीनिष्ठा शेतकऱ्याला कशीबशी जगवू पाहते. या कवितांमधली कृषिनिष्ठा म्हणूनच महत्त्वाची आहे. शेतीतून बाहेर पडणेही अशक्य असते. सतरा वाटा चोखाळूनही पुन्हा मातीतच कोसळणे अटळ ठरते.**

पाऊसपाणी-हवामान-हंगाम आणि शेतकरी सारेच नियतीशरण आहेत, असतील. उत्पादक शेतजमिनीचे प्रमाण दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. भावाभावांमध्ये वाटण्या होणेही अगत्याचे आहे. 'परवडत नाही, तोट्यात आहे, दुबारपेरणी भाव कोसळणं, गेलं वाया गेलं सारं' हे शब्दबंध थोरेंच्या परिसरात 'कळीचे शब्द' आहेत. या अशा काल अवकाशात दुष्काळाचे संकट झेलणारे नियतीशरण शेतकरी जगतात म्हणजे मरत राहतात. तरीही या कवितांच्या अर्पणपत्रिकेत माळ-रान, चूल आणि नांगर आहे. ही केवळ प्रतीकरूपे नाहीत, जगण्याची जिवंत स्मारके आहेत. इकडच्या जगण्यात ही स्मारके बदलणारी नाहीत, फार 'रूपके-प्रतीके' यांची दाखवेगिरी नाही. 'परदु:ख शीतल' अशी भावना या कवितांमध्ये नाही. जगण्याला-मरण्याला-वेदनेला-प्रेमभावनेला-स्वप्नमग्नतेला शब्दरूप थोरेंनी दिले आहे.

'धूळपेरणी' हा शोकात्मिकेचा प्रारंभ असतो. नैराश्यात आशेचे चार थेंब शोधण्याचे स्वप्न असते. ओढ दिलेला पाऊस येईल, असा भरवसा असतो. स्वप्नभंगही अटळ, पाऊस येत नाही. कुठे कुठे आवई असते, शिंतोडे असतात. ओल नसलेली जमीन पेरणीलायक नाही, वाफ आली नाही तरीही ही धूळपेरणी केली जाते. सारे बियाणे मातीत मरून जाते, पेरणाऱ्यालाही सर्जक मरणाची ओढ असते. पुढे दुबारपेरणी, पुन्हा स्वप्नभंग या निरंतर हमखास मरणसावलीत शेतकरी वावरत, खुरडत आणि सरपटत राहतो. शेतकऱ्यांच्या सरपटण्याशी, अडखळण्याशी, कोसळून पडण्याशी या कवीच्या निष्ठा बांधलेल्या आहेत. शेतकीतल्या माणसाला निष्ठारंग सहज बदलता येत नाहीत. 'माती असशी मातीत मिळशी' हे ते भागध्येय असते. ही शेतीनिष्ठा शेतकऱ्याला कशीबशी जगवू पाहते. या कवितांमधली कृषिनिष्ठा म्हणूनच महत्त्वाची आहे. शेतीतून बाहेर पडणेही अशक्य असते. सतरा वाटा चोखाळूनही पुन्हा मातीतच कोसळणे अटळ ठरते. या कोसळणीला सौम्य करून घेताना येथील निवेदक म्हणतो,

*धूळपेरा उसवता*
*गेले काळजाला चरे*
*कुणी गोजीऱ्या मोराचे*
*पाय खुडले नाचरे* (पृ.११)

हा नाचरा 'मोर' धूळपेऱ्यात म्हणूनच पोहचला आहे. त्याचे पाय मात्र 'खुडलेले' असतात. 'आनंद-स्वप्न-आशा, रंग-सौंदर्य' सारे अनपेक्षितपणे कोसळून जातात. शेतकऱ्यांनी पाहिलेले आशारंग पावसाने ओढ दिल्याने मावळत जातात. दुबारपेरणीचे हे संकट 'धूळपेरा उसवता' या पहिल्या कवितेतून गडद दु:ख बनले आहे.

*ओलावल्या मातीनेच*
*रुजायचा दिला लळा*
*भोगताना दु:ख नवे*
*मातीलाच पुन्हा कळा* (पृ.१२ )

मातीतली ओल, रुजणे, कळा' हे शब्दबंध मातीच्या सर्जनक्षमतेचे द्योतक आहेत. दुबार पेरणी, पुन्हा नांगरणी, पुन्हा पेरणी हे दुष्टचक्र आहे. पुन्हा पुन्हा मातीची ओल स्मरणे हे हाती उरते. ही ओळ स्वप्न आशा घेऊन येते. मातीलाच पुन्हा 'जीवनकळा' भोगाव्या लागतात. जन्मकळांशिवाय जन्म नाही. शेतीशी समर्पण भाव असणाऱ्या या शेतीबद्दलच्या आत्मीयतेतून उद्भवलेल्या कळा शेतकीतल्या माणसांना बरोबर कळतात. पीकपाणी भरघोस आल्याचा आनंदक्षण 'गोकुळची झाला मळा' या कवितेत आला आहे. गोकुळातला नंदराजा (पांभरीच्या तासामंदी बखर लिहितो), यशोदा माता (माती जोजवते), काळा कृष्ण (माती), कृष्णाच्या दागिन्यांचे मोरपीस (पीक), कृष्णाचा मुगुट (कणीस), राधा पिकापिकातली कवळी दुपार), सत्यभामा (बांधावरची भांडणारी सावली), गोकुळ (गुराढोरांचे हंबर), ही शेतकीची मिथक कथा म्हणून मांडली आहे. मळा हेच गोकुळ मानणारी नांगरसंस्कृती अशा तऱ्हेने कृष्णकथा अर्थसमक्षता निर्माण करते. नांगरणी, वखरणी, पेरणी, मातीची जोजवणी, पीकनिर्मिती, कणीसधारिणी अशा शेतकीतल्या क्रियांमधून पिकांचे, मळ्यांचे, गुराढोरांचे, पक्ष्यांचे गोकुळ अवतरते.

*देही पडीक रानाच्या*
*संग नांगरानं केला*
*माझ्या मुक्या वावरानं*
*जन्म ढेकळाला दिला* (पृ.१३)

असे या कवितेचे प्रारंभीचे कथन आहे. कृष्णजन्माने कथेचा, प्रारंभ झाला आहे. शेतजमीन आणि नांगर यांच्या संगाने, संगराने ढेकूळ जन्मले! 'काळ्या कृष्णावाणी माती' असे जेव्हा हा निवेदक सांगतो तेव्हा माती हे कृष्णरूप मानल्याचे दिसते. 'काळीमाती' हीच केंद्रवर्ती आहे. कृष्णकथेतले मुख्य पात्र कृष्ण होय. कृष्णकृती (मातीचा सर्जनोत्सव) ही मळा फुलवण्याची साफल्याची शेतकीतली केंद्रवर्ती कृती ठरते. कृष्णाचे सर्वच कुटुंबीय गोकुळवासी लोक येथे शेतकीतल्या कृती करतात, शेतकऱ्यांचे भक्तिकेंद्र 'माती' हेच आहे. गोकुळ आनंदाने नांदते, ते चांगले पीकपाणी आल्यावरच!

आपल्या या कवितांना निवेदकाने 'कुणब्याचे दोहे' असे संबोधले आहे. कुणब्याच्या दोह्यांमध्ये (पृ.१५) कुणबिकीतले कष्ट-दुःखं-संकटे मांडली आहेत. 'हरवल्या माणसांची, घरे उपाशी तापाशी /माया आटल्या शब्दांनी, पोरं बोलती बापाशी /उसवली नातीगोती कसं जमेल सांधणं...' शेतीतले दुष्काळ अपार कष्ट, नापिकी यामुळे आज कुणब्यांच्या घरांची, नात्यांची, संवाद शक्यतांची नासधूस झाली आहे. दुःखं, दैन्य- दारिद्र्य यांचेच गावगाड्यात दर्शन घडते. मरण सुरू आहे. कुणब्याच्या दोह्यांमध्ये मरणाच्या अभिव्यक्तीबरोबरच आशेचे किरणही अभिव्यक्त होतात. कुणब्याला शेतीतून उपटून टाकता येणार नाही(?) कुणबी चिवट जीवनाशा नशीब, निसर्ग यांच्यावर अवलंबून आहे. चांगले दिवस येतील, असे कुणब्यालाही वाटत असते. गावगाड्याची वाताहत प्रारंभी सांगूनही अखेरीस हा निवेदक सांगतो,

*सोस जगण्याचा सारा*
*नशिबाच्या केला नावे*
*येत्या हर दिवसाचे*
*दोहे कुणब्याने गावे*
*भाळी लावल्या मातीला*
*कधी फुटेल चांदणं* (पृ.१५ )

मरणाने सुरुवात होऊनही अखेरीस आशेचे चांदणे (पीकपाणी) कुणब्याला जगायला बळ देत असते.

'बांधावरचा देव' ही एक आशेची दिशा परिस्थितीमुळे उद्भवत असते. 'बांधावरचे देव पूजून/मालाला भाव नाही मिळत' (पृ.१८) किंवा पैशाशिवाय बांधावरचं/देवसुद्धा पावतं' (पृ.२०) अशी द्विधा मनस्थिती निवेदक प्राक्त करतो. भाव पडणे, विहीर आटणे, कष्ट वाया जाणे, पीक जळून जाणे अशा घटनांना वारंवार सामोरे जावे लागते. म्हणूनच 'कुठल्या जन्माचं / सुतक पडलंय या शेतावं' (पृ.२४) असे मरणाचे दिवस त्याच्या वाट्याला येतात. शेतकरी कायमच सुतकात असतात, असे सुचवायचे आहे. 'आखरीला मातीच पुन्हा यार झाली' 'उगण्याच्या आशेपोटी? मातीत खोल रुजावे' ही बाह्य परिस्थिती शेतीवरील निष्ठेशिवाय दुसरे काही करू देत नाही. 'तूच विठ्ठला येऊन /पेर मातीत सपान /तुझ्या कृपेचं असू दे / माझ्या बांदावं कुपान' माती आणि मातीचा विठ्ठल, मातीचा कृष्ण अशी मातीची ओढ या कवितांच्या आशयसूत्रांमध्ये मध्यवर्ती स्थान मिळवून आहे.

'गणगोत' या भागातील कविता खेड्यातील कौटुंबिक नात्यातले चढउतार, लिप्तता व दूरता, प्रेम आदींच्या वास्तवाचे चित्रण करणाऱ्या आहेत. बदलत्या जीवनवास्तवात आपलेपणाचे सोंग आणावे लागते, ही जाणीव 'सोंग' (पृ.३५) या कवितेत आहे. 'सख्ख्या भावाशी आपलेपणाचं सोंग वठवताना / मात्र जीवावर येतंय' हे उघडपणे निवेदक सांगतो. कुटुंबाचे विभक्तीकरण वाढले, शेतीचे तुकडीकरण वाढले, दुष्काळाचे संकट आकृत होऊ लागले, सारेच मेटाकुटीला आल्याने नात्यांमध्ये 'सोंग-ढोंग-बनाव' शिरल्याचे भावप्रत्ययी आविष्करण येथे झाले आहे. आईबद्दलचा जिव्हाळा, आईने केलेले कष्ट, आईने तोलून धरलेला शेतीप्रपंचाचा डोलारा वगैरे परंपरागत मातृत्वाचे सांगणे 'माय', 'शीव', मायची प्रयोगशाळा', 'ममतेची ओल', या कवितांमध्ये आले आहे. मातेबद्दलचा जिव्हाळा, कृतज्ञताभाव चिरंतनतेने टिकून आहे, असे विधान करता येईल. मातेबद्दलचे उल्लेख करुणास्तोत्रासारखे आहेत. 'मी शोधीत राहिलो मायची प्रयोगशाळा / कवितेत' अशा तऱ्हेची मातृप्रतिमा येथे प्रतीत होते. 'लेक' या कवितेत 'मुलगी' या नात्याचे, स्त्री अस्तित्वाचे महत्त्व सांगितले आहे. लेक दावणीची गाय, टाहो दुःखाचा फोडते, संसाराच्या गोठ्यामधी/तिचं गोठतया जिणं, भेगाळल्या भुईवाणी / तिचं काळीज फाटतं..' असे लेक या नात्याचे चित्रण आले आहे.

*जरी संसार विस्तव*
*लेक सरपण नाही*
*लेकी वाचून घराला*
*बाप्पा घरपण नाही* (पृ.४६)

अशी घरपण देणारी 'लेक'ही निवेदकाच्या चिंतनात गेयता आणते. संसार-विस्तव, लेक सरपण (नाही) लेक = घरपण अशी सोपी रूपकात्मकता आशयसंपन्नता वाढवते. अर्थसुलभ रूपकप्रक्रिया हे थोरे यांच्या कवितेचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

नात्यातील जवळीक आणि दूरता यांमध्ये अस्थैर्य असल्याची जाणीवही 'आस' (पृ.४८) या कवितेत आली आहे. नातीनिर्मिती ही सामाजिक सांस्कृतिक घटना आहे. माणसाला भावनिक गरज म्हणून नाती निर्मावी लागतात. 'तू समजून घे ना आस मनाची वेडी / तट तुटल्यावरती का मुका नावाडी' असे जेव्हा निवेदक 'मी' सांगतो तेव्हा आशा - निराशा एकत्र अवतरतात. तट तुटला तरीही आपले बंध, भावबंध कायम असल्याचे त्याला सुचवायचे आहे. नाती निर्माण होऊनही संबंधविच्छेदाचे क्षण येऊ शकतात, अस्वस्थतेचे हे कारण आहे.

'स्पर्शलिपी; या भागातल्या कविता प्रेम-विरह, स्पर्श-आतुरता, कामभावाचे आकर्षण या विषयसूत्रांचे अनुसरण करणाऱ्या स्वप्नरंजनात्मक कविता आहेत. 'अधरावरच्या / रेशमी कळाही /हृदयामध्ये येणे / रोवित जखमा/ क्षणाक्षणाला / शब्दांतून सांडत जाणे' (पृ.५१) किंवा 'आपुल्याचसाठी /गातसे साजण/ रिकामी घागर/उपाशी रांजण' अशी मिलन संकेत कविता येथे भेटते. राघू मैना, डोईच्या येणीत गंध मोगऱ्याचा भारी, पाखरांच्या चोचीत प्रीतीची गाणी, सये पाझरतो माठ, विरहाच्या लाख वेणा, चांदण्यांनी सजलेला फड, हुंदक्याला ऊत, देह झाला चंदनाचा/ अंग मिठीनं वेढता ... या तऱ्हेची शब्दजुळणी प्रेमभावातली शृंगारमनस्कता प्रकट करणारी आहे. स्त्री-पुरुषातले आदिम आकर्षण  स्वप्नरंजकतेतून उद्भवले आहे. सामान्यत: प्रेमगीते, विरहगीते आणि क्वचित लावण्यांची शब्दकळा पांघरलेल्या कविता 'स्पर्शलिपीमध्ये येतात. 'गर्भकात', 'स्पर्शलिपी', 'रांजण' या कवितांमध्ये सौंदर्यवादी संवेदनशीलतेचा प्रत्यय येतो. परंपरागत शब्दसंकेतांची आळवणीही होते.

रंगांचे आकर्षण ही स्वप्नरम्यतेची ओळख असते. 'हिरवं भय' (पृ.५५) या कवितेत पान, रान, मन, गाणं, शेला, नभ, बोल, देह, वय हे सारेच हिरवे आहेत. वस्तू, भावस्थिती, सामान्यनामे, यांच्यासाठी 'हिरवे' हे रंगविशेषण वापरले आहे शेतकीशी संबंधित 'हिरवे' हे रंगविशेषण उचित आणि आनंददायकही ठरते; परंतु 'भय' या भावनेसाठी 'हिरवे' हे विशेषण आल्याबरोबर अर्थविस्ताराच्या, अर्थसंदिग्धतेच्या शक्यता वाढल्या आहेत. 'हिरव्या देहाला / हिरवं भय' असा धक्कादायक शेवट या कवितेचा आहे. स्त्रीरूप किंवा शेती किंवा शेतकरी निवेदक या साऱ्यांचे स्वप्न हिरवेपणाचे आकर्षण असते, असावेही. 'देह' हिरवा हा बहराचा, पीक संपन्नतेचा अनुभव आहे. मात्र अगदी लहानसे संकट (गारपीट, पावसाने ओढ देणे, अतिवृष्टी होणे, भाव पडणे, किडीचा प्रादुर्भाव होणे, पीक वाया जाणे, फलधारणा न होणे अशी किती तरी संकटे ) हिरव्याचा नायनाट करणार. भय आहे ते हिरवेपणा धोक्यात येण्याचे! शेतकरी निवेदकाचे हिरवे स्वप्न भंग पावले, तर पान, रान, मन, गाणं, बोलकथा, आसमंत सारेच धोक्यात येते. सुखद असे काही शेतकऱ्याच्या जगण्यात घडले; तर पुढच्या क्षणी परिस्थिती बिघडली जाऊ शकते. स्वप्नभंग, नैराश्य, दुरावा, दु:ख यांचे रंग केव्हा विकार घडवतील हे सांगता येत नाही, आणि म्हणूनच पुढील ओळींप्रमाणे स्वप्न गुंफावे लागते. 'रंग रातीचा रानात बाई सांडला सावळा', 'चांदण्यांनी सजलेला फड इष्काचा पांगळा', 'टाकू लागला उसासा फांद्याफांद्यातून वारा', 'डोळा साठवून घ्यावा सारा चैतन्य सोहळा' (रंग रातीचा रानात / पृ.६०) ही स्वप्नावस्था कल्पिततली सुंदर उभारणी असते. चटक्याच्या भयाने शीतलतेचे कल्पित, आभास उभारावे लागतात. ही धारणा या कवितांमध्ये दिसते. 'संभोग शिल्प, हिरवं गर्भारपण, हवेली-नवेली, थेंबांचा साज, नाचरा मनमोर, जळतोय चांद, पाखरांच्या चोचीतली प्रीतीची गाणी, गंध मोगऱ्याचा, ऋतूंचा महिना' इत्यादी ही भावी दु:खासाठी किंवा वर्तमान वेदनांसाठी स्वप्नरंजकतेचे काम करतात. अभावातून स्वप्नाची कल्पिते रचली जातात. अभाव व्यथा या निरंतर वस्तुस्थितीपासूनचा दुरावा मानवी मनाला आवश्यकही असतो. लौकिकातले अपेक्षाभंग, अलौकिक स्वप्नसृष्टी-साहित्यसृष्टी भरून काढतात. मानसिक पातळीवरचे किंवा भौतिक व्यवहारातले दु:ख, हानी यांची नुकसानभरपाई स्वप्ने-कल्पिते-फँटसी-अद्भुतता यांना करावी लागते. तीच प्रक्रिया स्वप्नरंजकतेचा प्रत्यय देणाऱ्या कवितांमधून घडते आहे.

आत्मपर चिंतनात्मकता हे एक या कवितांचे वैशिष्ट्य आहे. स्व आणि सभोवताल यांच्यातील संबंधांचे चित्रण त्यातून उद्भवले आहे. 'भयमुद्रा' (पृ.७१) या कवितेतील उपरोध कल्पकता पूर्ण आहे. काचेच्या पेटीत बंदिस्त असलेले, मासे बंदिस्तपण लादणाऱ्या माणसाकडे पाहत आहे, अशी कल्पना केली आहे.

*मासे कळपाने*
*पाहत असतात फक्त*
*काचेतून डोकावणारा*
*खलनायकी मानसी चेहरा*
*अन त्याच्या हातातला फ्राय केलेला फिश*
(पृ.७१)

मानवी समष्टीचा भयानक चेहरा येथे उपरोधातून चिरफाडला आहे. जीवांविषयीची मानवी दृष्टी असहिष्णूतेची आहे. विवेक हरवलेल्या समष्टीचा कळप हिंसक आणि पाशवी बनतो, 'करमणूक-मजा-सुख-चैन' म्हणून हिंसाचार

घडवून आणतो. काचपेटीतल्या माशाला फ्राय केलेला मासाही दिसत आहे. 'हिंसा-स्वातंत्र्य हिरावून घेणे' या अमानुष कृती माणसांचा कळप घडवून आणत आहेत. यासाठीची रूपकप्रक्रिया कल्पकतापूर्ण अशीच आहे.

'वारकरी' या कवितेतील प्रतिमासृष्टी पाहा. पाऊस = लाघवी, दिंडी = मनाची, पावसाची सर = अभंग, विठ्ठल = उगवता कोंब, रखुमाई = शालू हिरवा, देह = पंढरीचा पूर, संत = वारकरी (पृ.७२). शेतकीतली क्रिया आणि वारकरी जीवनशैली यातील अद्वैत या रूपकप्रक्रियेत आहे.

महाभारतकालीन सांस्कृतिक परिस्थितीचे आधुनिक काळातले विरुपीकरण उपरोधाने मांडले आहे.('महाभारत ते महान भारत'/पृ.८७)

उदा. कृष्ण पाकीटमार बनतो, सुदाम्या पोह्यांचा धंदा करतो, मिल्ट्री भरतीसाठी भीम जिमला जातो, द्रोणाचार्य एकलव्याची आठवण म्हणून थम्सअप पितो... आजचा महान भारत हास्यास्पद वर्तन करीत असल्याचे हा निवेदक दाखवतो. सांस्कृतिक अवकळा दर्शविणारी 'तेव्हा आणि आता' असा विरोधाभास येथे आहे. येथील निवेदक कवितेची शक्ती मात्र सुचवतो.

*कृष्णा तू अर्जुनाला गीता सांगितलीस*
*आणि महाभारत झालं*
*आता मी अभिमन्यूला सांगेन कविता*
*आणि महान भारत होईल*
*जशी महाभारतासाठी गीतेची*
*तशी महान भारतासाठी कवितेची*
*कालातीत गरज आहे!* ( पृ.८९)

बुवाबाजी, थोतांड, गंगेचे अशुद्धीकरण, वाटमारी, बाजारूपणा, स्त्रीलंपटपणा, अपहरण, स्वार्थप्रणित निष्ठाप्रदर्शन, जुगारीवृत्ती, चंगळ, शोषणाची नवी तंत्रे वापरणे, अनुदानावर अवलंबित्व, असे सामाजिक-सांस्कृतिक विकार वर्तमान भारतात घडत आहेत. विकारी-अविचारी जीवनपद्धती आचरणव्यवहार सुधारल्याशिवाय, बदलल्याशिवाय 'महान भारत' अस्तित्वात येणार नाही. 'मेरा भारत महान', 'महासत्ता' अशी आत्मसंतुष्ट उद्घोषणा होण्याच्या काळात, वातावरणात ही कविता अवतरली आहे. खुल्या अर्थव्यवस्थेबरोबर मोठी स्वप्ने, आशा आल्या, घसरण मात्र सुरू राहिली. येथे अर्जुनाची गीता = कविता असे काळानुरूप स्थानांतर हा कवी अपेक्षितो. सामाजिक-सांस्कृतिक आणि राष्ट्रीय जीवनशुद्धीसाठी 'कविता' हे विचार-विवेक यांचे शस्त्र होऊ शकेल, असे कवीला वाटते. समकालीन कवितेची क्षमता शक्ती-सत्ता या कवीला निर्देशित करायची आहे. गीता तत्त्वज्ञान कविता या साहित्यप्रकाराशी जुळून एकप्रकारे या साहित्यप्रकाराचे माहात्म्य प्रस्थापित होत आहे. संवेदना, भावना यांची जागृती हा कवितेचा परिणामकारक घटक असतो. कविता या साहित्य प्रकाराची निर्मिती या संवेदना जागृती प्रेरणेतून होत असते. ही कवीची धारणा आहे. प्रारंभी हे महाभारताचे सामान्य विडंबन वाटते मात्र अखेरीस गीतातत्त्वज्ञानाशी समकालीन कवित्वाचे अनुबंध प्रस्थापित केल्यामुळे आशयसूचकता वाढली आहे. 'नाती' (पृ.९३) या कवितेतही 'कवितेच्या ओळीतला थोडा गारवा जीवाला' हा उल्लेख कवितेची प्रेरकता विस्रब्धभावस्थितीची पूर्ती दर्शविते.

सामाजिक-सांस्कृतिक जीवनातील विसंगतीचा उपरोधाने वेध घेणाऱ्या काही कविता येथे आहेत, सामाजिक, राजकीय जीवनातील मूल्यभ्रष्टता 'हायटेक' (पृ.९२) या कवितेत आहे. 'निवडणुकीच्या भाद्रपदाशिवाय / उमेदवार काही फळत नाही' असा उथळपणा येथे दिसतो, अर्थात हा करमणुकीचा सूर असावा.

*नाव गाव हरवलंय शहर*
*पोस्टमन भांबावलाय*
*माणसं आउट ऑफ रेंज*
*व्हायरसने इमेल थांबवलाय* (पृ.८६)

अशी काव्यभाषेतली जबरी घुसखोरी वृत्तीगांभीर्याचा प्रश्न निर्माण करते. खेड्यातल्या परिवर्तनाला-अवकळेला भावुक प्रतिसादही काही कवितांमध्ये आहे. बदलाने गावाचा गळा आवळला गेल्याने बदलाच्या नावाने गळा काढावा लागणे अशी स्थिती काही कवितांमध्ये आहे.

अष्टाक्षरी, गजल, गीत, भावगीत, मुक्तछंदात्मक रचना अशी नादलयींची विविधता या कवितांमध्ये आहे. अभंगरचनांमधील उपरोधात्मकता-सामाजिकता अत्यंत काव्यात्मक बनल्या आहेत.

विष्णू थोरे यांच्या कविता खेड्याच्या शेतीच्या आणि दुखावलेल्या स्वप्नोत्सुक माणसांच्या कविता आहेत. हळूहळू त्या इप्सिताच्या पूर्तीकडे वाढत, विकसत जात आहेत. अनुभवविश्वातले वैविध्यही या कवितांचे एक लक्ष्य असणार आहेत. त्यांना त्यांची बोली-बोल सापडत आहेत.

*चिमण्या दाणे खुडून गेल्या तरी*
*जागा सोडत नाहीत कणसं ...!*

हा माती-कणसांशी-चिमण्या-माणसांशी साधलेला भावप्रत्ययक्षम संवाद आहे. आपल्या अस्तित्वरूपाशी जाणिवांशी-विवेकनिष्ठांशी प्रामाणिक राहण्याची भूमिकाही महत्त्वाची आहे.

●

# कविताच...माझी कबर अस्वस्थतेची बखर

पुस्तक परीक्षण

मारुती कटकधोंड

**त्यांच्या छातीत समाजव्यवस्थेच्या चिडीचा बारूद ठासून भरलेला आहे. नुसता भरलेला नसून ते त्याची वातही लावतात आणि शब्दांच्या कळांनी ठिणग्याही पेटवितात. आपण येणाऱ्या भावी पिढीसाठी कोणती परिभाषा देणार आहोत हा यक्षप्रश्नही ते ताकदीने मांडतात. अशा प्रश्नांच्या कोषात वाचकांना गुरफटून ठेवतात. कवीला उद्याची चिंता भेडसावत आहे. 'आवाज न करता जग नष्ट होईल हे कुणाच्या लक्षातही येणार नाही' जीवन चोहोबाजूने बंदिस्त असताना आपण मोकळा श्वासही घेऊ शकत नाही. शोषण, संताप, दुःख, अन्याय अधिक गहिरे होतात, अस्वस्थता वाढते आणि शब्दांचा स्फोट होतो.**

आजूबाजूची भयावह परिस्थिती आणि मनातील घुसमट यांचा सुंदर मिलाप झाला की, संवेदनशील कविता जन्म घेते. विदारक घटनेचा हात धरून थेट वाचकांच्या मनाचा ठाव घेऊन आरपार घुसते, सत्य नग्नतेचा निखारा काळजावर ठेवण्याचे धाडस करत संवेदनशील कवी संजय चौधरी यांनी प्रगल्भतेने 'कविताच... माझी कबर' या काव्यसंग्रहात कवितेला उत्कटतेने उतरविले आहे. संजय चौधरी आता साहित्यविश्वात अधोरेखित झालेले कवी आहेत. या काव्यसंग्रहाला प्रतिष्ठित, नामवंत असे साहित्यिक पुरस्कार लाभले आहेत व सध्या मिळत आहेत. हे या काव्यसंग्रहाचे यश आहे. या काव्यसंग्रहाला पाठराखण ज्येष्ठ साहित्यिक मा. वसंत आबाजी डहाके यांची लाभली आहे. कविता ही नुसती अलंकारिक शब्दकळा नव्हे. ती एक उत्कट भावनेचा आविष्कार असते. बेचैनता हा कवितेचा आत्मा असतो. जसे लाव्हारसाला सांगावे लागत नाही, की तू धरती दुभंगून बाहेर ये, तसे संजय चौधरींना सांगावे लागत नाही. त्यांच्या मनात अस्वस्थतेची घालमेल चालू असते. त्याचा प्रत्यय या काव्यसंग्रहातील पानावर ठायी ठायी दिसून येतो. प्रखर सामाजिक जाणिवेची, भयरसयुक्त, पर दुःखाबद्दल कळवळा कवितेतून प्रगट होतो. बारा आयामांमध्ये एकशे दोन कवितांचा दरवळ दरवळत आहे.

आयाम एक ''हरवलेल्या माणसांच्या कवितांच्या'' अंतर्गत ''वाट पाहणारं कुणी नसेल तर, घर काय आणि स्मशान काय, काय फरक पडतो'' ही कविता चटका लावून जाते, आणि भयावह कळ काळजात उठवते. आपल्या सुखासीन जगण्याच्या पलीकडे एक जग असतं हे पाहण्याची दृष्टी क्षीण झाली की, आपला वर्तमान जळत राहतो याची जाण कवीला आहे. 'प्रत्येकाच्या छातीत दुःखाचंच बाड' या आयाम दोनमधील कविता याची साक्ष देतात.

*'जीव आधीच*
*जगण्याच्या उन्हानं कडबा झालेला*
*ज्वाळा दिसत नाहीत*
*नुसता होरपळत राहतो*
*झळा लागू नयेत म्हणून*
*सारे जवळचे दूर गेलेले'*

मन चिरत जाणारं सत्य येथे प्रत्येकाचे जगणेच अंगाभोवती कडबा पेटलेल्या गंजीसारखे आहे. आपलेसुद्धा दूर जातात तेव्हा आपण होरपळत जळत जातो; पण ज्वाळा दिसत नाहीत. नुसता धूरच धूर, कवीने नेमक्या शब्दांत व्यक्त केलेली ही रचना, आयाम तीनमध्ये 'जमत नाही माझे... माझ्याशीच'मध्ये कवीचे वारुळासम विदारक प्रश्न जेव्हा वाढत जातात तेव्हा कवी दुःख उपसून थकून जातो. माणसांच्या आसवांत कवी बुडून जातो. हतबल होतो, तरी तो आसवांवर प्रेम करतो. मी कोण

आहे याची झूल उतरवून समाजाचं प्रतिनिधित्व करतो तेव्हा कवीचे शब्द दंभाविरुद्ध जाळ लावतात. कवीला प्रश्न पडतात, हेच या काव्यसंग्रहाचा जिवंतपणा आहे. कवी अंधाराची, वेदनेची वाट तुडवितो. गडद अंधारात वीज चमकून जावी आणि तेवढ्या क्षणभर उजेडानी आपणास पुढची वाट डोळ्यात दिसावी तसे कवी समाजाचे दुःख, पीडा, यातना घेऊन प्रवास करतो. त्या प्रवासात आपलं काहीतरी हरवले आहे. ही जाणीव ठेवून कवी संजय चौधरी यांची नजर शोधत राहते, अंधार टिपत राहते. कवीला काळाचे बंधन नाही. म्हणूनच त्यांच्या कविता तिन्ही काळात ताज्या टवटवीत वाटतात म्हणून त्या चिरंतन आहेत.



**'कविताच... माझी कबर'**
**संजय चौधरी**
**ग्रंथाली प्रकाशन, मुंबई**
**पृष्ठसंख्या १४७,**
**मूल्य १५० रु.**

त्यांच्या कविता समाजाच्या दुखऱ्या भागाच्या जखमेवरील झाडपाला आहेत. जखम भरली तरी ती काळाच्या पुढेही ठसठसत राहते. हे ठसठसणंच वाचकांना जागृत करतं. वाचकांना सलत ठेवणं हेच या कवीचं यश आहे. अल्पाक्षरी रचना हा कवीच्या प्रतिभेचा आविष्कार आहे. हाच त्यांचा ठेवा आहे. आयामाच्या सुरुवातीच्या चार ओळी बाराही आयामामध्ये आपणांस बांधून ठेवतात. आयाम पाच, सहा, आठ या अंतर्गत याचा प्रत्यय येतो ते म्हणतात, 'मिठाईची दुकानं कशाला सजवतात... या रस्त्यानं गरिबांची मुलेही शाळेत जातात' हे निरीक्षणही वाचकांना ओरबडा आणतात. 'जीभ' पदोपदी अडचणीत आणणारा एक अवयव वापरावा तरी समस्या न वापरावा तरी...' 'माझं नाव उद्या कधी एखाद्या रस्त्याला द्यायचं झालंच तर, स्मशानाकडे जाणाऱ्या रस्त्याला द्या' अशी मागणी करणारा कवी चटक आणि चटका लावतो. त्यांच्या छातीत समाजव्यवस्थेच्या चिडीचा बारूद ठासून भरलेला आहे. नुसता भरलेला नसून ते त्याची वातही लावतात आणि शब्दांच्या कळांनी ठिणग्याही पेटवितात. आपण येणाऱ्या भावी पिढीसाठी कोणती परिभाषा देणार आहोत हा यक्षप्रश्नही ते ताकदीने मांडतात. अशा प्रश्नांच्या कोषात वाचकांना गुरफटून ठेवतात. कवीला उद्याची चिंता भेडसावत आहे. 'आवाज न करता जग नष्ट होईल हे कुणाच्या लक्षातही येणार नाही' जीवन चोहोबाजूने बंदिस्त असताना आपण मोकळा श्वासही घेऊ शकत नाही. शोषण, संताप, दुःख, अन्याय अधिक गहिरे होतात, अस्वस्थता वाढते आणि शब्दांचा स्फोट होतो.

आयाम अकरामध्ये कवीची तगमग जाणवते 'कविता येते मला शोधत' या कवितेच्या अंतर्गत 'ज्याचं हृदय करुणेने भरलेले असते तेथेच कवितेचं बीज रुजते', संजय चौधरी यांचे डोळे कायम ओले असतात. ते या कवितेतून अधिक स्पष्ट होते.

*'दुखत राहते मन*
*कण्हत राहते रात्र रात्र*
*आणि ठणकत राहते कविता*
*काळजातला काटा होऊन'*

संजय चौधरी यांचे जगणे आणि कविता या वेगळ्या करता येत नाही. स्वतःचे जगणे, भावविश्व आणि विश्वाचे जगणे संवेदनशीलतेने उतरते. माणसांच्या जगण्याभोवती फिरणारी त्यांची कविता आपली होऊन जाते. जे दिसते ते त्यांची पूजा करतात, जे दिसत नाही त्यांच्या पाठीमागे धावत नाही. हेच सत्य आहे मानणारे कवी रंजकतेत रमत नाहीत. म्हणूनच त्यांच्या कविता काळही पुसणार नाही. वास्तवाचा विस्तव होऊन त्या आज, उद्या आणि परवा वाचकांना चटका देत राहतील.

कवी अंततः पसायदानाची आळवणी करताना म्हणतात, 'कविता अंतरातून उमलणारा... सच्चा स्वर

*खोदून पहाल माझी कोणतीही कविता तर*
*आत मीच निजलेला*
*कविताच... माझी कबर'*

कवीच्या मनातील अस्वस्थ द्वंद्वं शब्दरूपाने कागदावर उतरतात तेव्हा भीषणता जाणवते. कवी आपल्या जगण्याची भाषा बोलतो. त्यांची भाषा साधी, सरळ, थेट आपल्याला भिडणारी आहे. वास्तववादी कविता वाचकांना अंतर्मुख करतात. काव्यसंग्रहातील कोणतीही कविता कोठूनही वाचू शकता. ती आपलीच वाटेल कारण प्रत्येक कविता आपल्या जगण्याची बोली बोलत आपला सल उघड करते. प्रवाही करते. आपल्या मनातील प्रश्नांना पेटवून सलत ठेवते.

ग्रंथाली प्रकाशनाने आपली परंपरा उन्नत करत एक दर्जेदार, सकस, आशयसंपन्न काव्यसंग्रह साहित्य दरबारात दाखल केला आहे. त्याचे चर्चात्मक स्वागत होईल, हा माझा विश्वास आहे. मुखपृष्ठाची गूढता अंतरंगातील उत्कंठा वाढविते.

कवी संजय चौधरी सरांना, त्यांच्या या काव्यकृतीला मनःपूर्वक शुभेच्छा!

●

लेख

**शिरीष गंधे**

# अनंत फंदी आणि समकालीन इतर प्रांतीय कवी

**पेशवाईतील प्रख्यात शाहीर अनंत फंदी संगमनेर, यांच्या द्विशताब्दी स्मृतिवर्षाची सांगता दि.१४ नोव्हेंबर २०१९ला झाली. याचे स्मरण म्हणून हा विशेष लेख.**

अनंत फंदी यांची प्रतिभा ज्या काळात बहरत होती, ज्या काळात त्यांचा भवताल आणि त्याचे प्रतिबिंब त्यांच्या रचनेतून आकारास येत होते, त्याच वेळी इतर प्रांतातील साहित्य निर्मिती आणि साहित्य व्यवहार कसा होता, इतर प्रांतीय कवींच्या रचना आणि फंदींच्या रचनेत काही साम्यस्थळे आढळतात काय? याचा शोध आता घेऊ.

बंगालमधील साहित्याचा विचार करता, ऐतिहासिक काव्यामध्ये सर्वांत नावाजलेले (साहित्यिक दृष्टीने अगदी क्षुल्लक असूनही) काव्य म्हणजे गंगारामाचे (दत्त?) महाराष्ट्र पुराण हे शीर्षक फार बडेजावी असले तरी काव्य मात्र अगदी लहान म्हणजे दोनशेपेक्षा कमी ओळींचे आहे. त्यात मराठा सरदार भास्कर पंडित याने पश्चिम बंगालवर केलेल्या हल्ल्याचे वर्णन केलेले आहे. त्यात शेवटी भास्कर पंडिताचा खून होतो. ही घटना लेखक जिवंत असताना घडलेली असावी व कदाचित लेखकाने स्वतःच्या डोळ्यांनी बघितलेली असावी. ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने गंगारामाच्या काव्याला थोडेफार मोल आहे.

राधामोहन याने रस्त्याचे गाणे (song of the road) लिहिले आहे. वॉरन हेस्टिंग्जने पश्चिमेकडे म्हणजे सालकिया ते चंडाल गड असा रस्ता बांधावयास पुष्कळ मजूर गोळा केले होते. त्या मजुरांना तेथे जबरदस्तीने ओढून नेण्यात येत असे. त्या मजुरांच्या यातनांचे अत्यंत वास्तवनिष्ठ वर्णन रस्त्याच्या गाण्यातून राधामोहन यांनी केले आहे, ते असे- शेतात नांगराचे फाळ जसेच्या तसे टाकून नांगरणी करणारे शेतकरी पळून गेले. शेकडो माणसे त्यांना सक्तीने मजुरी करण्यास नेत आहेत. जणूकाही चैत्र महिन्यात भक्त गोळा करणाऱ्या लोकांसारखेच ते बेजबाबदारपणे धरपकड करीत आहेत. अगदी प्रत्येक माणसाकडून त्यांना चाकरी हवी आहे आणि प्रसंगी छळणूक करून व शारीरिक शिक्षा करूनही हे लोक माणसांना रस्त्यावर काम करावयास लावतात. हातात छड्या घेऊन त्यांना उजवीकडे व डावीकडे फटके मारतात. त्यांच्या भीतीमुळे मजूर वाटेल ते करावयास तयार होतात. सूर्यास्तापर्यंत श्रमिकांना अन्न व विश्रांती वर्ज्य आहे. त्यानंतरच त्यांची सुटका होते.

गंगारामाच्या रचनेचा विचार करता अनंत फंदी यांच्या 'यशवंतराव होळकर' पोवाड्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. यशवंतराव पुण्यावर चालून आला, त्याचे वर्णन करताना-- 'अनंत फंदीचे छंद ऐकता लढाई झाली ही सारी' असे फंदींनी म्हटले आहे. याचा अर्थ फंदींच्या डोळ्यासमोर या घटना घडल्या असाव्यात.

राधामोहन यांची रचना वाचताना फंदींच्या 'माधव कवनाची' विशेषतः सहाव्या अध्यायाची आठवण होते.

सिंध प्रांतातील प्रसिद्ध कवी शहा अब्दुल हे एक अवलिया होते. कंठसंगीत किंवा वाद्यसंगीत ऐकताना त्यांची समाधी लागे. दोन्हीवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांचा मित्र परिवारही मोठा होता. मदन नावाचे एक हिंदू भक्त आणि लतीफ यांचा विशेष स्नेह होता. मदन शहांचे फार आवडते होते. ते दोघे नेहमी आपसात सुफी (गूढवादी) तत्त्वांची चर्चा करीत. भिट्ट येथे शहांना दोन भारतीय संगीतकार मित्र, अटल व चंचल तसेच बिलाल, इनायत व वंगद हे आवडते साथी आणि दोन लेखनिक तमर व हाशिम यांच्यासारख्या आवडत्या सहकाऱ्यांच्या सहवासात राहणे नेहमी आवडे. आपल्या जन्मभूमीविषयी त्यांना किती प्रेम होते हे केवळ 'सुरमरुई' वाचल्याबरोबर कोणाच्याही लक्षात येईल. आपल्या काळातील लुटारू, अमीर उमराव व धर्मांध पुरोहितांकडे (मुल्ला मौलवींकडे) त्यांचा अजिबात ओढा नव्हता.[२]

अशा या अवलियाचे ६४व्या वर्षी निधन झाले.

शहा लतीफ यांची भावसमाधी कंठसंगीत, वाद्य संगीत ऐकताना लागे हा उल्लेख वर आलाच आहे. अनंत फंदींकडे या दोन्ही गोष्टी होत्या, हे 'वाचावंत संपत्ती सारखी। बहुतांचे तनमन हारकी। लांगेलुंगे कवी भेदरले। अवघ्यांवर त्यांची गुर्की। समोर गाता कोणी टिकेना। मनामधी बसली कर्की। आकट विकट कवनाच्या चाली। नित्य नव्या अक्षयी थापा' होनाजीच्या या ओळींतून अधोरेखित होते. आपल्या गाण्याविषयीचा अभिमान या ओळीतून-

*'फंदी अनंत नुकताच गात। ऐकता कवी जोडिती हात। जणू आंबेमोहराचा भात।...'* या ओळींतून व्यक्त केला आहे.

लतीफ यांचा सहकारी मदन हिंदू होता, तर फंदींचा सहकारी मलक हा सुफी साधू होता. लतीफ यांच्याप्रमाणेच रतन, राघव, मलक यांच्या सहवासात फंदींना राहणे नेहमीच आवडे. 'सूरमरुई'मधून लतीफ जन्मभूमीविषयीचे प्रेम व्यक्त करताना दिसतात, तर अनंत फंदी 'सब शेरी एक संगमनेरी' या ओळीतून जन्मभूमीचा अभिमान जागवताना दिसतात. अनंत फंदींनी दुसऱ्या बाजीरावासही खडे बोल सुनावले आहेत. तसेच स्व कर्तव्य विसरणाऱ्यांची 'जोशी झाले पंडित। भट करी बटकीशी मोहब्बत। दप्तर पडले सांदीत। आता तरी पाहे अक्कल दरी भटा। जमाना आला आला उफराटा।' या शब्दांत कानउघडणी केली आहे.

गुजरात प्रांतात अठराव्या शतकात शतकात धीरो (१७५३-१८२५) नावाचा कवी होऊन गेला. हा आपल्या 'काफी'(पदे) रचनेबद्दल प्रसिद्ध आहे. ईश्वरी श्रद्धाच महत्त्वाची असून ऐहिक सुखांच्या मागे धावणे व्यर्थ आहे, अशा आशयाची ही पदे आहेत. याशिवाय धीरोने गुढार्थाने युक्त अशी काही धार्मिक रचना केलेली आहे. त्याला 'अवळवाणी' म्हणतात. उदाहरणार्थ, अंबारीने हत्तीला गिळले, खोगिराने घोड्याला गिळून टाकले, कपड्यावर कुंपण वाळत घातले, फेसाने समुद्राला गिळून टाकले, सशाने आपल्या हुशारीने सिंहाला लढाईत हरवून टाकले. इत्यादी.[३]

नरभेराम (१७६८-१८५२)सतराशे हा कवी 'बोडणानी मूछना पदो' या काव्यासाठी गुजरात प्रांतात प्रसिद्ध आहे. बोडाणा हा डाकोरचा रहिवासी. तो द्वारकेच्या रणछोडजीचा (कृष्णाचा) नम्र भक्त होता. द्वारकेहून आपल्या आराध्य दैवताची मूर्ती डाकोरला आणण्याचे अशक्यप्राय असे काम त्याने अनेक आपत्तींना तोंड देऊन करून दाखवले.[४]

भोजो(१७८५-१८५०) हा आपल्या 'चाबखा' नामक (चाबकाचे फटके) काव्याबद्दल प्रसिद्ध आहे. हे एक प्रकारचे गीत आहे. यात दुष्ट प्रवृत्तींवर किंवा दुष्ट प्रवृत्तींच्या माणसांना द्वेषभावना न ठेवता कवीने तडाखे हाणले आहेत. याप्रमाणेच साधू, अगर ईश्वराचे भक्त म्हणून मिरवून घेणारे लोक आणि समाजाचे धुरीण समजणारे, त्यांच्या ढोंगीपणावर कवीने कठोर प्रहार केले आहेत. तसेच त्या काळच्या समाजाच्या अपप्रवृत्तींवरही चाबकाचे फटके मारलेले आहेत.[५]

धीरो'काफी' रचनेसाठी प्रसिद्ध आहे, तर फंदी 'कटाव' अथवा 'फटका' या रचनेसाठी प्रसिद्ध आहेत. धीरोने काही गूढ रचना केलेल्या आढळतात. (आवळवाणी) तर महाराष्ट्रात 'कलगीतुरा' प्रकारच्या शाहिरांनी शिव श्रेष्ठ की शक्ती? अशा भूमिकेतून गूढ रचना केलेल्या आढळतात.

नरभेरामाप्रमाणेच अनंत फंदींची 'डाकोरजी'ही रचना प्रसिद्ध आहे.

भोजो आणि फंदी यांच्या रचनेतही विलक्षण साम्य दिसते. भोजोचा 'चाबखा'(चाबकाचे फटके) आणि फंदींचा फटका ही रचना पाहताना हे साम्य अधोरेखित होते. उदाहरणार्थ, भोजोच्या काही चाबखांची सुरुवात अशी होते, 'हे प्राण्या, ईश्वराची भक्ती कर म्हणजेच ईश्वरावर प्रेम

कर...'[६] या जगातल्या 'बाबा' (बुवा अथवा साधू) लोकांकडे पहा. त्यांनी लोकांना फसविण्यासाठी व लुबाडण्यासाठीच हा साधू वेष धारण केला आहे.[७]

अनंत फंदी लिहितात -

*सुविचारा कातरू नको*

*सत्संगत अंतरू नको*

*द्वैताला अनुसरू नको*

*हरिभजना विस्मरू नको*

*गावयास अनंत फंदीचे फटके मागे सरू नको...*

*किंवा फंदींच्या फटक्याचा आरंभ बघा,*

'लंडे गुंडे(ठक, दांडगा) हिरसेतट्टू (जार कर्म करणारा)... यांची संगत धरू नको. नरदेहासी येऊन प्राण्या दुष्ट वासना धरू नको.' (यात तथाकथित साधूही येतात)

मल्याळम साहित्याचा विचार करता नंपियार हे एक महत्त्वाचे नाव समोर येते. त्यांच्याइतका प्रखर सामाजिक जाणीव असलेला कवी विशेषतः अठराव्या शतकात केवळ केरळमध्येच नव्हे, तर जगातल्या पूर्वेकडील कोणत्याही देशात निर्माण झाला नसेल. त्यांच्या कवितेत सदैव कोणती ना कोणती सामाजिक जाणीव प्रकट होत असते. सामाजिक दंभस्फोट करताना, त्यांच्या शब्दाला उपहासाची धार चढत असे.[८]

समाजातील अगदी सर्वसामान्य माणसाला समजेल अशा भाषेत त्यांनी काव्य रचना केलेली दिसते. 'तुल्लल छंद' ही त्यांची खास कामगिरी म्हणावी लागेल. अनेक ठिकाणी त्यांनी असे म्हटले आहे की, मी जनसामान्यांकरता कविता लिहितो. यासाठी त्यांना समजेल अशा रीतीने लिहिणेच मला आवश्यक वाटते. त्यांच्या पुढील ओळी प्रसिद्ध आहेत,

'कट्टू कटेपट्टू कठीण संस्कृतविकट कटुकविकेरियाल भटजनडडल् धरिक्कयिल्ला तिरिक्कुमावकेयुमेटद्रुटन'

भावार्थ: कर्णकटू अशा कठीण संस्कृत भाषेत विकट आणि कर्कश कविता लिहू लागलो, तर ती सामान्यांना समजणार नाही एवढेच नव्हे, तर ते सर्व पळून जातील.[९]

नंपियार यांच्याप्रमाणेच फंदींच्या अनेक रचनांतून सामाजिक जाणीव प्रकट झालेली आहे. तत्कालीन (अठरावे शतक) समाजाच्या स्थिती-गतीचे यथार्थ प्रतिबिंब फंदींच्या रचनेत दिसते. नंबियार यांचा 'तुल्लल छंद' आणि फंदी यांचा फटका आजही जनमानसावर अधिराज्य गाजवताना पाहावयास मिळतो. धनाढ्य आणि सत्ताधीश यांच्या दांभिकपणाचा समाचार फंदी याप्रमाणे घेतात --

मी मोठा शहाणा धनाढ्यही गर्व भार हा वाहू नको

एकाहुनि एक चढी जगामधि थोरपणाला मिरवू नको

किंवा

हिमायतीच्या बळे गरीबगरिबाला तू गुरकावू नको

दो दिवसांची जाईल सत्ता अपेश माथा घेउ नको

नंपियार यांनी ज्याप्रमाणे सामान्य माणूस डोळ्यासमोर ठेवून, मातृभाषेत रचना सादर केली, आपला मातृभाषेचा अभिमान जागवला. त्याप्रमाणे फंदींच्याही डोळ्यासमोर सर्व जातिधर्मातील सामान्य माणूसच होता. इतकेच नव्हे, तर सर्वसामान्य, लहानथोर सर्वांना अनंत फंदी हे नाव चांगलंच माहिती होतं. याचा उद्गार फंदी असा काढतात...

सारी सर्वत्र लहानथोरां अनंत फंदी ठाऊका।।[१०]

तसेच लहान थोरांना समजण्यासाठी आपण हा प्राकृताचा आधार घेतला आहे हेही सांगण्यास फंदी विसरत नाहीत,

*यात पदरचे नाही यत्किंचित। बाजी रघुनाथ साक्षभूत।*

*टीका केली प्राकृत। लहान थोरांस समजावया।।*[११]


**संदर्भ :**

१. बंगाली साहित्याचा इतिहास- सुकुमार सेन साहित्य अकादमी नवी दिल्ली १९८२ पृष्ठ १४७

२. सिंधी साहित्याचा इतिहास- लालसिंह अजब आणि साहित्य अकादमी नवी दिल्ली १९८३पृष्ठ ९७/९८

३. गुजराती साहित्याचा इतिहास- मनसुखलाल जवेरी साहित्य अकादमी नवी दिल्ली १९८४ पृष्ठ ५९,६०

४. कित्ता पृष्ठ .६०

५. तत्रैव पृष्ठ ६२

६. प्राणीया! भजी लेने किरतार /तत्रैव-पृ.६७

७. जोई ल्यो जगताना बावा धर्योभेरव धूतीने खावा/ कित्ता-पृ.६७.

८. मल्याळम साहित्याचा इतिहास- पि. के. परमेश्वरन नायर साहित्य अकादमी नवी दिल्ली १९८४पृष्ठ १०१.

९. तत्रैव पृ .१०३

१०. अनंत फंदी कृत माधव ग्रंथ प्रथम अध्याय ओवी ५७.

११. कित्ता- द्वितीय अध्याय ओवी-४४.


●


**प्रा. शिरीष गंधे**

कलांजली, शास्त्रीनगर,

लासलगाव, ता. निफाड,

जि. नाशिक - ४२२३०६

चलभाष : ९७६६२०२१४१


समीक्षा

**विराज मोरे**

# प्रभाकर भसे यांच्या 'महात्मा गौतम' कादंबरीतील बुद्धप्रतिमा : एक आकलन

**१. प्रास्ताविक :**

हरि नारायण आपटे (इ. स. १८६४ - इ. स. १९१९) हे ब्रिटिश अंमलाखालील आधुनिक महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे मराठी कादंबरीकार होत.[१] त्यांनी इ. स. १८८५ ते इ. स. १९१९ या काळात मराठी भाषेत ऐतिहासिक, चरित्रात्मक व सामाजिक विषयांवर 'मधली स्थिति' (१८८८), 'पण लक्षांत कोण घेतो !' (१८९३), 'उषःकाल' (१८९७), 'गड आला पण सिंह गेला' (१९०४), 'चंद्रगुप्त' (१९०५), 'वज्राघात अथवा विजयनगरचा विनाशकाल' (१९१५), 'मी' (१९१६), 'यशवंतराव खरे' (१९१६) इत्यादी अनेक उत्तम कादंबऱ्या लिहिल्या.[२] हरिभाऊंच्या कादंबऱ्या मराठी वाचकांच्या पसंतीस उतरल्यामुळे मराठीतील एक मोठा रसिकवर्ग नाटकांकडून कादंबऱ्यांकडे सरकला आणि मराठी वाङ्मयात कादंबरी या साहित्यप्रकारास मानाचे स्थान प्राप्त झाले.[३] त्यानंतर मराठी कादंबरीची वाढती लोकप्रियता लक्षात घेऊन मराठीतील काही व्यवहारी वृत्तीच्या धोरणी प्रकाशकांनी आर्थिक लाभाच्या हेतूने मराठी कादंबऱ्या संपूर्ण स्वरूपात प्रकाशित करणाऱ्या कादंबरीमाला सुरू केल्या,[४] व त्यातून एकापाठोपाठ एक अशा अनेक कादंबऱ्या यशस्वीपणे प्रकाशित करून मराठीतील कथात्म साहित्यात मोठी संख्यात्मक भर घातली.[५] या कादंबरीमालांमध्ये प्रभाकर हे टोपणनाव धारण करणाऱ्या प्रभाकर श्रीपत भसे (अज्ञात - इ. स. १९२५)[६] यांची भारत गौरव ग्रंथमाला ही एक प्रमुख कादंबरीमाला होती.



प्रभाकर भसे यांनी 'कर्तव्यासाठी जसे कर्तव्य तसे साहित्यासाठी साहित्य' या भूमिकेतून[७] इ. स. १९१० मध्ये[८] भारत गौरव ग्रंथमालेची स्थापना केली व तिच्या माध्यमातून राष्ट्राभिमानजागृती, मनोरंजन, लोकप्रबोधन, वाङ्मयसेवा इत्यादी उद्देशांच्या पूर्तीसाठी अनेक चरित्रे आणि कादंबऱ्या यशस्वीपणे प्रकाशित केल्या.[९] त्यामुळे भसे हे विसाव्या शतकातील एक यशस्वी मराठी प्रकाशक बनले आणि त्यांस भारत गौरव ग्रंथमालेचे संस्थापक आणि व्यवस्थापक अशी ठळक ओळख प्राप्त झाली.[१०] यशस्वी मराठी प्रकाशक असलेले भसे हे मराठी भाषेत विविध प्रकारची ग्रंथरचना करणारे साहित्यिकही होते. त्यांनी चरित्रकार, कादंबरीकार, साहित्य-संकलक, समीक्षक, अनुवादक अशा वेगवेगळ्या भूमिका स्वीकारून मराठी भाषेत अनेक साहित्यकृती रचून विपुल साहित्यसंपदा निर्मिलेली दिसते.[११] भसेंच्या साहित्यसंपदेत 'समाजकंटक अथवा वेणु' (१९१०), 'सावित्री सत्यवान' (१९११), 'प्रवासिनी' (१९१२), 'जहांगीर' (१९१३), 'महात्मा गौतम' (१९१३), 'शिवाजीचा उजवा हात' (१९१५), 'जन्मभूमि' (१९१५), 'प्रेममंदिर' (१९१५), 'स्वप्नमय आयुष्य' (१९१६), 'सुखाचा शोध (१९१७), 'मातृमूर्ती' (१९१७), 'मोहजाल' (१९१७), 'कर्मफल' (१९१७), 'पूर्व आणि पश्चिम' (१९१८), 'मोहन अथवा विद्वतजनसभा' (१९१८), 'देशाचे दुर्दैव' (१९१९), 'प्रणयपंक' (१९२०), 'प्रवृत्ति आणि निवृत्ति' (१९२०), 'प्रेमाश्रम मुकुट' (१९२४) या कादंबऱ्या आहेत.[१२] तसेच 'कैसरची प्रभावळ' (१९१६), 'जर्मनीचे पाताळयंत्र - प्रिन्स बिस्मार्क' (१९१८) ही जर्मन राष्ट्रपुरुषांवरील चरित्रेही आहेत.[१३] भसे यांनी 'कौन्ट टॉलस्टॉय' (१९२१) हा चार खंडांचा व हजारभर पानांचा विस्तृत चरित्रात्मक ग्रंथ लिहून थोर रशियन साहित्यिक-विचारवंत काऊंट लिओ टॉलस्टॉय यांच्या जीवनाचा सविस्तरपणे वेध घेतलेला दिसतो.[१४] त्याचप्रमाणे संक्रमणकाळातील मराठी काव्याची चिकित्सा करणारा 'पदे, पोवाडे व लावण्या' (१९२०) हा ग्रंथ रचून संकलनात्मक-समीक्षात्मक कार्यही केलेले आढळते. याशिवाय भसे यांनी बंकिमचंद्र चटर्जी यांची 'रजनी' (१९१५) आणि शरत्चंद्र चट्टोपाध्याय यांची 'विजया' (१९२०) या

**प्र. श्री. भसे यांच्या 'महात्मा गौतम' कादंबरीने सिद्धार्थ गौतम बुद्ध यांस चरित्रनायक करून व गौतम बुद्धांचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवनचरित्र थोडक्यात मांडून गौतम बुद्धांच्या जीवनाचा परिचय करून दिला आहे आणि गौतम बुद्धांची मानवतावादी प्रतिमा अधोरेखित केली आहे. त्यामुळे कादंबरीच्या रूपात गौतम बुद्धांचे व्यक्तिमत्त्व, भावविश्व, कार्यकर्तृत्व, जीवनप्रवास यांचा आढावा घेणारी मराठीतील पहिली कादंबरी आणि मराठीतील गौतम बुद्धविषयक चरित्रात्मक कादंबऱ्यांच्या परंपरेचा शुभारंभ करणारी कादंबरी या दृष्टीने भसे यांची महात्मा गौतम ही एक महत्त्वपूर्ण कादंबरी आहे, असे आपल्याला म्हणता येईल.**

प्रसिद्ध बंगाली साहित्यकृती अनुवादाच्या माध्यमातून मराठीत आणलेल्या दिसतात.[१५] याप्रमाणे भसे यांच्या एकूण वाङ्मयीन कार्याचा थोडक्यात आढावा घेतल्यास त्यांची मराठी भाषा, मराठी साहित्य व मराठी संस्कृतीविषयीची धडपड आणि तळमळ लक्षात येते.

प्र. श्री. भसे यांची एक दुर्लक्षित राहिलेली महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी बौद्धधम्माचे महान संस्थापक असलेल्या सिद्धार्थ गौतम बुद्धांविषयी (इ. स. पू. ५६३ - इ. स. पू. ४८३)[१६] लिहिलेली व भारत गौरव ग्रंथमालेचे सहावे पुष्प म्हणून इ. स. १९१३ मध्ये प्रकाशित केलेली 'महात्मा गौतम' ही चरित्रात्मक कादंबरी होय.[१७] भसे यांच्या 'महात्मा गौतम'मुळे मराठीत प्रथमच गौतम बुद्धांचा जन्मापासून मृत्यूपर्यंतचा जीवनप्रवास कादंबरीच्या रूपात पुढे आला, बुद्धांची मानवतावादी प्रतिमा कलात्मकपणे अधोरेखित झाली आणि मराठी साहित्याच्या क्षेत्रात गौतम बुद्धविषयक चरित्रात्मक कादंबरीच्या परंपरेची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यामुळे मराठीतील गौतम बुद्धांविषयीच्या पहिल्या चरित्रात्मक कादंबरीत सिद्धार्थ गौतम बुद्धांची व्यक्तिरेखा आणि बुद्धप्रतिमा कशाप्रकारे चित्रित झाली आहे? यावर प्रकाश टाकण्यासाठी सदर लेखाची रचना केली आहे.

**२. प्र. श्री. भसे यांच्या 'महात्मा गौतम'चे कथानक :**

प्र. श्री. भसे यांनी लिहिलेल्या 'महात्मा गौतम'च्या १५२ पृष्ठांच्या छोटेखानी संहितेवर एक नजर टाकल्यास या कादंबरीत लेखकाने 'उपक्रम', 'विलासभवन की कारागृह?', 'लोकनिरीक्षण', 'कर्तव्यजागृति', 'पर्यटन', 'सिद्धि', 'यशोधरा', 'उपसंहार' अशी ८ प्रकरणे पाडून पारंपरिक तृतीयपुरुषी निवेदनशैलीत सिद्धार्थ गौतम बुद्ध या मुख्य व्यक्तिरेखेभोवती कथानकाची गुंफण केल्याचे दिसते व त्याद्वारे सिद्धार्थ गौतम बुद्धांचे व्यक्तिमत्त्व आणि जीवनप्रवास यांवर साक्षेपाने प्रकाश टाकलेला दिसतो. कालानुक्रम, कार्यकारणभाव आणि संभवनीयता या तत्त्वांआधारे भसे यांच्या 'महात्मा गौतम'चे सार पाहू गेल्यास या कादंबरीत गौतम बुद्धांची जीवनकथा पुढीलप्रमाणे व्यक्त झालेली आढळते. :-

**२.१ सिद्धार्थ गौतमचा जन्म, बालपण आणि शिक्षण :**

प्राचीन उत्तर भारतात रोहिणी नदीच्या काठी शाक्यवंशीय लोकांचे कपिलवस्तु राज्य असते. शुद्धोदन हा कपिलवस्तुचा राजा असतो. मायावती व प्रजावती गौतमी या शुद्धोदनच्या दोन राण्या असतात. विवाहानंतर अनेक वर्षांनी शुद्धोदन-मायावतीला सिद्धार्थ नावाचा मुलगा होतो. त्यानंतर कालदेवल नावाचा ऋषी 'शुद्धोदन-मायावतीचा पुत्र मोठा झाल्यावर सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेईल व अरण्यात जाऊन बुद्धत्वप्राप्ती करून जनतेला दुःखमुक्तीचा निर्वाणपथ दाखवेल.' अशी भविष्यवाणी वर्तवितो. त्यानंतर काही काळाने प्रसुतीसाठी माहेरी चाललेली गर्भवती मायावती पलाशवनात प्रसूत होते व तिच्या पोटी एक सुंदर व तेजस्वी असा पुत्र जन्मास येतो. पुत्रजन्मानंतर काही दिवसांनी एका सौख्यनिद्रेत मायावतीराणीचे निधन होते. त्यानंतर शुद्धोदनराजा पत्नीवियोगाचे दुःख बाजूला ठेवून नवजात पुत्राचे सिद्धार्थ असे नामकरण करतो आणि प्रजावती गौतमी भगिनीवियोगाचे दुःख बाजूला ठेवून सिद्धार्थबाळाचा जिव्हाळ्याने सांभाळ करू लागते. त्यामुळे लोक सिद्धार्थला 'गौतमीचा पुत्र सिद्धार्थ' या अर्थाने 'सिद्धार्थ गौतम' म्हणून संबोधू लागतात. (महात्मा गौतम, पृ. १-२४)

राजपुत्र सिद्धार्थ सात-आठ वर्षांचा झाल्यावर शुद्धोदन-प्रजावती त्यास अध्ययनासाठी विद्वान ऋषी असलेल्या आचार्य विश्वमित्रांच्या आश्रमात पाठवितात. तेथे सिद्धार्थ गुरू व सहाध्यायांशी नम्रपणे वर्तन करून त्यांच्याकडून विविध मैदानी खेळ आणि गूढविद्यांचे शिक्षण घेतो. सिद्धार्थचे शिक्षण पूर्ण झाल्यावर शुद्धोदनराजा त्याच्यावर राज्यकारभाराच्या जबाबदाऱ्या सोपविण्यास सुरुवात करतो; पण मानसिक शांतीला महत्त्व देणाऱ्या चिंतनशील वृत्तीच्या सिद्धार्थला राज्यकारभार करण्यात फारसा रस नसतो. त्यामुळे तो वडिलांचे मन राखण्यासाठी ठरलेल्या वेळात राज्यकारभार करू लागतो व उरलेल्या वेळात मानसिक शांतीसाठी निसर्गाच्या सान्निध्यात बसून ध्यानधारणा करणे आणि ज्ञानी

लोकांशी विचारविनिमय करून सत्यतत्त्वांचा शोध घेणे या आवडत्या गोष्टी करू लागतो. एके दिवशी शुद्धोदनचा पुतण्या असलेला राजपुत्र देवदत्त आकाशात उडणाऱ्या हंसास बाणाने वेधतो. तेव्हा जखमी हंस पक्षी करुण स्वराने ओरडत ध्यानमग्न सिद्धार्थसमोर येऊन पडतो. त्यानंतर अहिंसक वृत्तीचा दयाळू सिद्धार्थ देवदत्तने केलेली हंसाची मागणी फेटाळून जखमी हंसावर तातडीने औषधोपचार करतो व हंस बरा झाल्यावर त्यास निसर्गात सोडून देतो. (महात्मा गौतम, पृ. २४-३२)

यााप्रमाणे 'महात्मा गौतम'च्या पहिल्या भागात भावी बुद्धावतार असण्याच्या शक्यतेचे वलय प्राप्त झालेला, आई-वडिलांचा आदर करणारा, गुरू व गुरुगृहातील इतर शिष्यांशी शालीनपणे वर्तन करून विविध विद्या-कौशल्ये आत्मसात करणारा, जखमी हंसास वाचविणारा पवित्र, नम्र व दयाळू वृत्तीचा सिद्धार्थ भसे यांनी उभा केलेला दिसतो.

**२.२ विरक्तवृत्तीच्या सिद्धार्थला संसाराची गोडी लावण्यासाठी शुद्धोदनराजाने केलेले प्रयत्न :**

राजपुत्र सिद्धार्थने राज्यकारभारात रस न घेता जखमी हंसास वाचविणे, एकांतात ध्यानधारणा करणे, विद्वानांशी चर्चा करणे या गोष्टी केल्यावर सिद्धार्थमधील विरक्ती शुद्धोदनराजाच्या लक्षात येते. त्यामुळे तो सिद्धार्थला वैभवसुखाची गोडी लावण्यासाठी कपिलवस्तु राज्यातील विविध पर्वत, नद्या, अरण्ये, शेतजमिनी, सरोवरे, राज्यभांडार इ. वैभव दाखवतो. तेव्हा सिद्धार्थला एकीकडे बारीक किड्याला खाणारा मोठा किडा, मोठ्या किड्यास तोंडात धरून उडणारा लहान पक्षी, लहान पक्ष्याला खाण्यासाठी त्याच्यामागे लागणारा बहिरी ससाणा आणि लहान पक्ष्याच्या तोंडातून पडलेला किडा खाणारा सरोवरातील मासा अशी अन्नसाखळी दिसते आणि दुसरीकडे रोडक्या बैलांना चाबूक मारून त्यांच्याकडून काम करवून घेणारे फाटक्या कपड्यांतील शेतकरी व लक्षावधी गरीब शेतकऱ्यांच्या करातून प्राप्त झालेल्या उत्पन्नातून तुडुंब भरलेले शुद्धोदनराजाचे राज्यभांडार पाहायला मिळते. स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेल्या दृश्यांवर एकांतात बसून चिंतन-मनन केल्यावर 'निसर्गात प्रत्येक वस्तूच्या मुळाशी निर्दयता आहे व मानवनिर्मित जगात प्रचंड पक्षभेद आणि सुखदुःखाची अत्यंत विषम वाटणी आहे.' असे निष्कर्ष सिद्धार्थला प्राप्त होतात आणि तो मनोमन अस्वस्थ होतो. (महात्मा गौतम, पृ. ३२-४४)

सिद्धार्थ सतरा-अठरा वर्षांचा झाल्यावर शुद्धोदनराजा तरुण सिद्धार्थच्या सुखासाठी रम्य, सुरम्य व शुभ असे तीन महाल बांधवून घेतो आणि त्यांत विविध प्रकारची विलाससामग्री ठेवून ते महाल सिद्धार्थकडे सोपवतो; पण आपल्या सुखा-समाधानासाठी कृत्रिमपणे प्रयत्न करणारी माणसे पाहिल्यावर सिद्धार्थ सावध होतो व सुखासीन महालांपासून आणि त्यांतील सेवाभावी माणसांपासून मनाने दूर जातो. सिद्धार्थमधील विरक्ती वाढत चालल्याचे समजल्यावर शुद्धोदनराजा कपिलवस्तुच्या मुख्य प्रधानाच्या साहाय्याने राजपुत्र सिद्धार्थचा सुप्रबुद्धराजाची कन्या असलेल्या यशोधराशी विवाह घडवून आणतो आणि कपिलवस्तुबाहेर विलासभवन नावाचा भव्यदिव्य व सर्वांगसुंदर प्रासाद बांधवून तेथे नवविवाहित दांपत्याची स्वतंत्र व्यवस्था करतो. शुद्धोदनने महाराणी यशोधराला सिद्धार्थविषयीची भविष्यवाणी सांगून तिला सिद्धार्थला ऐहिक सुखाची गोडी लावण्याचा सल्ला दिल्यावर यशोधरा सिद्धार्थचे मन जपू लागते. त्यानंतर विलासभवनातील सुखासीन वातावरणामुळे व पत्नी यशोधरेच्या निर्मल, सात्त्विक आणि पवित्र प्रेमामुळे सिद्धार्थ पूर्वीची विरक्ती सोडून संसारात रमतो. त्यानंतर काही महिन्यांनी सिद्धार्थ-यशोधरेला राहुल नावाचा सुंदर पुत्र होतो. सिद्धार्थ संसारात रमलेला पाहून शुद्धोदनला हायसे वाटते. (महात्मा गौतम, पृ. ४४-६३)

याप्रमाणे 'महात्मा गौतम'च्या दुसऱ्या भागात भसे यांनी सुरुवातीला निसर्गातील निर्दयता व मानवी जीवनातील विषमता पाहून अस्वस्थ झालेला किशोरवयीन सिद्धार्थ आणि नंतर शुद्धोदन-यशोधराच्या प्रयत्नांमुळे विवाह-संसारात रमलेला तरुण सिद्धार्थ रंगविलेला दिसतो.

**२.३ राजपुत्र सिद्धार्थला आलेली दुःखाची प्रचिती आणि त्याने केलेला सर्वसंगपरित्याग :**

पुत्रप्राप्ती झाल्यावर वैभवसंपन्न संसारी पुरुषाच्या भूमिकेत रमलेल्या राजपुत्र सिद्धार्थला 'विलासभवनातील माणसांप्रमाणेच विलासभवनाबाहेरील माणसेही सुखी आहेत का?' असा प्रश्न पडतो. त्यामुळे तो विलासभवनाबाहेर पहारा बसविणाऱ्या शुद्धोदनराजाशी प्रयत्नपूर्वक वाद करून विलासभवनाबाहेर जाण्याची अनुमती मिळवतो व सारथी छंदकच्या मदतीने विलासभवनाबाहेर पडून कपिलवस्तु राज्यातील प्रजेची खरी परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा कपिलवस्तुतील फाटके-तुटके कपडे घातलेला शेतकरी, हीन-दीन अवस्थेतील जराग्रस्त वृद्ध गृहस्थ, पिंगट व शक्तिहीन अवस्थेत विव्हळणारा व्याधिग्रस्त मनुष्य, मृत मनुष्याची प्रेतयात्रा, प्रेतयात्रेत सामील होऊन मोठ्याने आक्रोश करणारे मृताचे आप्तस्वकीय अशी दुःखद दृश्ये सिद्धार्थच्या दृष्टीस पडतात. या दृश्यांविषयी छंदकशी चर्चा केल्यावर 'मानवी आयुष्यात संपत्ती, तारुण्य, आरोग्य, जीवन, नातेसंबंध या बाबी अशाश्वत असून दारिद्र्य, म्हातारपण, आजारपण, मृत्यू, वियोग इत्यादी दुःखे मात्र शाश्वत आहेत.' असा निष्कर्ष सिद्धार्थला प्राप्त होतो आणि त्याच्यातील अस्वस्थता पुन्हा वाढीस लागते. त्यानंतर सर्वसामान्य संसारी लोकांपेक्षा पृथक असा एक प्रशांत चेहऱ्याचा व निर्विकार

वृत्तीचा सर्वसंगपरित्यागी संन्यासी सिद्धार्थच्या पाहण्यात येतो. त्यामुळे तो छंदककडून त्या काषायवस्त्रधारी संन्याशाची हकीकत जाणून घेतो. तेव्हा 'तो भगवी वस्त्रे परिधान केलेला मनुष्य सर्वसंगपरित्याग करून संन्यासी झाला आहे. आत्म्याला पूर्ण शांती मिळावी म्हणून त्याने वैराग्य धारण केले आहे. तो आपला उदरनिर्वाह भिक्षेवर करतो, म्हणून त्याच्या हातात भिक्षापात्र पाहायला मिळते.' अशी माहिती छंदक सिद्धार्थला देतो. त्यानंतर 'स्वतःच्या उद्धारासाठी व प्राणिमात्रांच्या दुःखनिवारणासाठी आपणही सर्वसंगपरित्याग करून भिक्षू बनावे.' अशी इच्छा सिद्धार्थच्या मनात निर्माण होते आणि तो विरक्तीकडे झुकू लागतो. सिद्धार्थ निवृत्तीवादी बनत चालल्याचे समजल्यावर शुद्धोदनराजा विलासभवनाबाहेर कडक पहारा बसवून विलासभवनातील विलाससामग्री वाढवतो. त्यानंतर 'कपिलवस्तुतील प्रजेची खरी स्थिती समजून घेतली, तरच मला पुढे हे राज्य कसे चालवायचे ते समजेल.' असा मुद्दा मांडून राजपुत्र सिद्धार्थ पुन्हा एकदा शुद्धोदनराजाकडून कपिलवस्तुत गुप्तवेशाने फिरण्याची परवानगी मिळवतो व छंदकसह वेषांतर करून कपिलवस्तुतील विविध ठिकाणे आणि तेथील जनजीवन जवळून पाहतो. त्यानंतर सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनातील स्वार्थीपणा, लोभीपणा, कर्तव्यशून्यता, कलहवृत्ती हे दोष आणि त्यातून उद्भवणारी दुःखद परिस्थिती पाहून सिद्धार्थमधील वैराग्यभावना आणखी दृढ होते. (महात्मा गौतम, पृ. ६३-८१)

कालांतराने एका पौर्णिमेच्या रात्री सर्व निजलेले असताना राजमहालाजवळून वाहणाऱ्या रोहिणी नदीच्या प्रवाहातून 'उठ, मोहवश होऊ नकोस. मायापाशांत सापडून कर्तव्यपराङ्मुख होऊ नकोस. क्षणिक सुखाच्या आशेने चिरकालिक सुखाला आचवू नकोस.' असा ध्वनी सिद्धार्थला ऐकू येतो व त्याच्यातील अंतर्गत अस्वस्थता पराकोटीस जाते. त्यानंतर 'अनंत प्राणिमात्रांच्या दुःखवेदना माझ्या अंतःकरणात क्षतारोपण करत आहेत. त्यामुळे सर्व सजीवांच्या दुःखमुक्तीचा मार्ग शोधण्यासाठी मी सर्व सुखांवर पाणी सोडून संन्यास घ्यायला हवा.' असा दृढनिश्चय करून सिद्धार्थ गुपचूपपणे विलासभवनातून बाहेर पडतो आणि सारथी छंदकच्या साथीने कंटक घोड्यावर स्वार होऊन कपिलवस्तुचा त्याग करतो. कपिलवस्तुचा त्याग करून दूरवर आल्यावर सिद्धार्थ अनमा नदीकाठी साध्या रीतीने संन्यास घेतो. तेव्हा प्रिय स्वामी असलेल्या सिद्धार्थच्या वियोगाची कल्पना आल्याने स्वामिभक्त कंटक घोडा प्राणत्याग करतो. त्यानंतर सिद्धार्थ मनात दाटलेले सर्व दुःख आवरून छंदकला कपिलवस्तुला परतण्याची आणि घडलेली हकीकत सर्वांच्या कानावर घालण्याची आज्ञा देतो. तेव्हा छंदक कपिलवस्तुला जाऊन सिद्धार्थ सुखरूप असून त्याने दुःखमुक्तीचा निर्वाणपथ शोधण्यासाठी संन्यास घेतल्याचे वर्तमान शुद्धोदन, प्रजावती आणि यशोधराच्या कानावर घालतो. त्यानंतर शुद्धोदन-प्रजावतीला दुःखाचा तीव्र धक्का बसतो आणि यशोधराराणी संन्यस्त वृत्ती धारण करून 'पतीला कार्यात सिद्धी प्राप्त व्हावी.' यासाठी परमेश्वराची करुणा भाकू लागते. (महात्मा गौतम, पृ. ८१-१००)

याप्रमाणे 'महात्मा गौतम'च्या तिसऱ्या भागात दुःखद जीवनाची प्रचिती आल्याने अस्वस्थ झालेला व सर्व मानवजातीच्या दुःखमुक्तीचे ध्येय समोर ठेवून संसारत्याग करणारा सिद्धार्थ भसे यांनी खुबीने चितारलेला दिसतो.

**२.४ संन्यासी सिद्धार्थचे प्रारंभिक जीवन आणि जनजागृतीचे कार्य :**

पृथ्वीवरील सर्व मानवांच्या दुःखमुक्तीचा निर्वाणपथ शोधण्याचे ध्येय समोर ठेवून संन्यास घेतल्यावर सिद्धार्थ संन्यासमार्गी भिक्षूची भूमिका स्वीकारून भिक्षापात्र धारण करतो व तप करत, भिक्षा मागत, प्रवास करत मगधला जाऊन तेथील शरीराला मुद्दाम कष्ट देणाऱ्या देहदंडनवादी तपस्व्यांशी चर्चा करतो. तपस्व्यांशी केलेल्या चर्चेवर स्वतंत्रपणे चिंतन केल्यावर 'काल्पनिक आत्म्याच्या भविष्यकालीन सुखासाठी वर्तमान वास्तव शरीराला जाणूनबुजून तीव्र कष्ट सोसायला लावणारा देहदंडनावर आधारित तपमार्ग योग्य व अनुकरणीय नाही.' असा निष्कर्ष सिद्धार्थला प्राप्त होतो. त्यामुळे तो दुःखमुक्तीचे ज्ञान मिळविण्यासाठी शारीरिक कष्टांवर आधारित प्रचलित तपमार्गाचा अवलंब न करण्याचा निर्णय घेतो. (महात्मा गौतम, पृ. १०१-११०)

पुढे 'मगधराज्याचा बिंबिसारराजा एक महायज्ञ करून त्यात अनेक शेळ्या-बकरे व मेंढ्यांचा बळी देणार आहे.' अशी बातमी काही गुराख्यांद्वारे सिद्धार्थला समजते. त्यामुळे तो गुराखी व शेळ्या-मेंढ्यांच्या कळपासह बिंबिसारराजाच्या यज्ञमंडपात जाऊन यज्ञसंस्थेवर आणि यज्ञातील पशुबळी पद्धतीवर तीव्र टीका करून जनजागृती करतो. 'यज्ञ करणे व यज्ञात पशुबळी देणे ही कृत्ये हिंसक, पापमय, निरुपयोगी आणि हानीकारक आहेत. ज्यांना आपण जन्मास घातलेले नाही व जे आपल्याला दूध व लोकर देतात अशा मुक्या प्राण्यांची यज्ञबळीच्या निमित्ताने हत्या करणे हे अत्यंत चुकीचे आणि कृतघ्नपणाचे कृत्य आहे.' अशा आशयाची सिद्धार्थने मांडलेली भूमिका पटल्याने बिंबिसारराजा यज्ञमंडप मोडून काढतो आणि सर्व पशूंची बळी जाण्यापासून सुटका करून त्यांस निसर्गात सोडून देतो. त्यानंतर यज्ञ करण्यासाठी आलेले यज्ञविद ब्राह्मणही यापुढे पशुबळीवर आधारित यज्ञ न करण्याचा निश्चय करून आपापल्या घरी परततात. सिद्धार्थ निरोप घेण्यासाठी आल्यावर निपुत्रिक बिंबिसारराजा संन्यासी

सिद्धार्थला स्वतःचा वारस बनण्याची, योग्य स्त्रीशी विवाह करण्याची आणि राजगृहमध्ये राहून मगधराज्याचा उपभोग घेण्याची विनंती करतो. तेव्हा संन्यस्त वृत्ती स्वीकारलेला सिद्धार्थ मानवजातीच्या दुःखमुक्तीचे सत्यतत्त्व शोधण्यासाठी आमरण प्रयत्न करणार असल्याचे ध्येय विशद करून बिंबिसारराजाचा नम्रपणे निरोप घेतो आणि सत्यानुसंधानार्थ गयेजवळील अरण्याच्या दिशेने प्रवासास निघतो. (महात्मा गौतम, पृ. ११०-१२१)

संन्यासी सिद्धार्थ प्रवास करत गयेच्या दिशेने चालला असता एक शोकमग्न स्त्री सिद्धार्थकडे येते व त्यास सर्पदंशाने मृत झालेल्या पुत्रास जिवंत करण्याची विनंती करते. तेव्हा 'मनाने असंतुलित झालेल्या दुःखी स्त्रीला मृत्यूची सार्वत्रिकता व शाश्वतता समजावी.' यासाठी सिद्धार्थ तिला 'ज्या घरातून कोणीही कधीही मरण पावलेले नाही अशा घरातून काळे तीळ आणल्यास मृत पुत्रास पुन्हा जिवंत करता येईल.' असे सांगतो. त्यानंतर कोणत्याही घरातून काळे तीळ न मिळाल्याने ती स्त्री सिद्धार्थची पुन्हा भेट घेते व त्यास उपयुक्त काळे तीळ शोधून देऊन मृत पुत्रास जिवंत करण्याची पुन्हा विनंती करते. तेव्हा 'बाई, तू जेथे जेथे गेलीस तेथे तेथे तुला कोणीतरी कधीतरी मरून गेल्याचे समजले. आता ज्याअर्थी तुला कोठेही काळे तीळ मिळाले नाहीत त्याअर्थी तुझा मृत पुत्र पुन्हा जिवंत होणे शक्य नाही, हे तू निश्चयाने समज. मृत्यूची गती अप्रतिहत आहे. तो केव्हा कोठे शिरेल, याचा काही नियम नाही. त्यामुळे आपण त्याचा तडाखा निमूटपणे व धैर्याने सोसला पाहिजे.' असा उपदेश करून सिद्धार्थ मृत्यूची सार्वत्रिकता आणि शाश्वतता त्या शोकमग्न स्त्रीच्या लक्षात आणून देतो. त्यानंतर ती स्त्री मनातील शोक आवरते आणि मृत पुत्राचा अंत्यविधी करण्यासाठी निघून जाते. (महात्मा गौतम, पृ. ११३-१२२)

पुढे राजगृहमधील यज्ञमंडपात संन्यासी सिद्धार्थने मांडलेले नवविचार ऐकून प्रभावित झालेले कौंडिण्य, वासव, भद्रक, महानाद व अश्वजित हे पाच तपमार्गी ब्राह्मण सिद्धार्थची संमती घेऊन त्याच्यासह प्रवास करू लागतात. प्रवासात पाच तपस्व्यांचे सिद्धार्थशी अंतिम ध्येयाबाबत व ध्येयप्राप्तीच्या मार्गाबाबत मतभेद होतात. त्यामुळे ते सिद्धार्थपाशी मतभिन्नता व्यक्त करून त्याची साथ सोडतात आणि दुसरीकडे निघून जातात. सहकारी अर्ध्या वाटेत सोडून गेले तरी सिद्धार्थ हताश न होता एकट्याने गयेच्या दिशेने प्रवास करतो व गया परिसरात येऊन निरंजना नदीकाठच्या सेनानी गावाजवळच्या दाट जंगलातील ताडवृक्षांच्या कुंजात एक चांगली जागा हेरून तेथे तपश्चर्या करण्यास प्रारंभ करतो. (महात्मा गौतम, पृ. १२३-१२६)

अनेक दिवस तपश्चर्या केल्यानंतरही संन्यासी सिद्धार्थला सत्यतत्त्वाचा शोध लागत नाही. त्यामुळे तो 'सत्यतत्त्व प्राप्त झाल्याशिवाय आसन सोडायचे नाही.' असा विचार करून अन्न व निद्रा न घेता कडक तपश्चर्या करतो; पण बराच काळ उपाशीपणे तप केल्याने सिद्धार्थची तब्येत खालावते आणि तो बेशुद्ध पडतो. तेव्हा एक तरुण गुराखी सिद्धार्थच्या तोंडात वरून शेळीचे दूध घालून त्याचे प्राण वाचवतो आणि त्यास आणखी दूध पाजण्यासाठी 'आपल्यासारख्या थोर तपस्व्यास स्पर्श केला तर चालेल का? असा प्रश्न विचारतो. तेव्हा 'ज्यांच्या अंगी दयाशीलता आहे, तेच प्राणी धन्य असून श्रेष्ठ आहेत आणि ज्यांना दयेचा विकारच नाही ते नीच व शूद्र आहेत. मुला, दयाशीलतेच्या गुणामुळे तू निःसंशयपणे श्रेष्ठ आहेस; म्हणून तू मला निःशंक मनाने दूध पाज.' असा दयाशीलतेला व सदाचरणाला महत्त्व देणारा विचार मांडून सिद्धार्थ गुराख्यांचे प्रबोधन करतो. सिद्धार्थचे जन्म-कुल-गोत्र-धर्म-जात-पंथापेक्षा करुणेस व सत्कर्मास महत्त्व देणारे बोलणे पटल्याने तो गुराखी निश्चिंत होऊन सिद्धार्थच्या तोंडी दुधाचे भांडे लावतो आणि सिद्धार्थला बरे वाटू लागल्यावर त्याचा निरोप घेतो. त्यानंतर 'गुराख्याने दूध पाजले नसते, तर मी सत्यशोधन करण्याआधीच काळाच्या भक्ष्यस्थानी पडलो असतो. त्यामुळे मला सत्यशोधनाचे कार्य सिद्धीस नेण्यासाठी मध्यममार्ग अवलंबला पाहिजे व प्राणधारणापुरते अन्नसेवन करत चिंतन, मनन केले पाहिजे.' असे ठरवून संन्यासी सिद्धार्थ अरण्यात जाऊन फळे वगैरे खातो व पुन्हा तपश्चर्या आणि ध्यानधारणा करू लागतो. (महात्मा गौतम, पृ. १२६-१३१)

याप्रमाणे 'महात्मा गौतम'च्या चौथ्या भागात भसे यांनी मानवजातीस दुःखमुक्त करण्याचे ध्येय समोर ठेवून संन्यासधर्माप्रमाणे वर्तन करणारा आणि सर्वसामान्य जनतेत प्रबोधनाचे कार्य करणारा संन्यासी सिद्धार्थ साकारलेला दिसतो.

**२.५ संन्यासी सिद्धार्थची ज्ञानसाधना, गौतम बुद्धांचा उदय आणि बुद्धांनी केलेली नवधर्मस्थापना :**

एके दिवशी गया परिसरातील सेनानी गावात राहणारी सुजाता नावाची सद्गुणी गवळण पुत्रप्राप्तीचा नवस फेडण्यासाठी अरण्यात येते व तेजस्वी कांतीच्या संन्यासी सिद्धार्थला वनदेवता समजून त्यास दुधाची खीर अर्पण करते. तेव्हा सिद्धार्थ सुजाताने भक्तिभावाने दिलेली खीर पिऊन तिचे कुशल-मंगल विचारतो. त्यावेळी बोलता बोलता 'काय व्हायचे असेल ते खुशाल होवो, कर्तव्यनिष्ठा म्हणून सोडावयाची नाही, एवढे एकच तत्त्व मला माहीत आहे.' असे कर्तव्यनिष्ठेचे तत्त्व सुजाता सिद्धार्थास सांगते. त्यानंतर सुजातामुळे कर्तव्यनिष्ठेची जाणीव झाल्याने गुणग्राहक वृत्तीचा सिद्धार्थ सुजाताचे आभार मानतो आणि 'काय वाटेल ते होवो; पण बुद्धत्व प्राप्त झाल्यावाचून मी हे आसन सोडणार नाही.' अशी प्रतिज्ञा करून एकाग्रतेने ध्यान करू लागतो. तेव्हा

आत्मबोध, संदेह, मार हे मनोविकार सिद्धार्थच्या ध्येयमार्गात लुडबूड करून त्याचे मन विचलित करण्याचा प्रयत्न करतात; पण सिद्धार्थ संयमाने सर्व मनोविकारांचा पराभव करून सम्यक सम्बुद्धीची सिद्धी प्राप्त करतो. शेवटी समस्त प्राणिमात्रांस कर्मप्रवृत्त करणारी महाशक्ती संन्यासी सिद्धार्थच्या अनुभवास येते आणि मानवजातीच्या दुःखमुक्तीचे सत्यतत्त्व प्राप्त होऊन तो जन्म-मृत्यूच्या बंधनातून बाहेर पडतो. अशाप्रकारे संन्यासी सिद्धार्थचे परमशांत महाकारुणिक अशा दिव्यकांतीच्या महात्मा गौतम बुद्धांमध्ये रूपांतर होते. (महात्मा गौतम, पृ. १३१-१४०)

सम्यक सम्बुद्धी प्राप्त झालेले महाप्रज्ञावंत बुद्ध महाराज गैरिक वसन धारण करून गयेतील अरण्यात बसतात व कार्यकारणभावाच्या तत्त्वाधारे दुःख, दुःखाची उत्पत्ती, दुःखाचा नाश व दुःखनाश करण्याचा उपाय अशा क्रमाने मानवजातीच्या दुःखमुक्तीविषयी सखोल चिंतन करतात. तेव्हा त्यांस दुःखाची उकल मांडणारे प्रतीत्यसमुत्पाद तत्त्व प्राप्त होते. प्रतीत्यसमुत्पादाच्या आधारे अविद्या हेच दुःख व अधोगामी अवस्थेचे मुख्य कारण असल्याचे लक्षात आल्यावर 'वासना निरोध, अहिंसा व परोपकार या तीन तत्त्वांअधारे सम्यकपणे वर्तन केल्यास अविद्येचा व दुःखाचा नाश होतो.' हे बुद्ध महाराजांच्या लक्षात येते. त्यामुळे ते दुःखाचा नाश करण्यासाठी सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाक्, सम्यक् कर्म, सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती व सम्यक् समाधी असा अष्टांगिक मार्ग शोधून काढतात आणि गयेतून बाहेर पडून स्वतः शोधलेल्या नवधर्माचा प्रसार करू लागतात. (महात्मा गौतम, पृ. १३१-१४० व पृ. १५१-१५२)

याप्रमाणे 'महात्मा गौतम'च्या पाचव्या भागात परिश्रम व संयमाच्या साहाय्याने मानवी गुणांचा सर्वोच्च विकास साधून सम्यक सम्बुद्धीवर आधारित बुद्धत्व प्राप्त करणारे आणि उच्च दर्जाच्या प्रज्ञेद्वारे नवधर्मस्थापना करणारे सिद्धार्थ गौतम बुद्ध, भसे यांनी चित्रित केलेले दिसतात.

**२.६ बुद्ध महाराजांचे नीतिमत्तेवर आधारित नवधर्मप्रसाराचे कार्य :**

बुद्धत्व प्राप्त करून जीवनानुभवावर आधारित नवीन मानवतावादी धर्म स्थापन केल्यावर गौतम बुद्ध महाराज स्वतःच्या असामान्य अशा दैवी वाणीच्या आधारे प्रतीत्यसमुत्पाद तत्त्व, चार आर्य सत्ये आणि आर्य अष्टांगिक मार्गाचा सर्वांस उपदेश करतात. तेव्हा बुद्धांच्या नवधर्मातील सत्य, अहिंसा, अस्तेय, संयम व व्यसनशून्यता ही पंचशील तत्त्वे पटल्याने स्वतःच्या व अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी यज्ञविद ब्राह्मण यज्ञाचा खटाटोप थांबवितात, क्षत्रिय वीर शस्त्र म्यान करून युद्ध बंद करतात, घातकी लोक सुऱ्या फेकून देतात, चोर लोक अपहरण केलेले द्रव्य ज्याच्या त्याच्या घरात नेऊन टाकतात, दुष्ट लोक वाईटपणा सोडून मन शुद्ध करतात. याप्रमाणे गौतम बुद्धांच्या नवधर्मप्रसाराच्या कार्यामुळे बुद्धकालीन भारतवर्षात अल्पावधीत मोठ्या प्रमाणात सकारात्मक सामाजिक परिवर्तन घडून येते आणि बुद्धांस हस्तिनापूरचे व्यापारी, कौंडिण्य, वासव, भद्रक, महानाद, अश्वजित, राजपुत्र यशद, मगधराज बिंबिसार, काश्यप, आनंद इत्यादी विविध स्तरांतील हजारो अनुयायी प्राप्त होतात. त्यानंतर बुद्ध महाराज गया, सारनाथ, राजगृह या मार्गाने प्रवास करून लोकांस नवधर्माचा उपदेश करून कपिलवस्तु परिसरातील न्याग्रोधगावात येतात. तेव्हा महाराणी यशोधरा बुद्ध महाराजांस प्रणाम करून त्यांस स्वतःला आणि राहुलला नव्या धर्मात प्रवेश देण्याविषयी विनंती करते. तेव्हा 'यशोधरे, तू सिद्धार्थच्या अर्धांगिनीला जे शोभेल, तेच केले आहेस. माझ्या धर्मच्छत्रात स्त्रीपुरुष, उच्चनीच हा भेदभावच नाही.' या शब्दांत यशोधरेचा उचित गौरव करून बुद्ध महाराज यशोधरेला आणि राहुलला 'बुद्धं शरणं गच्छामि । धम्मं शरणं गच्छामि । संघं शरणं गच्छामि ।।' असा दीक्षामंत्र देऊन आपल्या नवधर्मात समाविष्ट करून घेतात. 'हिंसा करू नका, चोरी करू नका, विषयोपभोगाला मर्यादा ठेवा, असत्य बोलू नका आणि मादक पदार्थांचे सेवन करू नका. अशा माझ्या पाच धर्माज्ञा आहेत. जो त्यांचे पालन करील त्यास निर्वाणप्राप्ती होऊन तो जीवन्मुक्त बनेल आणि सर्वांनी या धर्माज्ञा पाळल्यास सर्व जग सुखाच्या शिखरावर जाईल.' असे बुद्ध महाराजांचे कळकळीचे आवाहन ऐकल्यावर न्याग्रोधगावात जमलेले कपिलवस्तु राज्यातील लोक बुद्धांच्या म्हणण्यास उस्फूर्त प्रतिसाद देऊन त्यांच्या नवधर्मात सामील होतात. (महात्मा गौतम, पृ. १४०-१४७)

पुढे बुद्ध महाराज भिक्षुणी यशोधरा, श्रामणेर राहुल, भिक्षू देवदत्त, भिक्षू नंद आदी हजारो भिक्षू शिष्य व अनेक संसारी अनुयायांसह कपिलवस्तुला येऊन मातापित्याचे दर्शन घेतात. त्या वेळी शुद्धोदनराजा बुद्ध महाराजांस भिक्षापात्र टाकून कपिलवस्तुच्या सिंहासनावर बसण्याची विनंती करतो; पण 'बाबा, मी प्राचीन बुद्धांचा भिक्षा मागून जगाला ज्ञानदान करण्याचा कुलधर्म स्वीकारला आहे. त्यामुळे मला आपल्या राज्याची अपेक्षा नाही. आपण राज्याचा वाटेल तसा विनियोग करावा.' अशा आशयाचे उद्गार काढून बुद्ध महाराज शुद्धोदनच्या विनंतीस नकार देतात. तेव्हा वयोवृद्ध शुद्धोदनराजा सिद्धार्थच्या नवधर्माचा स्वीकार करतो. त्यानंतर बुद्ध महाराज यशोधरा, राहुल, देवदत्त, नंद इत्यादी भिक्षू-भिक्षुणींसह कपिलवस्तुचा त्याग करतात व देशोदेशी धर्मप्रसार करत फिरू लागतात. काही वर्षे उलटल्यावर वार्धक्याने जर्जर झालेल्या शुद्धोदनराजास मृत्यू समीप आल्याची कल्पना येते.

त्यामुळे तो राजदूताद्वारे बुद्ध महाराजांस कपिलवस्तुला बोलावून घेतो. त्यानंतर बुद्ध महाराज शिष्यांसह कपिलवस्तुला येऊन शुद्धोदनराजाची भेट घेतात. चक्रवर्ती सम्राटाहून श्रेष्ठ असे महात्मापद प्राप्त केलेल्या प्रिय पुत्राची भेट झाल्यावर वृद्ध शुद्धोदनराजा समाधानाने मरण पावतो. त्यानंतर बुद्ध महाराज पुत्रधर्माप्रमाणे पित्याची अंत्येष्टी क्रिया चांगल्याप्रकारे करून कपिलवस्तु राज्य एका दूरच्या आप्तास देऊन कपिलवस्तुचा त्याग करतात आणि सारनाथ, गया, राजगृह, पाटलीपुत्र, नालंदा, कुशीनगर इत्यादी वेगवेगळ्या ठिकाणांना भेटी देऊन व नालंदा येथील विहारातील विद्यार्थ्यांना नवधर्माविषयी अध्यापन करून अनेक वर्षे नवधर्मप्रसाराचे कार्य करत राहतात. (महात्मा गौतम, पृ. १४७-१४८ व पृ. १५८-१६०)

यាप्रमाणे 'महात्मा गौतम'च्या सहाव्या भागात भसे यांनी उच्च दर्जाचे विचार प्रभावीपणे मांडून स्वतःच्या नीतीयुक्त नवधर्माचा प्रसार करणारे आणि त्याद्वारे संपूर्ण भारतवर्षातील समाजजीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारे प्रगल्भ मनाचे महात्मा गौतम बुद्ध उलगडून दाखविलेले दिसतात.

**२.७ महात्मा बुद्धांचा अंतकाळ आणि महानिर्वाण :**

राजगृह परिसरातील वेणुवनात वास्तव्यास असताना महात्मा बुद्ध ऐंशी वर्षांचे होतात. वृद्धावस्था प्राप्त झाल्यावर आपला निर्वाणसमय जवळ येऊन ठेपल्याचे त्यांच्या लक्षात येते. त्यामुळे ते भिक्षू काश्यप नावाच्या प्रमुख शिष्यास 'तू माझे कार्य पुढे चालव आणि हे अमृततत्त्व सगळ्या जगाला सुलभ करून टाक.' अशी आज्ञा देऊन काश्यपवर भावी बौद्धधर्माची धुरा सोपवितात आणि सर्व शिष्यांस स्वतःच्या निर्वाणाची कल्पना देऊन त्यांस 'एकसारखा धर्माचा प्रसार करत रहा आणि कालत्रयीही धर्मपराङ्मुख होऊ नका.' असा उपदेश करतात. सर्व भिक्षूंनी बुद्धगुरुजींची आज्ञा शिरसावंद्य मानल्यावर बुद्ध महाराज कुशीनगरजवळ देहत्याग करण्याचे ठरवून मोजक्या शिष्यांसह कुशीनगरच्या दिशेने प्रवासास निघतात. (महात्मा गौतम, पृ. १४९)

प्रवासात बुद्ध महाराजांची चंड नावाच्या व्याधाशी गाठ पडते. तेव्हा चंड बुद्धांच्या सत्कारार्थ डुकराच्या मांसाचे अन्न तयार करतो व बुद्धांस भोजन ग्रहण करण्याची विनंती करतो. त्यानंतर जातिभेद न मानणारे बुद्ध महाराज चंडने देऊ केलेले अन्न मोठ्या संतोषाने भक्षण करतात; पण वृद्धावस्थेत जड मांसान्न पचविण्याची शक्ती नसल्याने वयोवृद्ध बुद्धांना आमांशाचा विकार जडतो आणि त्यांची तब्येत खालावू लागते. प्रकृती क्षीण झाल्याचे जाणवत असले तरी बुद्ध महाराज सर्व भिक्षू शिष्यांस विविध प्रकारचा धर्मोपदेश करत सतत प्रवास करतात व रात्रीच्या वेळी कुशीनगर परिसरातील एका वटवृक्षाखाली विश्रांती घेतात. बुद्धांचे महानिर्वाण जवळ आल्याचे समजल्यावर सर्व भिक्षुसंघ शांत-गंभीर होतो. तेव्हा ''शिष्य हो, मी जरी हे जग सोडून चाललो असलो तरी माझे सत्यतत्त्व अक्षय राहणारे आहे आणि त्याच्या संवर्धनाचा सतत प्रयत्न करत राहणे हे प्रत्येक भिक्षूचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य जोपर्यंत तुम्ही करत आहात तोपर्यंत मी तुमच्या जवळच आहे, असे समजा!'' असे अंतिम शब्द उच्चारून बुद्ध महाराज शांत, समाधानी आणि कृतकृत्य अवस्थेत महानिर्वाणास जातात. (महात्मा गौतम, पृ. १४९-१५०)

याप्रमाणे 'महात्मा गौतम'च्या सातव्या भागात निर्वाणसमय जवळ आल्याचे समजल्यावर नवधर्माची आणि धर्मसंघाची सुव्यवस्था लावणारे, चंड व्याधाने दिलेले मांसान्न स्वीकारून समतेच्या आणि माणुसकीच्या तत्त्वास महत्व देणारे निर्वाणमय बुद्ध महाराज भसे यांनी रेखाटलेले दिसतात.

अशाप्रकारे आपल्याला प्र. श्री. भसे यांच्या 'महात्मा गौतम' कादंबरीच्या कथानकाद्वारे सिद्धार्थ गौतम बुद्धांची विविध रूपे थोडक्यात स्पष्ट करता येतील.

**३. प्र. श्री. भसे यांच्या 'महात्मा गौतम'मधून प्रत्ययास येणारी बुद्धप्रतिमा :**

प्र. श्री. भसे यांच्या 'महात्मा गौतम' कादंबरीतील कथानकाचा आढावा घेतल्यास या कादंबरीत आई-वडिलांचा आदर करणारे, गुरूंकडून नम्रपणे ज्ञान प्राप्त करणारे, एकांतवासात बसून ध्यानधारणा करण्याची आवड असलेले, जखमी हंसाचा जीव वाचविणारे, आजूबाजूचे लोक कृत्रिमपणे वागू लागल्यावर सावध होणारे, पत्नी-पुत्रावर प्रेम करणारे, मानवी जीवनातील विविध दुःखांची प्रचिती आल्यावर अस्वस्थ होणारे, सर्व मानवांच्या दुःखमुक्तीचे सत्यतत्त्व शोधून काढण्यासाठी सर्वसंगपरित्याग करणारे, प्रिय बाबींच्या वियोगाचे दुःख आतल्या आत पचविणारे, देहदंडनाचा मार्ग बुद्धीला न पटल्याने त्यापासून दूर होणारे, पशुबळीवर आधारित यज्ञ पापमय असल्याचे जाहीरपणे सांगून मुक्या प्राण्यांचा जीव वाचविणारे, पुत्रशोकमग्न दुर्दैवी स्त्रीस काळ्या तीळांच्या दृष्टांताद्वारे मृत्यूची सार्वत्रिकता व शाश्वतता पटवून देणारे, मतभेद व्यक्त करून अर्ध्या वाटेत सोडून गेलेल्या सहकाऱ्यांस स्वतःस प्राप्त झालेले ज्ञान देऊन अनुयायी बनविणारे, ध्येयमार्गात कितीही संकटे आली तरी विचलित न होणारे, आशावादी राहून ध्येयप्राप्तीसाठी अविरत कष्ट घेणारे, कर्तव्यनिष्ठेचे तत्त्व सांगणाऱ्या सुजाताचे आभार मानणारे, अंतर्गत मनोविकारांशी लढून बुद्धत्व प्राप्त करणारे, नीतिमत्तेवर आधारित नवधर्माची स्थापना करणारे, उच्च दर्जाचे आदर्श जोपासणाऱ्या पत्नीचा उचित गौरव करून तिला आणि पुत्राला नवधर्मात सामावून घेणारे, 'जन्मापेक्षा सत्कर्माने, दयाशीलतेने माणूस मोठा होतो.' असा उपदेश करून गुराख्यांचे प्रबोधन करणारे, अंतिम समय जवळ आल्यावर

निरवानिरव करता करता धर्म-संघाची सुव्यवस्था लावणारे, वृद्धापकाळी चंड व्याधाने भक्तिभावाने दिलेले मांसान्न खाऊन जातिभेद मोडणारे, अखेरपर्यंत सत्शीलपणे वागून स्वतःच्या धर्माचा प्रसार करणारे, आयुष्यभर इतरांचा विचार करत त्यागमय जीवन जगणारे आणि अंतकाळी समाधानी अवस्थेत महानिर्वाणास जाणारे असे उच्च दर्जाचे महापुरुष म्हणून सिद्धार्थ गौतम बुद्ध समोर येतात आणि त्यांच्या जीवनातील प्रत्येक टप्प्यावर निरागसता, निर्मळपणा, नम्रता, जिज्ञासूपणा, जागरूकता, सावधपणा, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, एकाग्रता, तार्किकता, चिंतनशीलता, अचूक अनुमानक्षमता, कष्टप्रियता, कर्तव्यनिष्ठा, सत्यप्रियता, विवेकीपणा, प्रसंगावधानक्षमता, संयमीपणा, सम्यकता, सहृदयता, संवेदनशीलता, दयाळूपणा, स्पष्टवक्तेपणा, निर्भीडपणा, कृतज्ञपणा, सचोटी, चिकाटी, चिवटपणा, लवचिकता, परिवर्तनशीलता, पुण्यशीलता, गुणग्राहकता, भाषाप्रभुत्व, क्षमाशीलता, निःस्पृहता, निःस्वार्थीपणा, निर्मोहीपणा, शिष्टाचारपालन वृत्ती, ध्येयवादी वृत्ती, आशावादी वृत्ती, उदारमतवादी वृत्ती, सहिष्णु वृत्ती, सुधारणावादी वृत्ती, परोपकारी वृत्ती, मानवतावादी वृत्ती इत्यादी सद्गुण विविध तऱ्हेने प्रकट होत राहतात. थोडक्यात, प्रभाकर भसे यांच्या 'महात्मा गौतम' कादंबरीत पात्र-प्रसंग-वातावरणाच्या वैशिष्ट्यपूर्ण मांडणीमुळे सिद्धार्थ गौतम बुद्धांच्या चैतन्यमय व्यक्तिरेखेचा साक्षात प्रत्यय येतो आणि वाचकांच्या मनात प्रेरणादायी अशी मानवतावादी बुद्धप्रतिमा झळाळून निघते, असे आपल्याला म्हणता येईल.

**४. समारोप :**

प्र. श्री. भसे यांच्या 'महात्मा गौतम' कादंबरीने सिद्धार्थ गौतम बुद्ध यांस चरित्रनायक करून व गौतम बुद्धांचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवनचरित्र थोडक्यात मांडून गौतम बुद्धांच्या जीवनाचा परिचय करून दिला आहे आणि गौतम बुद्धांची मानवतावादी प्रतिमा अधोरेखित केली आहे. त्यामुळे कादंबरीच्या रूपात गौतम बुद्धांचे व्यक्तिमत्त्व, भावविश्व, कार्यकर्तृत्व, जीवनप्रवास यांचा आढावा घेणारी मराठीतील पहिली कादंबरी आणि मराठीतील गौतम बुद्धविषयक चरित्रात्मक कादंबऱ्यांच्या परंपरेचा शुभारंभ करणारी कादंबरी या दृष्टीने भसे यांची महात्मा गौतम ही एक महत्त्वपूर्ण कादंबरी आहे, असे आपल्याला म्हणता येईल.

**संदर्भ :**


१. दडकर जया व इतर (संपादित), 'टिपण - आपटे, हरी नारायण', 'समाविष्ट :- संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश (आरंभापासून १९२० पर्यंतचा कालखंड)', ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, इ. स. १९९८ च्या पहिल्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण : इ. स. २०१३, पृ. ४२.
२. तत्रैव, पृ. ४३-४५.
३. देशपांडे अ. ना. व वऱ्हाडपांडे व. कृ., 'पुरवणी - वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे', 'समाविष्ट :- आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग पहिला - १८७४ ते १९२०', व्हीनस प्रकाशन, पुणे, इ. स. १९९२ च्या दुसऱ्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण : इ. स. २००९, पृ. ६४२-६४३.
४. कुलकर्णी अनिरुद्ध अनंत (संपा.), 'मराठी कादंबरी - डॉ. भालचंद्र फडके', 'समाविष्ट :- प्रदक्षिणा खंड पहिला', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, इ. स. १९४१ च्या प्रथमावृत्तीचे दहावे पुनर्मुद्रण : इ. स. २००७, पृ. २२१.
५. जोग रा. श्री. (संपा.), 'कादंबरी - उषा हस्तक आणि वा. ल. कुलकर्णी', 'समाविष्ट :- मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड पाचवा भाग पहिला - इ. स. १८७५ ते १९२० या कालखंडातील मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास', महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, इ. स. १९७३ च्या प्रथमावृत्तीचे पुनर्मुद्रण : इ. स.१९९९, पृ. ४६३-४६७.
६. दडकर जया व इतर (संपा.), 'टिपण - भसे, प्रभाकर श्रीपत', उपरिनिर्दिष्ट, पृ. ३८९-३९०.
७. जोग रा. श्री. (संपा.), 'परिशिष्ट : एक - काही प्रमुख कादंबरी-लेखक', उनि., पृ. ४९०.
८. दडकर जया व इतर (संपा.), 'टिपण - भसे, प्रभाकर श्रीपत', उनि., पृ. ३८९-३९०.
९. तत्रैव.
१०. तत्रैव.
११. तत्रैव.
१२. जोग रा. श्री. (संपा.), 'परिशिष्ट : एक - काही प्रमुख कादंबरी-लेखक', उनि., पृ. ४९०.
१३. दडकर जया व इतर (संपा.), 'टिपण - भसे, प्रभाकर श्रीपत', उनि., पृ. ३८९-३९०.
१४. तत्रैव.
१५. तत्रैव.
१६. गायधनी रं. ना., 'प्राचीन भारताचा इतिहास', अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, के'सागर पब्लिकेशन्स, पुणे, पूर्णपणे सुधारित पाचवी आवृत्ती : इ. स. २०१५, पृ. १२४.
१७. प्रभाकर उर्फ भसे प्रभाकर श्रीपत, 'महात्मा गौतम', प्रकाशक : पी. एन. भसे - मॅनेजर, भारत गौरव ग्रंथमाला, बॉम्बे, मुद्रक : जी. एन. कुलकर्णी, कर्नाटक प्रेस, बॉम्बे, इ. स. १९१३, मुंबई.


●


**विराज मोरे**

चलभाष : ९८९०३४७८४६

ई-मेल : virajsmore@gmail.com

लेख

**डॉ. राजेंद्र मलोसे**

**विश्राम गुप्ते लिखित, देशमुख आणि कंपनी प्रकाशित 'लेखकाची गोष्ट' या पुस्तकाचे डॉ. राजेंद्र मलोसे यांनी केले परीक्षण.**

# लेखकाची गोष्ट

**'ले**खकाची गोष्ट' श्री. विश्राम गुप्ते यांचं आत्मचरित्र वाचलं.

हे पूर्ण आत्मचरित्र नाही; पण विश्राम गुप्ते म्हणतात त्याप्रमाणे 'लेखक म्हणून घडण्याची खरीखुरी झेन गोष्ट' आहे.

मी काही समीक्षक नाही. मला समीक्षेतलं काही कळत नाही. काहीबाही थोडंसं लिहितो मी. 'लेखकाची गोष्ट' मला समानधर्मी पुस्तक वाटलं म्हणून मी ते पटकन हातात घेतलं असावं.

तसा मी चांगला वाचक आहे. म्हणूनही पुस्तक मी एका बैठकीत वाचलं.

मी वाचून आनंदी झालो.

हा आनंद व्याकूळ आनंद होता, कारण असं माझ्या बाबतीतही घडलं असेल कदाचित. तसा मी दबकूनही गेलो. मला दाटून आलं; पण हे उदास दाटून येणं, पाऊस येण्याच्या आधीच्या उदास आभाळाचं दाटून येणं होतं.

हा लेख 'लेखकाची गोष्ट' या गाईडची ओळख आहे, असं वाचकांनी समजावं. 'गाईड' हा शब्द स्वतः लेखक विश्राम गुप्ते यांनीच वापरलाय. महाराष्ट्र देशी 'गाईड' हा शब्द बदनाम आहे. त्या अर्थाने हे गाईड नाही. हे पुस्तक मार्गदर्शक आहे. वाचकांसाठी आणि सर्व नवीन लेखकांसाठी. मला वाटतं माझ्यासाठीही.

लेखक विश्राम गुप्ते लहानपणापासून वाचत गेले. चांदोबा, कुमार, फास्टर फेणे, पुढे बाबूराव अर्नाळकर, चंद्रकांत काकोडकर.... इंग्रजीकडे वळले. जेम्स हॅडली चेस ते लस्ट फॉर लाइफ, हंड्रेड इयर्स सॉलटीट्युड ते सिग्मंड फ्राईड, टॉलस्टॉय, वॉर अँड पीस---- इंग्रजी, जर्मनी, फ्रेंच असे सगळेच लेखक त्यांनी वाचले, आणि असं काय काय त्यांनी वाचलं, त्यांना ते पचलं, त्याचे दाखले ते या पुस्तकात जागोजागी देतात .




वाचून लेखक थबकले. 'देव, देव' करायला लागले. पोथ्यांची पारायणं केली.

एक दिवस विवेकानंद वाचले. रामकृष्ण परमहंस यांचं तर त्यांना फारच सगळं आवडलं. प्लेटो आणि जे. कृष्णमूर्ती - (तेही लेखक विशीत असताना) समरसून वाचले. त्यांना कळालेपण!

पुढे कधीतरी जी. ए. कुलकर्णी, चि. त्र्यं. खानोलकर, दुर्गा भागवत, ग्रेस, इंदिरा संत, द. भि. कुलकर्णी, अरुण साधू, श्री. ना. पेंडसे, मराठी लेखक त्यांनी वाचले.

'कोसला' खूप नंतर त्यांनी वाचले. (हे सगळं तर मीही वाचत होतो की!)

ते स्वतःचा शोध घेत होते का? वाचनामुळे त्यांना 'अस्मिता संकट' (आयडेंटिटी क्रायसिस) आलं का? त्यांचा ओळखभ्रम वाढला. त्यांनाही महारोगी दिसला रस्त्यावरचा, बाबा आमटेंसारखा.

बाबा आमटे हा महत्त्वाचा टप्पा होता त्या काळी. लेखक समाजकार्याकडे वळले. तेथेही भ्रमनिराश झाले का? आईचं दूरवर असणं, नसणं, ओळखसंभ्रम अजूनच वाढला का?

वकील झाले.

तेथे कमाई की 'खरी कमाई'?

वाचन तुम्हाला काय शिकवतं?

सत्याचा शोध की सामाजिक धडपड?

की वाचन, लिहायला सुचवत असतं----? 'जोनाथन लिविंग्स्टन सीगल' ही रिचर्ड बाखची कथा तुम्हाला कुठे नेते?

आणि 'हू मुव्हड माय चीज?'

मधे काही काळ त्यांनी झोपडपट्टीत काम सुरू केलं. (सेवाभाव) सामाजिक सेवा म्हणून.

तेथे काम करताना त्यांना डॉ. शीला भेटल्या. त्या स्त्रीरोगतज्ज्ञ.

त्या शिकत असताना, लेखकाने त्यांना प्रेमाची, लग्नाची मागणी घातली.

त्यांचं लग्न झालं.

कमाई कमी, सत्य वागणं, वकिलीत सत्य वागणं; त्यामुळे सगळं काही गणित जमेना.

त्यांनी ठरवलं या माहीत असलेल्या नागपूरपासून, माहीत असलेल्या जगापासून, तोडून घ्यायचं.

गोव्याला गेले.

तेथे डॉ. शीलाला नोकरी मिळाली.

पण लोकांसाठी विश्राम गुप्ते होते 'होम मेकर'. त्यात ते 'भायले', म्हणजे गोव्याच्या बाहेरचे लोक. गोव्यात अशा लोकांना 'भायले' म्हणतात. लेखकाला तर लिहायचं होतं. व्याकूळ निराशा त्यांच्या पदरी पडली .

त्यात लोक विचारीत, 'तुम्ही काय करता?' भारतीय समाजात नवऱ्याने कमवायचं असतं, आणि बायकोने संसार बघायचा असतो.

विश्राम गुप्ते परत शिकले.

एम. ए. तत्त्वज्ञान झाले, आणि गोव्यात प्राध्यापक झाले. तरी ते 'भायले'च राहिले, बाहेरचे.

वाचन जबरदस्त, त्यात लिहिणं काही जमेना. अस्मिता संकट वाढत चाललेलं.

त्यात डॉ. शीलाने निर्णय घेतला सौदी अरेबियाला जायचं. तिथे डॉक्टर म्हणून काम करायचं.

विश्राम गुप्ते तेथे एकटे पडले.

एकांत आणि एकटेपणा या दोन्ही गोष्टी!

ते परत व्याकूळ निराशेत अडकले. तेथेही मार्ग काढून त्यांनी वाचन चालूच ठेवले. खूप प्रयत्न करून, बैठक मारून, लिहिण्याचा सराव करून (हो, लिहिण्याचा सराव लागतो हा माझाही अनुभव आहे. तुम्ही रोज लिहिलेच पाहिजे.) त्यांनी लिहिणं चालू ठेवलं. लिहून पाठवलं नेमाडे सरांना आणि त्याआधी जे लिहिलं होतं, ते मौजेला पाठवलं होतं. पण पण पण----

सौदीतून आल्यानंतर त्यांनी ठरवलं, पूर्ण वेळ लेखक व्हायचं .

अजूनही ते सकाळपासून दुपारी तीन वाजेपर्यंत लिहितात. बैठक मारून लिहितात.

ते म्हणतात, सेल्फ कॉन्शस लिहिणं ही लिहिण्याची प्रॅक्टिस असते. यासाठी लिहिण्याची कृती आवश्यक असते. ह्या कृतीची अतोनात प्रॅक्टिस केली, की मग ही कृती सहज होऊ शकते. सहज होता होता लिखाण जाणिवेचा भाग होतं. हे लिहिण्याचं 'झेन' आहे.

आपल्या आंतरिक अस्तित्वाचा गाभा काय आहे हे निमिषार्धात कळल्यानंतर बाह्य आणि बौद्धिक संस्कारांचे साखळदंड गळून पडण्याच्या साक्षात्कारी क्षणाला बहुधा ते झेन मास्टर्स 'झेन' म्हणत असावेत.

झेन ही क्रिया नाही.

झेन प्रक्रिया नाही.

झेन युक्तिवाद नाही.

झेन वाद-विवाद नाही.

झेन म्हणजे अस्तित्वाचा साक्षात्कार आहे.

म्हणून पूर्ण पुस्तकभर विश्राम गुप्ते ते लिहिण्याचं झेन झालं, 'लिहिणं झेन आहे,' असे शब्दप्रयोग वापरतात. त्यांचं लिहिणं म्हणजे त्यांच्या अस्तित्वाचा साक्षात्कार आहे .

ते पुढे म्हणतात, ''लिहायचं म्हणून लिहिता येतं नसतं. तरीही लिहिण्याची धडपड थांबवायची नसते. ते लिहून काही साध्य झालं नाही तरी ही धडपड केल्याचे समाधान कमी नसतं.

''अस्तित्व उजळून निघेल असं काही तरी लिहावं, असं सारखं वाटायचं.

**'लेखकाची गोष्ट' या पुस्तकामधील त्यांची भाषा, शब्द हे सामान्य वाचकांना थोडंसं क्लिष्ट प्रकरण वाटण्याची शक्यता आहे; पण पुस्तकाची गतिमानता त्याच्या खरेपणामुळे, नैतिकतेमुळे आणि प्रांजळपणामुळे वाढत जाते. त्यामुळे सामान्य वाचक हे पुस्तक पटकन वाचून टाकेल. लेखकाने व्यायाम करावा म्हणजे त्याची लिखाणाची बैठक वाढू शकते आणि चिंतन, व्यायामकाळात होऊ शकते, हा मुद्दा लेखकाने का लिहिला नाही कुणास ठाऊक?हे पुस्तक हातात घेतलं आणि एकदम छान वाटलं. सुबक वाटलं. 'देशमुख आणि कंपनी'ने हे पुस्तक खूप सुंदर काढलं आहे. मुखपृष्ठ हे फार अर्थपूर्ण आहे. ह्या दोन गोष्टींमुळे वाचनीयता वाढते.**

''लिहिण्याबद्दल वाटणं वेगळं आणि लिहिणं वेगळं.

''त्या काळात मनात खूप गोंधळ (केऑस) होता.

''जोरदार काहीतरी लिहावंसं वाटणं, हा लिहिण्याच्या धडपडीतला अडथळा होता.

''लेखक होणं, म्हणजे भान येणं.

''लेखक होणं, म्हणजे सतत अस्वस्थ राहणं.

''लेखक होणं, म्हणजे कुठेही, कधीच सुखी न वाटणं.''

गोव्यात लिहिता लिहिता, त्यांनी 'सत्यजित' या बाळाचं संगोपन केलं. तेच परत सौदीमध्ये 'अभिजित' या दुसऱ्या मुलाच्या वेळी केलं.

संगोपनाने लेखकाचं अस्तित्व आणि त्याचा साक्षात्कार होतो का? हा वेगळा विचार आहे का? त्याने लेखक अजून वेगळा लिहू शकतो का?

या सर्व काळात विश्राम गुप्ते जे लिहीत होते ते त्यांच्या स्वतःच्या जगण्याच्या भोवती फिरत होतं. हे चांगलं होतं की नाही याचं उत्तर त्यांच्याकडे नाही. हेच त्यांचं 'अस्तित्वसंकट'.

आणि त्यांचं लिहिणं 'झेन' झालं नव्हतं का? जेव्हा झालं, तेव्हा ते लिहित राहिले, लिहित राहिले.

त्यांनी 'नारी डॉट कॉम', 'ईश्वर डॉट कॉम', 'परीकथा आणि वास्तव' लिहिलं.

दोस्तोव्हस्कीच्या 'हाऊस ऑफ द डेड' याचं भाषांतर 'मेलेल्यांची गढी' आणि अनिल अवचट यांचं 'माणसं' ह्या पुस्तकाचं भाषांतर त्यांनी केलं.

समीक्षेची पुस्तके, 'नव जग, नवी कविता' लिहिलं. या सर्व पुस्तकांना त्यांना बरेच पुरस्कार प्राप्त झाले आहेत, आणि मला वाटत नाही पुरस्कारासाठी त्यांनी काही केलं असेल. (लोक करतात, असा लेखकाचा दावा आहे.)

'लेखकाची गोष्ट' या पुस्तकामधील त्यांची भाषा, शब्द हे सामान्य वाचकांना थोडंसं क्लिष्ट प्रकरण वाटण्याची शक्यता आहे; पण पुस्तकाची गतिमानता त्याच्या खरेपणामुळे, नैतिकतेमुळे आणि प्रांजळपणामुळे वाढत जाते. त्यामुळे सामान्य वाचक हे पुस्तक पटकन वाचून टाकेल.

लेखकाने व्यायाम करावा म्हणजे त्याची लिखाणाची बैठक वाढू शकते आणि चिंतन, व्यायामकाळात होऊ शकते, हा मुद्दा लेखकाने का लिहिला नाही कुणास ठाऊक?

हे पुस्तक हातात घेतलं आणि एकदम छान वाटलं. सुबक वाटलं. 'देशमुख आणि कंपनी'ने हे पुस्तक खूप सुंदर काढलं आहे. मुखपृष्ठ हे फार अर्थपूर्ण आहे. ह्या दोन गोष्टींमुळे वाचनीयता वाढते.

ह्या 'लेखकाच्या गोष्टी'त, मोठ्या लेखकाकडून झालेला अपमान आहे. भ्रमनिराशा आहे.

प्रकाशकाकडून झालेली दिरंगाई, अनुल्लेख आहे.

कळपात न गेल्यामुळे झालेली ससेहोलपट आहे.

आणि हे आहेच, की लेखकाला 'तात्त्विक संधिवात' झालेला आहे- म्हणजे काय तर 'स्टीफ बॅक सिंड्रोम'!

म्हणजे लेखकाचा पाठीचा कणा ताठ आहे. वाकायचं नाही. ते हेही मान्य करतात आणि मान्य करतात, की ते जगाकडे तिरकस नजरेने बघत आहेत आणि त्यांच्या अस्तित्व संकटासकट त्यांच्या लिहिण्याची 'झेन होण्याची' ते वाट पाहत आहेत.

लेखक म्हणतात, ''लेखक होणं म्हणजे भानात येणं.

लेखक होणं म्हणजे भोळ्याभाबड्या वाचकांमध्ये मिरवणं अजिबातच नाही. लेखक होणं म्हणजे स्वतःच्या जगण्याची व्हिजन शोधणं.

अनुभव निरीक्षण करणं.

लेखक होणं म्हणजे सतत अस्वस्थ राहणं. लेखक होणं म्हणजे कुठेही, कधीही सुखी न वाटणं.''

मला वाटतं लेखक विश्राम गुप्ते यांच्या लेखनाचं झेन होत राहो!

आमेन! ●

**डॉ. राजेंद्र मलोसे**
maloserajendra@gmail.com
चलभाष : ९४२२२४५२०३

कार्यवृत्त

**प्रकाश पायगुडे**

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे कार्यवृत्त नोंद

## (१ ऑक्टोबर २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९)

**१) दि. १ सप्टेंबर २०१९ : विशेष कार्यक्रमः लोकसाहित्य संमेलन २०१९**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, लोकरंग सांस्कृतिक मंच, ठाणे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राष्ट्रसेवा प्रतिष्ठान, बावधन, पुणे या चार संस्थांच्या पुढाकाराने स. ११ ते सायंकाळी ७:३० पर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात लोकसाहित्याच्या ज्येष्ठ संशोधक डॉ. सरोजिनी बाबर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'लोकसाहित्यसंमेलन २०१९' आयोजित केले होते.

उद्घाटन समारंभ, डॉ. सरोजिनी बाबर यांच्या मुंबई दूरदर्शनवरील 'रानजाई' या गाजलेल्या कार्यक्रमाचा आढावा मीना गोखले यांनी दु. १ते२ सादर केला.

त्याआधी संमेलनाध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. गिरीश बापट, खासदार, मुक्ता टिळक,महापौर, मा. कुमुदिनी पवार, श्री. राजेंद्र यादव, माजी नगराध्यक्ष कराड, दीपक पाटील, संस्थापक कानसा-वारणा फौंडेशन, कर्जत इत्यादि मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ पार पडला. नंतर २.३० ते ४.३० डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सरोजिनी बाबर यांचे महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीच्या जडण-घडणीतील योगदान या विषयावर परिसंवाद झाला. उल्हासदादा पवार, सुधीर पाठक, डॉ. माहेश्वरी गावित, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, प्रा. मिलिंद जोशी, मुकुंद कुळे यांनी या परिसंवादात वक्ते म्हणून सहभाग नोंदविला. सायं. ५ते७ संत साहित्य व लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांचा 'साहित्यातील लोकरंग' हा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. शाहीर हेमंत मावळे यांनी पोवाडा सादरीकरण केले.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष दिलीप वेडे पाटील हे होते. विजयमाला कदम, राही भिडे, शैला खांडगे, मिलिंद लेले, योगेश मोकाटे हे उपस्थित होते. कुमुदिनी पवार यांनी डॉ. बाबर यांच्या आठवणी सांगितल्या. वेडे पाटील यांनी प्रास्ताविक केले. राही भिडे यांनी संमेलनाविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन प्रकाश पायगुडे यांनी, तर आभार प्रकाश खांडगे यांनी मानले.

**२) दि. १७ सप्टेंबर २०१९ : विशेष कार्यक्रम :**

ज्येष्ठ साहित्यिक जयवंत दळवी २५वा स्मृतिदिन कार्यक्रमः- 'स्त्रीपर्व' या कार्यक्रमात दळवींच्या निवडक नाटकांतील नाट्यांशाचे अभिवाचन डॉ. मानसी वागीकर, विनीता पिंपळखरे, डॉ. अमित त्रिभुवन यांनी प्रभावीपणे केले. प्रारंभी डॉ. स्वाती कर्वे व प्रा. मिलिंद जोशी यांनी दळवींच्या नाटकांविषयी व त्यांच्या आठवणींविषयी यथोचित भाषणे दिली.

**३) दि. २६ सप्टेंबर २०१९: विषेष कार्यक्रम :**

९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी फादर फ्रान्सिस दिब्रेटो यांची निवड झाल्यानिमित्त परिषदेतर्फे त्यांचा पहिला जाहीर सत्कार करण्यात आला. हा सत्कार अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते झाला. प्रकाश पायगुडे, प्रा. मिलिंद जोशी, उल्हासदादा पवार, पं. वसंतराव गाडगीळ यांची समयोचित भाषणे झाली. पुण्यातील अनेक साहित्यिक, सामाजिक संस्थांतर्फे दिब्रेटो यांचे सत्कार करण्यात आले. दिब्रेटो यांनी या सत्कारास उत्तर देणारे भाषण केले. पुण्याचे डेप्युटी कमिशनर जातीने हजर होते. त्यांनी या वेळी पोलिस बंदोबस्त चोख ठेवला होता. लक्ष्मीकांत देशमुख, डॉ. न. म. जोशी इत्यादी मान्यवर व परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. कोषाध्यक्ष सुनीताराजे पवार यांनी आभार मानले. प्रारंभी बाबा आमटे यांच्या उचित कवितेचे गायन जयश्री कुलकर्णी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. या समारंभास पुणेकरांनी भरघोस पाठिंबा दिला.

**४) दि. २८ सप्टेंबर २०१९ : पुणे बुक फेअरचे उद्घाटन :** डॉ. दीपक म्हैसकर पुणे आयुक्त यांच्या हस्ते विमानतळ रस्त्यावरील क्रिएटीसीटी मॉलमध्ये भरलेल्या 'पुणे पुस्तक जत्रा' या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. या वेळी मसापच्यावतीने सहयोगी संस्थेचा प्रतिनिधी म्हणून कार्यवाह दीपक करंदीकर, पीएनआर राजन व इतर मान्यवर उपस्थित होते. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, संस्कृत या भाषेतील देशव्यापी प्रकाशकांची सुमारे ३० विक्री केंद्रे या प्रदर्शनात सहभागी आहेत.

**५) दि. २९ सप्टेंबर २०१९:**

गदिमा जन्मशताब्दी वर्षाच्या सांगतेनिमित्ताने मसाप व

शब्दधून आयोजित 'जागर तिचा' हा गदिमांच्या गीतातील स्त्रीरूपे दर्शविणारा सांगीतिक कार्यक्रम खास आयोजित करण्यात आला होता. चैत्राली अभ्यंकर व स्नेहल दामले या गायिका व निवेदिकांनी मिळून गदिमांची 'नाच रे मोरा नाच ते तोडिता फुले मी', 'फड सांभाळ तुऱ्याला गं आलापासून या सुखांनो या' पर्यंतची सुमारे १०ते१२ गाणी सादर केली. प्रा. मिलिंद जोशी यांनी गदिमांविषयी प्रास्ताविक केले.

**६) दि. १५ ऑक्टोबर २०१९: वाचन प्रेरणादिन :**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या अध्यक्षा डॉ. शकुंतला काळे यांच्या हस्ते ग्रंथपालांचे सत्कार करण्यात आले. भांडारकर प्राच्यविद्याच्या ग्रंथपाल मेघना देशपांडे, पुणे नगर वाचन मंडळाच्या सविता गोकुळे, पुणे मराठी ग्रंथालयाच्या संजीवनी अत्रे, गांधी स्मारकाचे ग्रंथपाल कैलास यादव, एसपीच्या प्रतिभा साखरे, रा. पटवर्धन विद्यालयाचे दिलीप भिकुले यांचे सत्कार डॉ. काळे यांचे हस्ते झाले. ग्रंथपालांची उचित भाषणे झाली. डॉ. काळे व प्रा. मिलिंद जोशी यांची भाषणे झाली.

**७) दि. १० ऑक्टोबर २०१९ : एक कवी एक कवयित्री :** या कार्यक्रमात लता ऐवळे व रमजान मुल्ला यांनी आपल्या कविता सादर केल्या. कार्यवाह प्रमोद आडकर व उद्धव कानडे यांनी त्यांची मुलाखत घेतली.

**८) दि. १४ नोव्हेंबर २०१९:**

कै. योगिनी जोगळेकर स्मृतीनिमित्त कविसंमेलनः- आज 'बालदिन' असल्याने बालकुमारांसाठी कविता करणाऱ्या कवींचे कवी संमेलन आयोजित केले होते. आश्लेषा महाजन, कविता क्षीरसागर, संगीता पुराणिक, बाळकृष्ण बाचल, ऋचा कर्वे, सुजाता पवार, सुनेत्रा गायकवाड, अपर्णा आंबेडकर, मधूसूदन घाणेकर, स्वाती यादव, जयश्री देशकुलकर्णी, विजया देव, संध्या गोळे यांनी बहारदार बालकविता सादर केल्या. शिवाय दीपक करंदीकर यांनी 'डॉ. सविता कुलकर्णी' यांची एक बालकविता सादर केली. या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन ऋचा कर्वे यांनी केले. रेणू गावस्कर यांच्या 'एकलव्य' या संस्थेतील १६ मुलेमुली व त्यांचे शिक्षक श्रोते म्हणून खास उपस्थित होते. बालदिनानिमित्त या सर्वांना 'खाऊचे' वाटप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. साहित्य अकादमीचे बालसाहित्य पुरस्कार विजेते लेखक श्री. ल. म. कडू हे प्रमुख पाहुणे होते. त्यांचे व प्रा. मिलिंद जोशी यांची उचित भाषणे झाली. त्यानंतर कविसंमेलन खूप रंगले. प्रारंभी योगिनी जोगळेकर यांच्या प्रतिमेस फुले अर्पण करण्यात आली. जोगळेकर कुटुंबियांपैकी सुधन्वा जोगळेकर उपस्थित होते.

**९) दि. १५ नोव्हेंबर २०१९ :**

त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या जन्मशताब्दीनिमित्त व्याख्यानः- डॉ. प्रिया निघोजकर यांचे 'आत्मनिष्ठ साहित्यिक त्र्यं. वि. सरदेशमुख' या विषयावर व्याख्यान झाले. प्रसिद्ध कवी अशोक नायगावकर यांची विशेष उपस्थिती होती. श्रोत्यांमध्ये डॉ. विलास खोले, मंगला गोडबोले, डॉ. निलिमा गुंडी, डॉ. बर्वे, कवी हेमकिरण पत्की हे मान्यवर उपस्थित होते. प्रा. मिलिंद जोशी, अशोक नायगावकर यांची उचित भाषणे झाली. सरदेशमुखांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते फुले अर्पण करण्यात आली.

**१०) दि. २५ नोव्हेंबर २०१९:**

कै. यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन व्याख्यानः- 'स्मरण यशवंतरावांचे' या विषयावर श्री. अनंत दीक्षित यांचे व्याख्यान झाले. ज्येष्ठ नेते पन्नालाल सुराणा या व्याख्यानाला आवर्जून उपस्थित होते.

**११) दि. २७ नोव्हेंबर २०१९:**

अहिताग्नी शं. श. राजवाडे स्मृतिदिन व्याख्यानः- डॉ. श्री. मा. भावे यांचे 'अहिताग्नींनी पाहिलेले राजकारण' या विषयावर व्याख्यान झाले. गायत्री राजवाडे यांनी अहिताग्नींविषयी मनोगत व्यक्त केले. शैला मुकुंद, डॉ. राजा दीक्षित आदि मान्यवर उपस्थित होते.

**१२) दि. २९ नोव्हेंबर २०१९ :**

कवी माधव जूलिअन स्मृतिदिन व्याख्यानः- डॉ. निलिमा गुंडी यांचे 'माधव जूलिअनः व्यक्तित्व आणि काव्य' या विषयावर व्याख्यान झाले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला हार व पुष्पे अर्पण करण्यात आली.

**१३) दि. २८ नोव्हेंबर २०१९ :**

म. ज्योतिबा फुले स्मृती अभिवादन कविसंमेलनः- महाराष्ट्र साहित्य परिषद व अक्षरभारती पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. मनोहर जाधव यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले. उद्धव कानडे, दीपक करंदीकर, वि. दा. पिंगळे, साहेबराव ठाणगे, समाधान गायकवाड, नंदकुमार कांबळे, किरण मोरे-चव्हाण, निशिकांत देशपांडे, सीताराम नरके, नयन रणदिवे, प्रभा माटे या कवींनी विविधांगी कविता सादर करून फुले यांना अभिवादन केले. रुपाली अवचरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अविनाश सांगोलेकर, माधव राजगुरू, प्रकाश पायगुडे यांनी मनोगते व्यक्त केली. डॉ. जाधव यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेला फुले अर्पण करण्यात आली.

**१४) दि. ४ डिसेंबर २०१९: एक कवी एक कवयित्री :**

या उपक्रमांतर्गत सुचीता खल्लाळ (नांदेड) व अजीम नवाज राही (बुलढाणा) या कवींच्या काव्य वाचनाची मैफल झाली. उद्धव कानडे, ॲड. प्रमोद आडकर यांनी त्यांची मुलाखत घेतली.

●

**नोंद : दीपक करंदीकर**
कार्यवाह, मसाप पुणे

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
# इतर शाखा कार्यवृत्त नोंद

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : नाशिकरोड

**१) दिनांक : शनिवार, १४ सप्टेंबर २०१९ :** कार्यक्रमाचे नाव : 'रंग अक्षरांचे - ६वे पुष्प, खुली पावसाळी काव्य स्पर्धा'

सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी प्रा. अरुण सोनावणे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा नाशिकरोड आयोजित रंग अक्षरांचे या मालिकेतील ६वे पुष्प गुंफले. या वेळी श्री. प्रशांत कापसे यांनी त्यांचा सत्कार केला. स्पर्धेत कवी राज शेळके हे प्रथम, अमोल चिने द्वितीय, तर अरुण इंगळे व नंदकिशोर ठोंबरे तृतीय पुरस्काराचे विजेते ठरले. कार्यक्रमास कार्याध्यक्ष श्री. उन्मेष गायधनी, श्रीम. अर्चना शाळीग्राम, श्री. सुधीर धिवरे, श्री. अभिजित कुलकर्णी, श्रीम. सविता भडकावडे, श्री. ज्ञानेश्वर जेऊघाले, श्री. वसंत गायधनी, श्री. अर्जुन टिळे आदी उपस्थित होते.

**२) शनिवार, २१ सप्टेंबर २०१९ :** कार्यक्रमाचे नाव : 'संवाद सृजनाशी - २६वे पुष्प, श्री. पुंजाजी मालुंजकर'

ग्रामीण साहित्यिक, प्रकाशक तथा इगतपुरी साहित्यिक मंडळाचे अध्यक्ष श्री. पुंजाजी मालुंजकर यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद - शाखा नाशिकरोड आयोजित संवाद सृजनाशी या मालिकेतील २६वे पुष्प गुंफले. या वेळी कार्यकारणी सदस्य श्रीम. सुरेखा गणोरे यांनी त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास ॲड. ज्ञानेश्वर गुळवे, श्री. विजयकुमार मिठे, श्री. दामोदर मानकर, नि.प्र.जि.न्या. श्री. प्रकाश कऱ्हाडकर, श्री. गौरवकुमार आठवले, कार्याध्यक्ष श्री. उन्मेष गायधनी, श्रीम. ज्योती कदम, श्री. विष्णुपंत गायखे आदी उपस्थित होते.

**३) शनिवार, १२ ऑक्टोबर २०१९ :** कार्यक्रमाचे नाव : 'साहित्य संमेलनाध्यक्षांचा नागरी सत्कार - फा. फ्रान्सिस दिब्रिटो'

उस्मानाबाद येथे होणाऱ्या ९३व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांचा महाराष्ट्र साहित्य परिषद - शाखा नाशिकरोडने नागरी सत्कार केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाखा कार्याध्यक्ष श्री. उन्मेष गायधनी होते. विशेष निमंत्रित पूर्व संमेलनाध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देशमुख, मसाप पुणेचे प्र. कार्यवाह यांनीदेखील सत्कार केला. श्री. मिलिंद गांधी यांनी मानपत्र सादर केले.

कार्यक्रमास वसंत व्याख्यानमालेचे श्री. श्रीकांत बेणी, नि. जिल्हाधिकारी श्री. बी. जी. वाघ, अगस्ती कारखान्याचे माजी व्हाईस-चेअरमन श्री. तुकाराम मालुंजकर, साकेत प्रकाशनच्या श्रीम. धारा भांड-मालुंजकर, सावानाचे डॉ. शंकर बोऱ्हाडे व श्री. संजय करंजकर, सिन्नर वाचनालयाचे श्री. पुंजाभाऊ सांगळे, मसाप शाखा सिन्नरचे श्री. मुंगसे, समता वाचनालयाचे श्री. रमेश औटे, लेखिका श्रीम. मुक्ता टिळक, ख्रिस्ती युवा संघटनेचे डॉ. विनीत वानखेडे, लेखक श्री. फ्रान्सिस वाघमारे, आयकर अधिकारी श्री. अनिल गुरव, आदर्श विद्यालयाच्या श्रीम. मनीषा विसपुते, प्र. कार्यवाह श्री. प्रसाद पवार आदी उपस्थित होते.

**४) शनिवार, १२ ऑक्टोबर २०१९ :** कार्यक्रमाचे नाव : 'शाखेच्या ४००व्या सभासदाचे स्वागत करणे'

मसाप पुणेचे प्रमुख कार्यवाह श्री. प्रकाश पायगुडे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद - शाखा नाशिकरोडच्या ४००व्या सभासदाचे स्वागत केले. या वेळी नियोजित संमेलनाध्यक्ष फा. फ्रान्सिस दिब्रिटो, पूर्व संमेलनाध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देशमुख, जिल्हा प्रतिनिधी ॲड. नितीन ठाकरे, सनदी लेखापाल श्री. प्रवीण मालुंजकर, श्री. बाळासाहेब गणोरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीम. सुजाता हिंगे, स्वागत काव्य श्री. गौरवकुमार आठवले, प्रास्ताविक श्री. मनोज नागपुरे, परिचय ॲड. वर्षा देशमुख, आभार कार्यवाह श्री. रवींद्र मालुंजकर, पसायदान श्रीम. योगिता मिंडे यांनी गायले.

**५) मंगळवार, १५ ऑक्टोबर २०१९ :** कार्यक्रमाचे नाव : 'वाचन प्रेरणा दिन - २०१९'

येवला महाविद्यालयाचे प्राचार्य तथा मसाप शाखा येवल्याचे कोषाध्यक्ष डॉ. भाऊसाहेब गमे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद - शाखा नाशिकरोड आयोजित वाचन प्रेरणा दिन, २०१९चे प्रमुख अतिथी होते. शाखेचे उपाध्यक्ष श्री. दत्ता गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

दहावीच्या परीक्षेत मराठी विषयात सर्वांत जास्त गुण मिळवलेल्या शाखा कार्यक्षेत्रातील ६० शाळांमधील ७० विद्यार्थ्यांचा सत्कार केला गेला. सर्वाधिक गुण मिळवलेल्या कु. प्रणव डावरे, कु. करण बिडवे व श्री. नंदू खालकर यांनी सत्काराला उत्तर दिले. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, सिंधी या भाषेच्या शाळांनी सहभाग घेतला होता. समता समाज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन भरवले होते.

**६) शनिवार, १९ ऑक्टोबर २०१९ :** कार्यक्रमाचे नाव : 'संवाद सृजनाशी - २७वे पुष्प श्री. नवनाथ गोरे'

निगडी (बु.), ता. जत, जि. सांगली येथील युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्री. नवनाथ गोरे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद - शाखा नाशिकरोड आयोजित संवाद सृजनाशी या मालिकेतील २७वे पुष्प गुंफले. श्री. देविदास खडताळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमास कार्याध्यक्ष श्री. उन्मेष गायधनी, ऋतुरंगचे सचिव श्री. प्रकाश पाटील, श्री. शिवाजी म्हस्के, श्रीम. सुरेखा गणोरे व श्रीम. कामिनी तनपुरे, कवयत्री श्रीम. सविता पोतदार, श्रीम. अलका अमृतकर आदी उपस्थित होते.

**७) शनिवार, २३ नोव्हेंबर २०१९ :** कार्यक्रमाचे नाव : 'संवाद सृजनाशी - २८वे पुष्प श्रीम. वासंती देशपांडे'

लेखिका श्रीम. वासंती देशपांडे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद - शाखा नाशिकरोड आयोजित संवाद सृजनाशी या मालिकेतील २८वे पुष्प गुंफले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्रीम. मंगला सातभाई यांनी त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास गोपाळराव सबनीस, प्रकाश देशपांडे, नरेंद्र शुक्ल, श्रीम. हेमा बक्षी, कवी रामचंद्र शिंदे आदी उपस्थित होते.

●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : जुळे सोलापूर

**१) दिनांक : २० सप्टेंबर २०१९ :**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूर आणि जुळे सोलापूर सांस्कृतिक मंच संयुक्त विद्यमाने, पेठे उद्योग समूहाने प्रायोजित केलेली, ज्येष्ठ निरुपणकार मा. विवेकजी घळसासी यांची 'आर्य चाणक्य, काल, आज आणि उद्या' या विषयावरील व्याख्यानमाला २०, २१, २२ सप्टेंबर २०१९ अशी एकूण तीन दिवस प्रा. ए.डी. जोशी सभागृह, इंडियन मॉडेल स्कूल, परिसर, जुळे सोलापूर येथे संपन्न झाली. अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक करून मा. विवेकजी घळसासी यांचा सत्कार केला. यावेळी सर्व कार्यकारिणी सदस्य, पेठे परिवार, मसाप दक्षिण सोलापूर कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, सौ. सायली जोशी, प्रशांत जोशी, गिरीश दुनाखे, श्रीकांत कुलकर्णी, शांताबाई क्षीरसागर यांचेसह अनेक मान्यवरांसह, परिसरातील साहित्यिक व इतर रसिक प्रेक्षक श्रोते, प्रचंड अशा संख्येने उपस्थित होते. श्री. प्रशांत बडवे यांनी तीनही संस्थातर्फे आभार मानले.

**२) दिनांक : १४ ऑक्टोबर २०१९ :**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूरची ८वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक १४ ऑक्टोबर २०१९ रोजी सायंकाळी ५ वाजता इंडियन मॉडेल स्कूल, जुळे सोलापूर परिसरातील प्रा. ए.डी. जोशी सभागृह, येथे अध्यक्ष मा. पद्माकर कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली, कार्याध्यक्ष सौ. सायली जोशी, उपाध्यक्ष प्रशांत जोशी, प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, कार्यवाह संदीप कुलकर्णी, कोषाध्यक्ष जयंत रायते आणि कार्यकारिणी सदस्यांच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

**३) दिनांक : १४ ऑक्टोबर २०१९ :**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूरच्या ८व्या वर्धापनदिनानिमित्त सोमवार दिनांक १४ ऑक्टोबर २०१९ रोजी ६:३०वा. प्रा. ए.डी. जोशी सभागृह, इंडियन मॉडेल स्कूल परिसर येथे 'मसाप सन्मान' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन मा. अरविंद जोशी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी, सूत्रसंचालन उपाध्यक्ष प्रशांत जोशी, तर प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी कार्याध्यक्षा सौ. सायली जोशी कोषाध्यक्ष जयंत रायते, कार्यवाह संदीप कुलकर्णी यांचेसह सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

**४) दिनांक : १५ ऑक्टोबर २०१९ :**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलूपर, पूर्व विभाग वाचनालय, तसेच मराठी राज्य विकास संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ रोजी पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या हॉलमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. अरविंद जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी, तर वाचनालय कार्यवाह नारायण पुजारींनी वाचनालयाबद्दल माहिती दिली. मसाप जुळे सोलापूर प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी आभार प्रदर्शन केले. ●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : फलटण

**दिनांक : २८ नोव्हेंबर २०१९ : स्व. यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संमेलन**

महाराष्ट्र साहित्य परिषद फलटण शाखेच्या वतीने श्रीराम एज्युकेशन सोसायटी, श्री. सद्गुरू प्रतिष्ठान, यशवंतराव चव्हाण स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने थोर रसिक, साहित्यिक, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त ८वे यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संमेलन फलटण येथील महाराजा मंगल कार्यालयात पार पडले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य श्रीधर साळुंखे (सातारा) हे होते. या वेळी फलटणचे तहसीलदार हणमंत पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र माने, वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन सी. ए. चंद्रकांत काळे, साहित्यिक शंकर कवळे, योग शिक्षक सुनिल शिंदे, सौ. विद्या शिंदे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष दिलीपसिंह भोसले, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सातारा जिल्हा प्रतिनिधी रवींद्र बेडकिहाळ, श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव व नगरसेवक सचिन बेडके, यशवंतराव चव्हाण स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ताजीराव बेडके, मसाप फलटण शाखा अध्यक्ष प्राचार्य शांताराम आवटे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. ●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : पश्चिम सोलापूर

**दिनांक : १० सप्टेंबर २०१९ :**

मनोरमा साहित्य मंडळी व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा पश्चिम सोलापूर यांच्या वतीने श्रीकांत मोरे यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन मंगळवार दि. १० सप्टेंबर २०१९ माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द.ता. भोसले, लेखक श्रीकांत मोरे, सुनिल शिनखेडे, राजशेखर शिंदे, बाळासाहेब शेळके, चेतन नरोटे, सुरेश गायकवाड, बाबुराव मैंदर्गीकर, कल्याण शिंदे, माधव कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, शोभा मोरे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मोरे लिखित 'थोडे काही सांगायचे आहे', 'हिंदोळे', 'अस्वस्थ शिवार', 'भावरंग'(चौथी आवृत्ती) या चार पुस्तकांचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमास सर्व लेखक, कवी, रसिक

श्रोते, प्राध्यापक उपस्थित होते.

**२) दिनांक : ८ सप्टेंबर २०१९ :** मसाप शाखा पश्चिम सोलापूर (मनोरमा) शाखा व महिला सखी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने योग व निरोगी आरोग्य आणि यशाची गुरुकिल्ली या विषयावरती व्याख्यान

या कार्यक्रमास सोलापूर महापालिकेचे आयुक्त दिपक तावरे हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. तसेच मसाप शाखा पश्चिम सोलापूर (मनोरमा) शाखा अध्यक्ष श्रीकांत मोरे, उपाध्यक्ष शोभा मोरे, कार्यध्यक्षा अस्मिता गायकवाड, कोषाध्यक्षा शिल्पा मोहिते व सचिव सुनिल पाटील, अजय मोरे व सर्व सभासद मंडळी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे आयुक्त दिपक तावरे यांचा मा. श्रीकांतजी मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच आयुक्त दिपक तावरे यांच्या हस्ते सुधा अळळीमोरे व प्रतिभा मोरे यांचा सत्कार करण्यात आला. आयुक्त दिपक तावरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी आभार अजय मोरे यांनी व्यक्त केले.

**३) दिनांक : १८ ऑगस्ट २०१९ :** मसाप शाखा पश्चिम (मनोरमा) शाखा सोलापूर यांच्या वतीने अक्षरधारा या कार्यक्रमाचे आयोजन : ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मसाप शाखा पश्चिम (मनोरमा) शाखा सोलापूरच्या वतीने दि. १८ ऑगस्ट २०१९ रोजी पंढरपूर येथे कर्मवीर भाऊराव पाटील सभागृहात विविध कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमास विधान परिषदेचे आमदार मा. प्रशांत परिचारक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे माजी अध्यक्ष मा. सुधाकरपंत परिचारक, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द.ता. भोसले तसेच मसाप शाखा पश्चिम सोलापूरचे अध्यक्ष श्रीकांत मोरे, उपाध्यक्षा शोभा मोरे, डॉ. विश्वास मोरे, अजय मोरे, सुनिल पाटील व सर्व साहित्यिक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. या कार्यक्रमाचे कार्यवाह श्री. कल्याण शिंदे व अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द.ता. भोसले यांनी भूषविले. उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**४) दिनांक : ७ डिसेंबर २०१९ :** अक्षरधारा या कार्यक्रमाचे सादरीकरण : एलिझाबेथ एकादशी या मराठी चित्रपटातील आजीची भूमिका साकारलेल्या 'वनमाला किणीकर' व त्यांच्या सहकारी यांनी साहित्यावर आधारित 'अक्षरधारा' या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. या अंतर्गत ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, सुधीर फडके यांचे गीत, लावणी, लघुनाटिका सादर केले. ●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : पश्चिम (मनोरमा) शाखा सोलापूर

**मसाप शाखा पश्चिम (मनोरमा) शाखा सोलापूर यांच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा :** डॉ. नंदकुमार कुलकर्णी, डॉ. गहिनीनाथ गावडे, डॉ. नंदकुमार होनराव, डॉ. प्रशांत निकम, डॉ. मंजूषा देशमुख, परमेश्वर खांडेकर यांना आदर्श डॉक्टर पुरस्कार देण्यात आला. तसेच स्नेहल शिंदे, गौरी हेले, मानसी महाडिक यांना आदर्श खेळाडू म्हणून पुरस्कार देण्यात आला. पांडुरंग कोडग, डॉ. ए. आर. सरदेशमुख, गणेश वाळके यांना साहित्य पुरस्कार देण्यात आले. हा सर्व सत्कार मुलींना शाल, रोप, रोख रक्कम रु. ५००देऊन महिला सखी मंचच्या अध्यक्षा सौ. शोभा मोरे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना गौरवण्यात आले. ●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : डोंबिवली

१) 'ॲडॉल्फ हिटलर आणि दुसरे महायुद्ध' या विषयावर इतिहासविषयक अभ्यासक श्री. पराग वैद्य यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

२) १७ ऑगस्ट २०१९ रोजी ज्येष्ठ नाटककार श्री. आनंद म्हसवेकर यांच्याशी मनमुराद गप्पा मारण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. ज्येष्ठ रंगकर्मी श्री. नंदू गाडगीळ यांनी आपल्या खुमासदार आणि मिश्कील शैलीत म्हसवेकर यांना बोलते केले. म्हसवेकर यांचा परिचय दीपाली काळे यांनी करून दिला, तर आभार आणि प्रास्ताविक सुरेश देशपांडे यांनी केले.

३)'आजच्या संदर्भात कौटिलीय अर्थव्यवस्थेतील राज्यव्यवस्था' या विषयावर प्रा. प्राची दामले यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. मसापचे अध्यक्ष वामनराव देशपांडे यांनी समयोचित समारोप केला. वृंदा कौजाल्गीकार यांनी सूत्रसंचालन केले. विलास सुतावणे यांनी आभार मानले. सुरेश देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. कार्यकारिणीचे सदस्य धनश्री साने, गीता नवरे, प्रज्ञा जोशी आदींनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले. ●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : दक्षिण सोलापूर

**१) दिनांक : १ ऑगस्ट २०१९ :**

मसाप दक्षिण सोलापूर आणि ग्रंथाली प्रकाशन यांच्या वतीने सुरेखा शहा लिखित मा. ना. सुभाष बापू देशमुख यांच्या जीवनावरील 'लोकयात्री' ग्रंथाचा प्रकाशनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा हुतात्मा स्मृती मंदिरात निरुपणकार विवेक घळसासी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर मसाप अध्यक्ष रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, जितेश कुलकर्णी, अभय जोशी, अमोल धावळे, चंद्रकांत निकम, रवी हलसगीकर आदी उपस्थित होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तब्येत बिघडल्याने उपस्थित राहू शकले नाहीत; परंतु नंतर

सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी गडकरी यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन करण्यात आले.

**२) दिनांक १८, १९, २० ऑक्टोबर :** रोजी दीपावलीपूर्व 'विवेकाची अमृतवाणी' हा कार्यक्रम सकाळी हिराचंद नेमचंद ॲम्फी थिएटर येथे आयोजित करण्यात आला. या वर्षीचा विषय 'ध्यान' हा होता. या वर्षीचे हे सहावे वर्ष होते.

**३) दिनांक : १८, १९, २० ऑक्टोबर :** या दिवशीच सोलापुरातील जुळे सोलापुरातील रसिकांसाठी इंडियन मॉडेल स्कूल येथे सायंकाळी विवेकजी घळसासी यांचा 'श्रीकृष्ण मिती' या विषयावर निरुपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

विवेकजींच्या या कार्यक्रमास रसिकांबरोबरच माजी केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंदे, आमदार प्रणिती शिंदे, सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी उपस्थिती लावली होते.

**अहवाल २०१८-१९ :**

१) शाखा सभासद व कार्यकारिणी :

शाखेची स्थापना झालेपासून हे संस्थेचे पाचवे वर्ष आहे. कार्यकारिणीमध्ये कोणताही बदल करण्यात आला नाही.

२) कार्यक्रम : मसाप दक्षिण सोलापूरतर्फे या वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

कार्यक्रम क्र. १) : दि. २९-४-२०१८ रोजी दूरदर्शन निवेदिका, मुलाखतकार, सूत्रसंचालक सौ. ज्योती आंबेकर यांची 'भाषण कला' या विषयावर कार्यशाळा मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट सोलापूर येथे दिवसभर घेण्यात आली. कार्यशाळेस प्रतिसाद उत्तम होता. सहभागी शिबिरार्थींना प्रमाणपत्र आणि सोलापुरातील 'वृत्तवेध' या वाहिनीवर बातमी देण्याची संधी देण्यात आली. जवळपास ५० जणांनी या शिबिरात सहभाग नोंदवला. सदर कार्यक्रम तरुण भारत, वृत्तवेध वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.

कार्यक्रम २) : दिनांक ३१-३-२०१९ रोजी नामवंत वक्त्या डॉ. रमा गोळवलकर यांचे 'श्रीसूक्त ते राष्ट्रसूक्त' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. श्रीसूक्तामध्ये राष्ट्रसूक्त कसे दडले आहे याचे विवेचन त्यांनी चालू घडामोडीतील उदाहरणांसहित केले. कार्यक्रमाला महिला वर्गाची उपस्थिती विशेष होती. सदर कार्यक्रम दाते पंचागकर्ते श्री मोहन दाते, जी. आर. आपटे व पवार साडी सेंटर यांच्या सहकार्याने करण्यात आला.

●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : पिंपरी चिंचवड

**१) दिनांक २१ एप्रिल २०१९** रोजी मसाप पिं. चिं. आणि रवींद्रनाथ ठाकुर ग्रंथालय स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक पुस्तक दिन' साजरा करण्यात आला. ग्रंथपूजन करण्यात येऊन प्रतिभा महाविद्यालय चिंचवडच्या लाजवंती कुटे, ओंकार दांडगे व रचना सोनवणे या विद्यार्थ्यांनी ललित लेखनाचे अभिवाचन केले. 'निर्धार करू या मतदानाचा' ही राजन लाखे लिखित संहिता श्रीधर कुंभार या विद्यार्थ्याने वाचली. त्या वेळी व्यासपीठावर मसाप पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष राजन लाखे, प्रदीप पाटील, विनिता ऐनापुरे आदी उपस्थित होते.

**२) दिनांक २३ एप्रिल २०१९** रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवडने घेतलेल्या राज्यस्तरीय कथा आणि काव्यस्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळ्याचा कार्यक्रम सावरकर सदन येथील कॅप्टन सभागृह निगडी येथे संपन्न झाला. त्या वेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, प्रमुख पाहुणे डॉ. राजेंद्र कांकरिया, मसाप पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष राजन लाखे, सावरकर मंडळाचे प्रदीप पाटील, विनिता ऐनापुरे, कथाकार बबन पोतदार, गझलकार दीपक करंदीकर आदी उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्यांमधील एका कथेचे व एका कवितेचे सादरीकरण झाले. स्पर्धेसाठी एकूण १२३ कथा, तर १७३ कविता आल्या होत्या. कथाकार बबन पोतदार व मसाप पुणेचे कार्यवाह दीपक करंदीकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजन लाखे यांनी केले, तर विनिता ऐनापुरे यांनी आभार मानले. संजय जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

**३) दिनांक २८ एप्रिल २०१९** महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवडतर्फे पुढाकार घेऊन 'मतदान जागृती अभियान' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. सदर कार्यक्रमात पुण्यात मतदानाची टक्केवारी बघता मावळ लोकसभा निवडणुकीत प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवडने तरुणांना राष्ट्रीय कर्तव्य असलेल्या मतदानाचे महत्त्व विशद केले. मतदान जागृती अभियानात अध्यक्ष राजन लाखे, विनिता ऐनापुरे, संजय जगताप, डॉ. रजनी सेठ, माधुरी मंगरूळकर, किरण लाखे, डी. बी. शिंदे, सुप्रिया ऐनापुरे आणि प्रतिभा महाविद्यालयाच्या तरुणांनी सहभाग घेतला.

**४) दिनांक २ मे २०१९** रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आयोजित 'महाराष्ट्र दिन व कामगार दिन' निमित्त कामगाराचा सन्मान आणि विशेष कविसंमेलन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद उद्योजक राजेंद्र पोफळे व उद्योजक अतुल इनामदार यांनी भूषविले. एल्गार सामाजिक साहित्य परिषदेचे अध्यक्ष महेंद्रकुमार गायकवाड मसापचे शाखाध्यक्ष राजन लाखे, कार्याध्यक्षा विनिता ऐनापुरे या वेळी उपस्थित होते. सदर कार्यक्रमात कामगार प्रताप सोनवणे, प्रकाश परदेशी, पीएमपीतील वाहक राजू गवते, सुरक्षारक्षक दत्तू ठोकळे आणि फळविक्रेते पुरुषोत्तम दिमके यांचा कामगार दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी झालेल्या कविसंमेलनात २७ कवींनी आपला सहभाग नोंदविला.

**५) दिनांक २५ मे २०१९** रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद

पिंपरी चिंचवड आयोजित महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या ११३व्या वर्धापन दिनानिमित्त - वर्धापन दिनाच्या पूर्व संध्येला 'खुले कविसंमेलन' घेण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद पुणे वृत्तदर्शनचे संपादक मा. डॉ. शैलेश गुजर व सोपान खुडे (ज्येष्ठ साहित्यिक) यांनी भूषविले. यावेळी मसापचे अध्यक्ष राजन लाखे आणि कार्याध्यक्ष विनिता ऐनापुरे उपस्थित होते. सदर कार्यक्रमात ४० कवींनी आपला सहभाग घेतला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जगताप यांनी केले.

**६) दिनांक १४ जुलै २०१९** रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेतर्फे 'सरीवर सरी' या कार्यक्रमाचे चिंचवड येथील प्रतिभा महाविद्यालयात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने कवितांचा अनोखा पाऊस रसिकांनी अनुभवला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी आमदार व कवी विश्वास गांगुर्डे यांनी, तर प्रमुख पाहुणे पद कला दिग्दर्शक डॉ. भाई बांदकर यांनी भूषविले. कवी बी. एस. बनसोडे, जनार्दन धुमाळ, दिनेश भोसले, रघुनाथ पाटील, नागेश गवाड, प्रकाश परदेशी, विनोद गायकवाड यांनी सादर केलेल्या कवितांना श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पिंपरी चिंचवड अध्यक्ष राजन लाखे, कार्याध्यक्षा विनिता ऐनापुरे, उपाध्यक्ष डॉ. रजनी सेठ आदी उपस्थित होते.

**७) दिनांक २५ ऑगस्ट २०१९** रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेने मसाप पिं. चिं. कार्यालय बिजलीनगर, चिंचवड येथे 'पुस्तकावर बोलू काही' या कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी व्यासपीठावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर, प्रा. डॉ. सुभाष आहेर, अध्यक्ष राजन लाखे, विनिता ऐनापुरे हजर होते. सदर कार्यक्रमात एशिया बुक रेकॉर्डमध्ये व्हिजिटिंग कार्ड संकलनबाबत नोंद झालेले संभाजी बारणे, ककसाड या हिंदी मासिकाचे संपादकपदी निवड झाल्याने संजय जगताप तसेच लेखक नितीन सुतार यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. रजनी सेठ, किरण लाखे, विनोद गायकवाड यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : ठाणे जिल्हा

**१) दिनांक २५ मे २०१९ : कथा अभिवाचन :**

कथा अभिवाचन आणि प्रबोधन पुरस्कार वितरण असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रामदास भटकळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'केल्याने भाषांतर' या मासिकाला 'प्रबोधन पुरस्कार' प्रदान करण्यात आला. संपादिका सुनंदा महाजन व अनघा भट यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सुहास जोशी, श्रीरंग खटावकर, वासंती वर्तक यांनी दुसऱ्या भाषेतील कथांचे अभिवाचन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर मृण्मयी भजक यांनी केले. हा कार्यक्रम यू नीड सोसायटीने आयोजित केला होता, त्यात महाराष्ट्र साहित्य परिषद सहभागी झाली होती.

**२) दिनांक १० जून २०१९ : जागतिकीकरण आणि मराठी साहित्य व्यवहार :**

महाराष्ट्र साहित्य परिषद ठाणे जिल्हा शाखेचा चाळिसावा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. डॉक्टर सुधीर रसाळ- सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, अभ्यासक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मराठी विभागाचे माजी प्रमुख, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पद्माकर शिरवाडकर, कार्याध्यक्ष यांनी प्रास्ताविक केले. डॉक्टर वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यवाह चांगदेव काळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**३) २५ ऑगस्ट २०१९ : मन चिंब पावसाळी :**

सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार आणि निवेदिका अस्मिता पांडे यांनी पावसाळी कवितांवर आधारित संगीतमय असा रंगतदार कार्यक्रम सादर केला. कवी ग्रेस, नलेश पाटील, शांता शेळके, ना. धों. महानोर, अशोक बागवे यांच्या कविता त्यांनी सादर केल्या. कविता आणि संगीत याविषयीचे अनुभव कौशल इनामदार यांनी कथन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पद्माकर शिरवाडकर, कार्याध्यक्ष यांनी केले. डॉक्टर वसुधा सहस्त्रबुद्धे, अध्यक्ष यांनी कौशल इनामदार व अस्मिता पांडे यांचे मनापासून कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चांगदेव काळे, कार्यवाह यांनी केले.

**४) दिनांक २८ सप्टेंबर २०१९ : प्राचार्य म. वि. फाटक स्मृती पुष्प, वर्ष ३२ :**

'मराठी प्राचीन वाङ्‌मयात संत कवियित्रींचे योगदान' या विषयावर डॉक्टर विजया पंडितराव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महादाई, मुक्ताबाई, जनाई, बहिणाबाई, वेणाई, सोयराई या संत कवयित्रींच्या योगदानाविषयी त्यांनी माहिती दिली. चक्रधर स्वामी, एकनाथ, नामदेव, तसेच निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, चांगदेव यांचा कालखंड त्यांच्या व्याख्यानातून उलगडून दाखविला. हा कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषद, ठाणे जिल्हा शाखा आणि ठाणे नगर वाचन मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. पद्माकर शिरवाडकर, कार्याध्यक्ष यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. स्वाती कुलकर्णी, कार्यवाह यांनी डॉक्टर विजया पंडितराव यांचा परिचय करून दिला. केदार जोशी, अध्यक्ष यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. चांगदेव काळे, कार्यवाह यांनी आभार व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका डॉक्टर वसुधा सहस्त्रबुद्धे, डॉक्टर अनंत देशमुख, सुरेश दांडेकर, कथाकार माधवी घारपुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : सिन्नर

**दिनांक : १ ऑक्टोबर २०१९ :**

साहित्य सेवा वाङ्मय पुरस्कार २०१९ - कार्यक्रमाचे अध्यक्ष विजयकुमार मिठे ग्रामीण साहित्यिक, शुभहस्ते श्री. प्रकाश होळकर कवी व गीतकार, खलील मोमीन ज्येष्ठ कवी, प्रमुख उपस्थिती विवेक उगलमुगले, मनीषा कुलकर्णी, जयश्री वाघ, पुंजाभाऊ सांगळे, कृष्णाजी भगत, शंकर बोराडे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक- रवींद्र कांगणे, सूत्रसंचालन- जावेद शेख, आभार- नितेश दातीर. यशस्वितेसाठी प्रयत्न- राजाराम मुंगसे, किरण भावसार, जावेद शेख, रवींद्र कांगणे, सूर्यभान धाकराव, श्यामसुंदर झळके, मंगल सांगळे, रोहिणी मिठे, नितेश दातीर, स्वप्निल डुंबरे.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : चाळकवाडी-जुन्नर

**१) मसाप शाखा चाळकवाडी-जुन्नरच्या वतीने दिवाळी काव्यफराळ कार्यक्रम संपन्न :**

या वेळी भक्ती चाळक, अदिती चाळक, प्राचार्य मनीषा घंगाळे, शिवाजी चाळक, नंदकुमार पाडेकर, बासु सुरवसे, जालिंदर डोंगरे, प्रा. जयसिंग गाडेकर, रूपाली करपे, वसीम सय्यद, नवदीप आहेर यांनी कविता सादर केल्या. यात्रसंगी रघुनाथ काकडे, भरत घंगाळे, बाळकृष्ण चाळक, तानाजी वामन, संतू जेडगुले, गीतांजली चाळक, सुनील जगताप, जितेंद्र करपे, व्यंकटेश कुलकर्णी, स्मिता काशीद इ. उपस्थित होते. कवी संदीप वाघोले व कवी रवी काशीद यांनी सूत्रसंचालन केले, तर कवी शिवाजी चाळक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : चाकण

**दिनांकः रविवार, ६ ऑक्टोबर २०१९ :**

पुस्तक प्रकाशन - काव्य संग्रह- 'अण्णागिरी', कवी- ॲड. प्रितम रामदास शिंदे पाटील, कादंबरी- 'सत्यजीत', लेखिका- डॉ. सौ. सुप्रिया प्रणव भाटकर. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष- मा. श्री. ज्ञानेश्वर शिळवणे (कवी/गीतकार), अध्यक्ष- प्रा. मिलिंद जोशी (कार्याध्यक्ष, मसाप), प्रमुख पाहुणे- मा. श्री. प्रकाश पायगुडे (कार्यवाह, मसाप), मा. सौ. सुनिताराजे पवार (कोषाध्यक्ष, मसाप) प्रमुख उपस्थिती - मा. श्री. राजन लाखे (जिल्हा प्रतिनिधी, मसाप), मा. श्री. रावसाहेब पवार (जिल्हा प्रतिनिधी, मसाप), मा. श्री. पुरुषोत्तम काळे (जिल्हा प्रतिनिधी, मसाप), मा. श्री. संजय नाईकडे साहेब (गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, खेड), पत्रकार बांधव - श्री. कल्पेश भोई, श्री. हरिदास कड, श्री. अविनाश दुधवडे, श्री. हनुमंत देवकर, श्री. संजय बोथरा, श्री. अशोक टिळेकर, श्री. विवेक बच्चे, श्री. कुमार नवरे तसेच श्री. मधुकर गिलबिले (अध्यक्ष), ॲड. प्रितम शिंदे पा.(उपाध्यक्ष), श्री. सुनिल पानसरे (कार्याध्यक्ष), प्रा. राजेंद्र खरमाटे (कोषाध्यक्ष), श्री. दिपक मांडेकर (प्रसिद्धी प्रमुख), डॉ. रोहिणी माशेरे (गव्हाणे), डॉ. विजय गोकुळे (प्रमुख कार्यवाह), डॉ. निलेश झगडे (सहकार्यवाह), श्री. ज्ञानेश्वर शिळवणे (कार्याध्यक्ष), श्री. महेंद्र गाडे (कोषाध्यक्ष), प्रा. दिलीप गोरे (सल्लागार), श्री. प्रकाश बनसोडे (सल्लागार) हे मान्यवर उपस्थित होते. ●

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा : येवला

**१) सहवेदना सभेचे आयोजन :** ज्येष्ठ समीक्षक डॉ. म.सु. पाटील आणि सुप्रसिद्ध लेखक आणि नाटककार गिरीश कार्नाड यांच्या निधनामुळे सहवेदना सभेचे आयोजन येवला शाखेच्या वतीने आयोजित केले होते. या सभेकरिता प्रमुख अतिथी मराठी साहित्याचे समीक्षक डॉ. एकनाथ पगार, प्रा. रणजित परदेशी, कवी खलील मोमीन हे होते. अध्यक्ष स्थानी प्रा. गो.तु. पाटील होते.

**२) नवोदित कवींचे काव्य वाचन आणि नाट्य अभिवाचनाचे आयोजन :** येवला शाखेच्या वतीने तालुक्यातून नव्याने सहभागी झालेल्या नवोदित कवींच्या कवितांचे काव्यवाचन आणि नाटकाचे अभिवाचन याचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे कोजागिरीच्या निमित्ताने कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कविसंमेलनाचे अध्यक्षस्थानी कवी लक्ष्मण बारहाते हे होते. वरीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन येवला शाखेने केले होते.

**३) प्रस्तावित काव्य स्पर्धा २०१९ :** सन २०१९ची तालुकास्तरीय काव्य स्पर्धा दि. २० डिसेंबर २०१९ रोजी आयोजित केली आहे. मागील वर्षीप्रमाणे अटलबिहारी वाजपेयी काव्य करंडक, तसेच कवी कुसुमाग्रज पुरस्कार आणि कवी बाबुराव बागूल काव्य पुरस्कार यावर्षीही प्रदान करण्यात येणार आहे.

●



मसाप शाखा पाचोरा, जि. जळगाव व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय मराठी बोलीभाषा साहित्य संमेलनाचे उद्घाटन जात्यावर धान्य दळून करताना वाहरू सोनवणे, संमेलनाध्यक्ष डॉ. किसन पाटील, डॉ. वासुदेव वले, दिलीप वाघ, डॉ. भी. ना. पाटील व मान्यवर.




आपल्या लेखन कर्तृत्वाने मराठी साहित्याचे दालन समृद्ध करणारे साहित्यिक त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डॉ. प्रिया निघोजकर यांचे व्याख्यान झाले. या वेळी ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर उपस्थित होते.




महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित 'मसाप गप्पा' या कार्यक्रमात भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार चंदू बोर्डे यांच्याशी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे यांनी संवाद साधला.




महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'एक कवयित्री, एक कवी' या कार्यक्रमात सुचिता खल्लाळ (नांदेड) आणि अजीम नवाज राही (बुलडाणा) यांची प्रमोद आडकर आणि उद्धव कानडे यांनी प्रकट मुलाखत घेतली.

Maharashtra Sahitya Patrika. Quarterly : December 2019
Registered with the Register of Newspaper for India under No. 6398/57
Book Pkt. Periodical Category.    Publishing Date : 31 December 2019

# महाराष्ट्र साहित्य परिषद
# पुस्तक सूची

**२५टक्के सवलतीत!**

## सूची

- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : रु. ५००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग१) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग२) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : रु. ४००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : रु. ३००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : रु. ८००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : रु. ७००/-
- भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : रु. ८००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड १ : रु. ५००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड २ : रु. ३००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : रु. २००/-
- म.सा.पत्रिका लेख-सूची : रु. ४००/-

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस. टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)




मागणीसाठी संपर्क : **महाराष्ट्र साहित्य परिषद**, टिळक रस्ता, पुणे - ४११ ०३०. दूरभाष : ०२०- २४४७५९६३/६४

बुक-पोस्ट

---

प्रेषक
प्रमुख कार्यवाह,
**महाराष्ट्र साहित्य परिषद,**
टिळक रस्ता, पुणे - ४११ ०३०.
दूरभाष : ०२०-२४४७५९६३